


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, बुधवार २४ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# बांगलादेशातील हिंदू कुटुंबांची घरे जाळली

## आग लावण्यापूर्वी बाहेरून दरवाजे बंद केले; भिंत तोडून लोकांनी जीव वाचवला





**ढाका/वृत्तसंस्था :**बांगलादेशातील चट्टोग्राम जिल्ह्यात हिंदू कुटुंबांच्या घरांना आग लावण्यात आली आहे. सोमवारी पहाटे सुमारे ३:४५ वाजता पश्चिम सुलतानपूर गावात दोन हिंदू कुटुंबांच्या घरांना आग लावण्यात आली. आरोप आहे की हल्लेखोरांनी घरांचे दरवाजे बाहेरून बंद केले होते.स्थानिक लोकांच्या मते, दोन घरांची एकूण सात खोल्या जळून खाक झाल्या. ही घरे सुखा शिल (दुबईत काम करतात) आणि रोजंदारी मजूर अनिल शिल यांची होती. घटनेच्या वेळी घरात आठ लोक उपस्थित होते. रात्रीचे जेवण करून सर्वजण झोपले होते, तेव्हा अचानक आग लागली.जेव्हा कुटुंबातील लोकांनी बाहेर पडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांना दिसले की दरवाजे बाहेरून बंद आहेत. जीव वाचवण्यासाठी त्यांनी बांबू आणि पत्र्याच्या भिंती कापून कशाबशा बाहेर पडून आपला जीव वाचवला.

**आगीत पासपोर्ट आणि घरातील सामान जळाले-**अनिल शिल यांचा मुलगा मिथुन शिल याने सांगितले की, तो तीन महिन्यांपूर्वी लग्नासाठी दुबईहून घरी आला होता. आगीत त्याचा पासपोर्ट, घरातील सामान आणि सुमारे ८०-९० हजार टका रोख रक्कम जळाली. मिथुनने सांगितले की, दोन्ही दरवाजे बाहेरून बंद होते, त्यामुळे सर्वांनी भिंती कापून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. उपजिल्हा कार्यकारी अधिकारी (UNO) एस.एम. रहातुल इस्लाम आणि सहायक आयुक्त(भूमी) ओंगचिंग मारमा यांनी नुकसानीची पाहणी केली आणि मदतीचे (पान २ वर)



## बांगलादेशातील हिंदू तरूणाच्या हत्येविरोधात हिंदू संघटनेचे दिल्लीत निदर्शने

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**बांगलादेशमध्ये हिंदू युवक दीपू चंद्र दासची हत्या आणि तेथील हिंदूंवर होत असलेल्या हिंसाचाराच्या निषेधार्थ विश्वहिंदू परिषदेसह इतर हिंदू संघटनांनी बांगलादेश उच्चायुक्तालयाबाहेर आंदोलन केलं.वृत्तसंस्थांनी प्रसिद्ध केलेल्या व्हीडिओनुसार उच्चायुक्तलयाबाहेर आंदोलकांचा मोठा जमाव दिसला.आंदोलनामुळे बांगलादेश उच्चायुक्तालयात आणि परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले. त्याचबरोबर तिथे कसून चौकशी करण्यात आल्याचं पीटीआयने म्हटलं आहे.तसंच मुंबईतही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात राडा झाल्याचं पाहायला मिळालं. याठिकाणी आंदोलकांनी पोलिसांनी लावलेले बॅरिकेड्स काढून फेकल्याचं पाहायला मिळालं. एएनआयच्या एका व्हीडिओमध्ये पोलिसांच्या बॅरिकेडिंगजवळ आंदोलनकर्ते आणि पोलिसांमध्ये धक्काबुक्की होताना दिसत आहे. तर दुस-या व्हीडिओत मोठ्या संख्येने आंदोलनकर्ते हातात फलक घेउन घोषणाबाजी करताना दिसत आहेत. बांगलादेशातील मैमनसिंह जिल्ह्यात धर्माचा अपमान केल्याच्या आरोपावरून जमावाने एका हिंदू युवकाला बेदम मारहाण केली होती.



## ‘दिपू दास’च्या हत्येचे मुंबईत तीव्र पडसाद

बांगलादेशात हिंदू समाजावर सुरू असलेले अत्याचार आणि तरुण दिपू चंद्र दास याची जमावाकडून झालेली निर्घृण हत्या, याच्या निषेधार्थ आज मुंबईत संतापाचा उद्रेक पाहायला मिळाला. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने दक्षिण मुंबईतील कफ परेड परिसरात मंगळवारी आंदोलन करण्यात आले. यावेळी कफ परेडमध्ये विश्व हिंदू परिषदेचे आंदोलन करतेवेळी पोलिसांकडून कार्यकर्त्यांची धरपकड करण्यात आली.

# हे हिंदू राष्ट्र आहे

- सांताक्लॉजच्या टोप्या विकायच्या नाही
- ख्रिसमसच्या वस्तू विकणा–यांना धमकावले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**२५ डिसेंबर अवघ्या एक दिवसावर येउन ठेपला आहे. त्या अनुषंगाने रस्त्यावर ख्रिसमस नाताळशी संबंधित वस्तू जसं की सांताक्लाजच्या टोप्या, ख्रिसमस ट्री, सांताक्लाजचे कपडे



अशा वस्तू विकल्या जात आहेत. रस्त्यावरचे फूटपाथ असोत किंवा गिफ्ट शाप सगळीकडेच या वस्तू विकल्या जात आहेत. दरम्यान हे हिंदू राष्ट्र आहे इथे सांताक्लाजच्या टोप्या विकायच्या नाहीत असं म्हणत काही जणांनी रस्त्यावर वस्तू विकणा-यांना हटकलं आणि त्यांना धमकावलं आहे. ओडिशामध्ये ही घटना घडली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या घटनेबाबत विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. कुठून आला आहेस ओडिशात? राजस्थानातून आलोय असं तो विक्रेता सांगतो. त्यावर कारमधून उतरत कथित गोरक्षक म्हणतो हे हिंदू राष्ट्र आहे. या ठिकाणी सांताच्या टोप्या कशा विकता? ओडिशा जगन्नाथाची भूमी आहे. या ठिकाणी आम्ही ख्रिसमसच्या वस्तू विकू देणार नाही. ही जगन्नाथाची भूमी आहे. तुम्ही हिंदू आहात ना? मग ख्रिश्चन समाजाच्या वस्तू कशा विकत आहात? तुम्ही कुणाला विचारुन या ठिकाणी वस्तू विकत आहात. दुस-या वस्तू विका, हिंदू आहात तर या वस्तू का विकत आहात? सगळं सामान उचला आणि निघा. तुमच्याकडे जर संमती असेल तर फूटपाथवर बसा आणि काय विकायचं ते विका असं हा कथित गोरक्षक ओरडतो आहे. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. जगन्नाथाच्या भूमीत सांताच्या वस्तू विकू देणार नाही असं तो धमकावतो आणि सगळ्यांना हुसकावून लावतो हे या व्हिडीओत दिसतं आहे. (पान २ वर)

# ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक विनोद कुमार शुक्ल यांचे निधन

**रायपूर/वृत्तसंस्था-**छत्तीसगडमधील प्रसिद्ध कवी, लघुकथाकार आणि कादंबरीकार विनोद कुमार शुक्ल यांचे मंगळवारी संध्याकाळी



वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. महिन्याभरापूर्वीच त्यांना भारतातील सर्वोच्च साहित्यिक सन्मान ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ते गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते आणि रायपूर एम्समध्ये उपचार घेत होते. साहित्यकार विनोद कुमार शुक्ल यांना ज्ञानपीठचे महाव्यवस्थापक आर.एन. तिवारी यांनी देवी सरस्वतीची प्रतिमा आणि पुरस्काराचा धनादेश देउन सन्मानित केले. ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते छत्तीसगडमधील पहिले साहित्यिक आहेत. या भेटीदरम्यान विनोद कुमार शुक्ल म्हणाले होते की, ‘जेव्हा हिंदीसह सर्व भाषांवर संकट आल्याची चर्चा असते तेव्हा मला पूर्ण आशा आहे की नवीन पिढी प्रत्येक भाषेचा आणि प्रत्येक विचारसरणीचा आदर करेल. एखाद्या भाषेचा किंवा चांगल्या कल्पनेचा नाश म्हणजे मानवतेचा नाश.‘ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही विनोद कुमार शुक्ल यांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. छत्तीसगडच्या २५ व्या स्थापना दिनी पंतप्रधान रायपूरमध्ये होते. या भेटीदरम्यान विनोद कुमार शुक्ल यांनी पंतप्रधानांना सांगितले, ‘लेखन माझ्यासाठी श्वास घेण्यासारखे आहे.‘ मला लवकरात लवकर घरी जायचे आहे - मला लिहित राहायचे आहे.’ विनोद कुमार शुक्ल , जे ब-याच काळापासून मुलांसाठी आणि किशोरवयीन मुलांसाठी लिहित आहेत, म्हणाले की त्यांना नवीन पिढीकडून खूप आशा आहेत. ते म्हणाले, चांगली पुस्तके नेहमीच तुमच्यासोबत ठेवावीत. जर तुम्हाला कोणत्याही क्षेत्रात अभिजातता मिळवायची असेल, (पान २ वर)

# ठाकरे बंधूंच्या युतीची आज १२ वाजता घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :**अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष लागलेल्या ठाकरे बंधूंच्या युतीच्या घोषणेचा अखेर मुहूर्त ठरला असून उद्या २४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता पत्रकार परिषदेत ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा होईल. शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राउत यांनी ट्विटरवरुन याबाबत माहिती दिली.



मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा पक्षाच्या नेत्यांची जागावाटपासंदर्भात बैठक झाली असून आता दोन्ही प्रमुख नेते एकत्र येणार आहेत. या दोन्ही नेत्यांकडून उद्या दुपारी ठाकरे बंधूंच्या युती आणि जागावाटपाची घोषणा केली जाउ शकते. त्यामुळे, मुंबईसह महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांसाठी शिवसेना-मनसे एकत्र आल्याने ठाकरेंची ताकद वाढली आहे. शिवसेना आणि मनसेची युती कार्यकर्त्यांनी (पान २ वर)

# प्रा.जयंत विष्णू नारळीकर यांचा मरणोत्तर ‘विज्ञान रत्न’ पुरस्काराने सन्मान

## राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारांचे वितरण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**भारत सरकारच्या वतीने विज्ञान आणि तंत्रज्ञानातील उत्कृष्ट योगदानासाठी देण्यात येणा-या राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार २०२५ चे वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसिद्ध खगोल भौतिकशास्त्रज्ञ प्रा. जयंत विष्णू नारळीकर यांना 'विज्ञान रत्न' या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करण्यात आले. तसेच अन्य दोन श्रेणीमध्य महाराष्ट्रातील सहा शास्त्रज्ञ आणि संशोधकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडप येथे आयोजित पुरस्कार



सोहळ्यात शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि संशोधकांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रातल्या उल्लेखनीय योगदानासाठी, विज्ञान रत्न, विज्ञान श्री, विज्ञान युवा आणि विज्ञान टीम या चार श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रात आजीवन योगदान देणा-या शास्त्रज्ञांना देण्यात येणारा विज्ञानरत्न पुरस्कार प्रसिद्ध खगोल भौतिकशास्त्रज्ञ प्रा. जयंत विष्णू नारळीकर यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. त्यांच्या वतीने आयुकाचे संचालक रघुनाथन श्री आनंद यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

नारळीकर यांनी 'होयल-नारळीकर सिद्धांत' विकसित करून गुरुत्वाकर्षण आणि द्रव्य निर्मितीचे एकत्रीकरण करणारा स्थिर अवस्था ब्रह्मांडाचा आराखडा मांडला होता. तसेच, 'क्वासी-स्टेडी स्टेट कास्मालाजी' माडेलद्वारे कास्मिक बॅकग्राउंड रेडिएशन आणि दीर्घिकांच्या निर्मितीचे स्पष्टीकरण दिले होते. विज्ञान श्री पुरस्कार नागपूर येथील राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे संचालक एस. वेंकट मोहन, यांना पर्यावरण (पान २ वर)




# गुटखा सापडल्यास संबंधित क्षेत्रातील अधिका–याचे होणार निलंबन–मंत्री झिरवाळ

**मुंबई :** राज्यात बंदी असलेल्या गुटखा आणि तत्सम अंमलीपदार्थांवर कडक कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग सज्ज झाला आहे. यापुढे बंदी असलेले प्रतिबंधित पदार्थ सापडल्यास त्या संबंधित क्षेत्रातील अधिका-यावर निलंबनाची कारवाई करण्याचा इशारा अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अधिका-यांना दिला . अधिका-यांच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री होत आहे, असे निर्दशनास आल्यास त्या कार्यक्षेत्राच्या सर्व संबंधित अधिका-यांना जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रकही मंत्री झिरवाळ यांच्या निर्देशानंतर काढण्यात आले. या अंतर्गत सर्व विभागीय सह आयुक्त (अन्न) यांना प्रतिबंधित अन्नपदार्थांची छुप्या पद्धतीने व अवैध मार्गाने विक्री, साठा व वाहतूक करणा-या व्यावसायिकावर प्रभावीपणे कारवाई करण्याचे आदेश अन्न सुरक्षा आयुक्त श्रीधर दुबे पाटील यांनीही परिपत्रकाद्वारे दिले आहेत. सह आयुक्त (अन्न), सहायक आयुक्त (अन्न) व अन्न सुरक्षा अधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील अन्न आस्थापनांची तपासणी करावी. तसेच त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री, साठा व वितरण होणार नाही.

## न्यायाधीशांनी संतोष देशमुखांच्या हत्येचा घटनाक्रम वाचून दाखवला

# कराड पहिल्यांदाच कोर्टात बोलला

**बीड/प्रतिनिधी :** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आज (२३ डिसेंबर) बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात पुन्हा सुनावणी झाली. या सुनावणीमध्ये न्यायाधीशांनी सर्व आरोपींना असलेल्या गुन्ह्याबाबत माहिती दिली. यादरम्यान न्यायधीशांनी संतोष



देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडसह अन्य आरोपींना एक प्रश्न विचारला. यावेळी न्यायालयात नेमकं काय घडलं, याची माहिती समोर आली आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात २३ वी सुनावणी झाली. मागील सुनावणीत आरोपी विष्णू चाटेच्या जामीन अर्जावर युक्तिवाद झाला होता. तसेच संतोष देशमुखांच्या हत्येचे व्हिडीओ आरोपींच्या वकिलांना दिल्यानंतर सर्व आरोपींवर आज आरोप निश्चित करण्यात आले. सरपंच संतोष देशमुखांच्या हत्याप्रकरणीच्या सुनावणीत न्यायाधीशांनी न्यायाधीशांनी सर्व आरोपींना असलेल्या गुन्ह्याबाबत माहिती दिली. (पान २ वर)






# महानगरपालिकेची प्लास्टिकविरोधी कारवाई

## रामपुरी कॅम्प परिसरातून १२०० किलो प्लास्टिक जप्त

**अमरावती/प्रतिनिधी:-** महानगरपालिकेच्यावतीने शहर प्लास्टिकमुक्त ठेवण्यासाठी सातत्याने कठोर कारवाई करण्यात येत आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) व उत्तर झोन क्रमांक ०१ चे सहायक आयुक्त यांच्या आदेशानुसार उत्तर झोन क्रमांक ०१ अंतर्गत रामपुरी कॅम्प परिसरात विशेष प्लास्टिक जप्ती व दंडात्मक मोहीम राबविण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता आरको गॅरेज, पटवा चौक, मोरबाग, अमरावती येथे पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान आरको रोड लाईन्स गोडाऊन मध्ये १२ पोते प्लास्टिक कॅरीबॅग आढळून आल्या. तसेच गोडाऊनबाहेर उभ्या असलेल्या मोठ्या ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये ३३ मोठे पोते काळ्या रंगाच्या प्लास्टिक कॅरीबॅग साठविलेल्या आढळून आल्या.



तत्काळ अतिक्रमण विभागाचे प्रमुख योगेश कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ४५ पोते (अंदाजे १२०० किलो) प्लास्टिक कॅरीबॅग जप्त करण्यात आल्या असून संबंधितांकडून ५,००० दंड वसूल करण्यात आला. जप्त केलेला संपूर्ण माल कार्यशाळा विभागाच्या गोडाऊनमध्ये जमा करण्यात आला आहे.

या मोहिमेत प्लास्टिक पथक प्रमुख विनोद टांक, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, बिट पियून श्री. मयूर सारसर तसेच अतिक्रमण विभागाची संपूर्ण टीम सहभागी होती. महानगरपालिकेच्या वतीने नागरिक व व्यावसायिकांनी प्लास्टिक वापर टाळावा, अन्यथा कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रा. सचिन पंडित यांना पी.एचडी.



**अमरावती/प्रतिनिधी:-** शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेली संस्था म्हणून ओळख असलेल्या श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती येथील प्रशासकीय अधिकारी प्रा. सचिन पंडित यांनी इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न विदर्भ शासकीय ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथून ही पदवी संपादन केली.

डॉ. जयंत चौधरी (इंग्रजी विभाग) यांच्या मार्गदर्शनात 'अ क्रिटिकल स्टडी ऑफ जेंडर इक्वलिटी इन द सिलेक्ट नोवेल्स ऑफ सुधा मूर्ती' या प्रबंधावर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथून त्यांनी डॉक्टर पदवी प्राप्त केली. प्रा सचिन पंडीत हे उत्कृष्ट संघटक आणि प्रशासक असून चांगले प्रशिक्षक म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यांचे बिझिनेस कम्युनिकेशन ,हे पुस्तक प्रकाशित झाले असून त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

त्यांच्या यशाचे श्रेय ते त्यांचे मित्र परिवार, कुटुंबीय,आई-वडील त्यांची पत्नी व मुलगा तसेच वरिष्ठ आचार्य डॉ.कमलताई रा. गवई व श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावतीच्या अध्यक्ष कीर्तीताई अर्जुन, राजेश अर्जुन , धरम अर्जुन, संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस व श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट परिवाराला देतात. त्यांना पीएचडी मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. परिक्षा व मूल्यांकन संचालक नितीन कोळी,डॉ कमलाकर पायस, डॉ.मल्लू पडवाल, डॉ शीतल तायडे, प्रा प्रीतेश पाटील, प्राचार्य पियुष चक्रपाणी, डॉ प्रवीण वानखडे, डॉ नवल पाटील यांच्या सह श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट मधील प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## दुचाकीला अज्ञात वाहनाची धडक

त्यामुळे प्रचंड रक्तस्त्राव होऊन करीम शहा रहमानशहा व तमीजावी रहमानशहा यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन तिघांनाही ॲम्बुलन्स मध्ये टाकून उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे रवाना केले.

यासाठी सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल पंडागरे,रवी परतेती, प्रवीण धोटे यांचे सुद्धा सहकार्य लाभले. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी करीमशहा व तमीजाबी यांना मृत घोषित केले तर फारुख शहा करीम शहा यांना गंभीर अवस्थेत अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली स्कॉड विभागाचे पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर,पीएसआय राजू धुर्वे,छत्रपती करपते,स्वप्निल बायस्कर,अथर्व कोहळे हे अज्ञात वाहनाचा शोध घेत आहे.याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास आरंभीला आहे.

## पहिल्या दिवशी उमेदवारांकडून १०२६

अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने अर्ज उचलल्याचे चित्र आहे. महानगरपालिकेच्या ८७ जागेसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यासाठी आजपासून नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. ३० डिसेंबर पर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहे. २५ व २८ डिसेंबरला सुट्टी असल्याने त्यादिवशी नामांकन प्रक्रिया बंद राहणार आहे. उमेदवारांच्या सुविधेसाठी मनपाच्या वतीने ७ ठीकाणी अर्ज उचलण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. उत्तर झोन क्रमांक एक रामपुरी कॅम्प अंतर्गत प्रभाग १,२, २, दुसरे कार्यालय नवीन तहसील कार्यालय येथे राहणार असून प्रभाग ३, ४, ७, मध्य झोन क्रमांक दोन राजापेठ येथे प्रभाग क्रमांक ११, १२,१८ , पूर्व झोन क्रमांक तीन दस्तूर नगर येथे प्रभाग क्रमांक ८,९, १०,पाचवे कार्यालय महानगरपालिका शिक्षण विभाग अंबापेठ येथे करण्यात आले आहे. या ठिकाणी प्रभाग क्रमांक ६, १३, १७ येथील उमेदवार अर्ज उचलू शकतात. पश्चिम दोन क्रमांक पाच जुने तहसील कार्यालय येथे प्रभाग क्रमांक १४,१५, १६ व दक्षिण झोन क्रमांक ४ बडनेरा येथे प्रभाग १८, १९,२०, २१,२२ या प्रभागातील उमेदवारांनी आज अर्ज उचलले. ३० डिसेंबर पर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहे. ३१ डिसेंबर रोजी अर्जाची छाननी होईल. १ व २ जानेवारी रोजी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. ३ जानेवारीला उमेदवारांची अंतिम यादी व चिन्ह वाटप होऊन प्रचार सुरू होणार. पहिल्याच दिवशी उमेदवारांनी अर्ज उचलण्याला चांगला प्रतिसाद दिला आहे. यामुळे या निवडणुकीत जोरदार घामासान पाहायला मिळणार आहे. मनपा निवडणूक संदर्भात जोग स्टेडीयम प्रभाग क्र ८ अनु. जातीं SC महिला राखीव मधून पहिल्याच दिवशी उमेदवारी करिता नितु जयराज चौव्हाण यांची अर्जाची उचल केली.

**६ लाख ७७ हजार १८० मतदार-**या निवडणुकीत ६ लाख ७७ हजार १८० मतदार आपला हक्क बजावणार आहे. एकूण ७९७ केंद्रावर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी सात निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक विभागाच्या देखरेखित पूर्ण प्रक्रिया सुरू झालेली आहे.

## दर्यापूर-अंजनगाव मतदारसंघात

असल्याचे दिसून येत आहे.

खासदार बळवंत वानखडे लोकसभेवर निवडून गेल्यानंतर दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थेची पहिल्यांदाच निवडणूक झाली आहे. नगरपालिका निवडणुकी दरम्यान खासदार बळवंत वानखडे यांनी या निवडणूकीच्या माध्यमातून शहरी भागात पायाभरणी केली. अंजनगाव सुर्जी नगरपालिका निवडणुकीत खासदार बळवंत वानखडे यांनी दोन दिवसांत बैठका घेऊन निवडणूकी चे सर्व चित्रे पलटवले. कोणतीही सभा न घेता गुप्त भेटीचे नियोजन करून नगरपालिका निवडणुकीचा प्रचार केला आणि यशस्वी ठरले.

खासदार बळवंत वानखडे यांनी त्यांच्या मतदारसंघातील दर्यापूर व अंजनगाव सुर्जी नगरपालिकेवर निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. सोबतच जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची तालीम त्यांनी दाखवून दिल्यामुळे त्यांचे दर्यापूर अंजनगाव सुर्जी मतदारसंघावरील वर्चस्वही अधोरेखित झाले.

## कामात राम पाहणाऱ्या ग्रामीण

प्रक्रियेलाच छेद दिला जाईल. ही योजना सुरू करण्यात आली तेव्हा जगात मंदीचे सावट होते. अमेरिकेमधे सब प्राईम संकटाने तेथिल तसेच त्याद्वारे संपूर्ण जगातील अर्थव्यवस्थेचे दिवाळे निघाले होते. अशा वेळी तळागाळातील जनतेची खरेदी क्षमता वाढून आपल्या देशातील अर्थव्यवस्था सुधारण्याचा पाया घालण्यात या योजनेचा सिंहाचा वाटा होता. कोरोना काळात या योजनेचे महत्व सर्वांच्याच लक्षात आले. पण आता या योजनेत देखिल भांडवलदारी तत्वे घुसवण्यासाठी या योजनेत उपरोक्त स्वरूपाचे बदल करण्यात येत आहेत, अशी माकपची स्पष्ट धारणा आहे. त्यामुळे नवीन योजना रद्द करून जुनी मनरेगा सुरू ठेवण्याची तसेच त्यात पुरोगामी बदल करून जनतेला त्याद्वारे जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात यावा अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली. निवेदन देतेवेळी तालुका सचिव शाम शिंदे, शहर सचिव मोहसीन शेख, दिलीप महल्ले, विजय पाटील,प्रवीण गावनर, प्रवीण पुराण, मारोती बंड, शत्रुघ्न मगर, सय्यद राजिक, किशोर मसराम,बाबा भाई, संजय ढोके, किशोर शिंदे, राजगुरू शिंदे, शशिकला घोडाम, माधुरी वटी, अर्चना पुरसंगे, इंदिरा उईके यासह आदी उपस्थित होते

## कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थिनीचे

काढून व्हाट्सअप वर पाठवण्यासाठी म्हटले. यानंतर तिचा मोबाईल स्विच ऑफ झाला. मुलीचा फोन लागत नसल्याने वडील घाबरले आणि त्यांनी तळेगाव श्यामजी पंत आणि परिसरातील संपूर्ण क्षेत्रामध्ये तिचा शोध घेतला, पण ती नाही मिळाली. शेवटी त्यांनी तिवसा ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी कलम ७८,१३७(२) आणि पोस्को कलम ८,१२ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## बॅनरवर गुटखा खाऊन थुंकल्याने

चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचा दुग्धाभिषेक करण्यात आला. पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

**नागरिकांनी काढला निषेध मोर्चा-**

महापरिनिर्वाण दिनाचे बॅनरवर अज्ञात व्यक्तीने खोडसाळपणा केल्यामुळे बौद्ध व शिराळा येथील प्रतिष्ठित नागरिक यांनी निषेध मोर्चा काढुन शांतता मार्गाने निषेध केला. कोणतेही वाहन न अडविता शांततेच्या मार्गाने निषेध सभा घेण्यात आली. यावेळी कृउबास संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य मिंलिद तायडे, राष्ट्रवादीचे मनोज देशमुख, मंगेश काळमेघ, प्रहारचे शिवाजी खाडे, भाजपचे राजु गंधे, अरुण देशमुख, माजी सरपंच सचिन देशमुख, मारोतराव नागे, डीआर वानखडे, रुपरावजी तायडे, दिनेश तायडे अवधूत तायडे, सुरेशराव सुखदान, पोलीस पाटील प्रशांत ढोरे, सिध्दार्थ ततंरपाळे, शेखर तायडे, सत्यजित नितवणे, अजय तायडे, कपिल तायडे, तथा महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## प्रियकराने प्रेयसीवर केला चाकूने

शिवीगाळ करायचा.त्याच्या नेहमी अशा वागण्यामुळे पिडिता वैतागली होती. यामुळे तिने दीड महिन्यापूर्वी त्याच्याशी आपले नातेसंबंध तोडले आणि बोलणे बंद केले. रविवारी सायंकाळी ती आपल्या मैत्रिणीच्या मुलीची प्रकृती बरोबर नसल्याने तिच्या सोबत रुग्णालयात गेली होती. रुग्णालयातून परत येताना दोघ्या गाडगे महाराज समाधी मंदिर जवळ गुपचूप खात होत्या. त्यावेळी आरोपी तिथे आला त्याने पिडितेला शिवीगाळ केली आणि आपल्याजवळील चाकू काढून तिच्यावर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये ती जखमी झाली. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी पियुष चव्हाण विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने यांनी

गुल्हाने दाम्पत्य यांनी विजयी झाल्यानंतर तातडीने मुंबई येथे जाऊन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली व त्यांचा सत्कार केला. तथापि नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन केले.यावेळी नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने व नगरसेवक रवींद्र गुल्हाने यांनी मोर्शी शहरात नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात यावी तसेच शहरात भुयारी गटार योजना राबवण्यात यावी,क्रीडा संकुलात सुधारणा करण्यात यावी,शहरात सुसज्ज असे सांस्कृतिक भवन निर्माण करण्यात यावे,शहरात शिवछत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा असे मागणीचे पत्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सादर केले आहे.यावेळी कॅप्टन अभिजीत अडसूळ,सुनील डीके, श्याम देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

## शिवसेना उबाठाच्या संभावित

प्रवीण हरमकर, अर्चना धामणे, जयश्री कुरेकर, रामा सोळंके, संजय शेटे ,संजय गव्हाळे, मयुरी सागर ढोके, वैशाली विधाते ,पंजाबराव तायवाडे, अतुल सावरकर, सुषमा काकडे, सचिन ठाकरे, आदित्य ठाकरे, मयूर गव्हाणे, चैतन्य काळे, कैथवास, शारदा गोंडाने, अनिल सोनटक्के, पंकज चौधरी यांचे नाव समोर आले आहे. पार्टीच्या वतीने अनुभवी उमेदवारांसह यंदा नवीन चेह-यांना संधी देण्यात येणार आहे. प्रत्येक प्रभागात उमेदवार उतरण्याची पार्टीची तयारी आहे. शहर विकासाच्या मुद्द्यांसह नागरिकांच्या समस्येवर पक्षाच्यावतीने जोर देण्यात येणार आहे.

## घरफोड्या व लूटमार करणारे

सुचना स्थानिक गुन्हे शाखेस दिल्या होत्या.त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गुन्हयांची उकल करण्यासाठी मोर्शी हद्दीत प्रयत्नशील असतांना गुप्त बातमीदाराकडुन पथकास खात्रीशिर माहिती मिळाली की, पांढुर्णा येथील सराईत गुन्हेगार चरण भादा हा त्याचे एका साथीदारासह सिंभोरा परिसरात फिरत आहे. सदर आरोपी हा सराईत घरफोड्या असल्याने पथकाने चरणसिंह गब्बुसिंह भादा आणि रवी उर्फ रंजीत राजेश चव्हाण या दोघांना शिताफीने ताब्यात घेतले व कौशल्यपुर्ण विचारपुस दरम्यान त्यांनी दिलेल्या कबुलीवरुन १५ घरफोडी व लुटमारीचे गुन्हे उघडकीस आणुन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.त्यामध्ये आरोपींकडून घरफोडी व लुटमारीचे गुन्हयातील ७१ ग्रॅम सोने,किं. ९,४०,००० ,नगदी ५०,००० आणि गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटर सायकल किं. २५,००० याप्रमाणे एकुण १० लाख १५ हजार रु.किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींना पुढील कार्यवाहीसाठी पो स्टे मोर्शीचे ताब्यात देण्यात आले आहे.आरोपी चरणसिंग गब्बुसिंग भादा,रा.पांढुर्णा, मध्यप्रदेश हा अट्टल घरफोड्या असुन त्याचेवर महाराष्ट्र, मध्यप्रदेश,छत्तीसगढ राज्यामध्ये ५० चे वर घरफोडी व लुटमारीचे गुन्हे दाखल आहे. आरोपी विरुद्ध विविध कलमा अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे.सदर कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद,अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि सागर हटवार,पोलीस अंमलदार रविंद्र बावणे, बळवंत दाभणे,भुषण पेटे,पंकज फाटे,चालक संजय प्रधान मोर्शी येथील स्कॉड विभागाचे छत्रपती करपते,स्वप्निल बायस्कर यांचे पथकाने केली आहे.

## हिंगलाज देवी महोत्सव २७,२८

की या महोत्सवासाठी राज्यभरातील समाज बांधव हिंगलाजपूर मध्ये येणार आहे. संत आणि महंतांची विशेष उपस्थिती येथे राहणार आहे. महोत्सव अंतर्गत शनिवार २७ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता गोंधळ होणार आहे. रविवार २८ डिसेंबर रोजी अष्टमीला सकाळी ८ ते १० यज्ञ, होमवन , १० ते ११ पाहुण्यांचे स्वागत, ११ ते १२ संत महंतांचे दर्शन व दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद ठेवण्यात आलेला आहे. ३.३० वाजता महोत्सवाचा निरोप समारंभ होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून महोत्सवात महादेवराव साधनकर, अनिल मावळे, अरुण भावसार, राजेश कळमकर, नितीन ताकवले, राजेंद्र दखणे, पंकज भगत जाधव, वसंत सरांगे, वसंतराव सावंत उपस्थित राहणार आहे. महोत्सवात प्रमुख वक्ते म्हणून रामेश्वर जिराफे, योगिनी गुजर, श्रीराम गरजे, योगेश भावसार, सुभाषचंद्र बाहेकर, मोरेश्वर कट्यारमल गरजे, दिगांबर गढे मार्गदर्शन करणार आहे. महोत्सवामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये अनिल मावले, सुनील साधनकर ,योगेश भावसार, अरुण भावसार आदि उपस्थित होते.

## 'प्रसाधनगृह आणि डिजिटल ॲप'

हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरपालिका मोबाईल ॲपद्वारे 'एका क्लिकवर' तक्रार निवारण करणारे या ॲप तयार केले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्यासाठी नगरपालिकेच्या वतीने विशेष मोबाईल ॲप विकसित करण्यात येणार आहे. या ॲपद्वारे नागरिकांना त्यांच्या परिसरातील समस्या थेट फोटो सह अपलोड करता येणार असून, संबंधित विभागाकडून तातडीने कारवाई करून समस्या निकाली काढली जाणार आहे. यामुळे प्रशासन आणि नागरिकां मधील दरी कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शहरातील रस्त्यांची दुरवस्था, तसेच विविध विकासकामे अर्धवट अवस्थेत अडकून पडल्याच्या समस्यांवर प्राधान्याने उपाय केले जातील. रखडलेली सर्व विकासकामे तातडीने पूर्ण करून शहराच्या प्रगतीला गती दिली जाईल, असे आश्वासन नगराध्यक्षा उईके यांनी दिले. यवतमाळकरांनी दिलेल्या भरघोस मताबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास' या धोरणानुसार शहरातील प्रत्येक घटकाचा विकास साधण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न राहील.

**यवतमाळसाठी दामिनी पथकाची मागणी-** यवतमाळ शहरात महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र दामिनी–निर्भया पथक स्थापन करण्याची मागणी नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रियदर्शनी अशोक उईके यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, शहरातील सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, शाळा-महाविद्यालय परिसर, बसस्थानक तसेच गर्दीच्या भागांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनत आहे. महिलांवरील छेडछाड, गैरवर्तन व अन्य गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तत्पर व प्रभावी कारवाई करणारे स्वतंत्र दामिनी/निर्भया पथक कार्यरत असणे अत्यावश्यक आहे. अशा पथकामुळे घटनास्थळी तात्काळ मदत पोहोचून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवता येतील, असा विश्वास नगराध्यक्षा उईके यांनी व्यक्त केला आहे. राज्य शासनाने महिलांच्या सुरक्षिततेसाठी सकारात्मक निर्णय घ्यावा व यवतमाळ साठी तातडीने पथक स्थापन करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## मोर्शी पोलीसांनी रोखली अवैध

करून अवैध जनावरांची तस्करी करणारा मालवाहु ४०७ टेम्पो ज्यामध्ये आरोपी नामे शेख राजीक शेख अमीर (वय ४०) रा.ईस्लाम नगर वरूड जि. अमरावती याला पकडुन त्याचे ताब्यातुन २ वगार व १० हेले असे एकुण १२ नग जनावरे एकुण किं अं ८६००० तसेच मालवाहु ४०७ टेम्पो क्र. एम एच ४३ एफ ९७२९ किं अं ७००००० असा एकुण ७८६००० चा मुद्देमाल जप्त केला. प्राण्यांना अतिशय क्रूरतेने वागणुक देण्यास प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करून कार्यवाही करण्यात आली.तसेच जप्त जनावरे पिंपळखुटा मोठा येथील गौरक्षण मध्ये दाखल करण्यात आले. ही कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद , अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत ,उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले ठाणेदार पो स्टे मोशी यांचे नेतृत्वात पोउपनि आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार छत्रपती, करपते, स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे चालक अब्दुल हबीब यांनी केली आहे.

## हे हिंदू राष्ट्र आहे

सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया-सोशल मीडियावर हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. ख्रिसमसशी संबंधित वस्तू सोडून तुम्ही काहीही विका, आमचं काही म्हणणं नाही. पण तुम्ही जर हिंदू आहात तर या वस्तू का विकत आहात? इथून निघा असं सांगत या सगळ्यांना इथून हाकलण्यात आलं. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे. या व्हिडीओवर सोशल मीडियावरही विविध प्रतिक्रिया येत आहेत. मक्का मदिनाच्या ठिकाणी या वस्तू विकायची हिंमत दाखवाल का? असा प्रश्न विचारत काहींनी या कारवाईचं समर्थन केलं आहे. तर अनेकांनी टीका ही केली आहे. कथित भक्तांना पाहून देव जोरदार हसत असेल असं काही युजर्सनी म्हटलं आहे. जर हे तुमच्या राज्यात घुसून आले असतील तर यांना हाकललं पाहिजे असंही काहीजण म्हणत आहेत.

## ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ

तर तुम्ही त्या क्षेत्रातील सर्वोत्तम साहित्याकडे जावे. टीकेबद्दल, ते त्यांच्या स्वभावाप्रमाणेच सोप्या पण खोलवर बोललेः जर एखाद्या चांगल्या कामावर टीका केली गेली तर ती टीका तुमची सर्वात मोठी ताकद बनू शकते. कवितेची सर्वोत्तम टीका म्हणजे दुसरी, चांगली कविता लिहिणे.विनोद कुमार शुक्ल यांनी त्यांच्या जीवनातील अनुभवांवर चर्चा करताना सांगितले की, अपयश, चुका आणि टीका सर्वत्र असतात, परंतु त्या विखुरलेल्या भागात विखुरलेले असणे ही देखील चांगली गोष्ट आहे.'जरी तुम्हाला कोणाचा आधार मिळत नाही, तरीही एकटेच पुढे जात राहा. आशा ही जीवनाची सर्वात मोठी शक्ती आहे. माझ्यासाठी, लेखन आणि वाचन हे श्वाास घेण्यासारखे आहे.' त्यानंतर त्यांनी त्यांची एक प्रसिद्ध कविता, 'सबके साथ' वाचली, जी मानवतेमध्ये अंतर्निहित असलेल्या गहन सामूहिक सहानुभूतीला सामावून घेते.

## बांगलादेशातील हिंदू कुटुंबांची

आश्वासन दिले. पीडित कुटुंबांना २५ किलो तांदूळ, ५,००० टका रोख रक्कम आणि ब्लॅंकेट देण्यात आले.

**गेल्या आठवड्यात ७ वर्षांच्या मुलीला जिवंत जाळले-**बांगलादेशातील लक्ष्मीपूर सदर येथे १९ डिसेंबरच्या रात्री उशिरा काही उपद्रवींनी एका घराला बाहेरून कुलूप लावून पेट्रोल टाकून आग लावली. आगीत जिवंत जळल्याने एका ७ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला, तर तीन लोक गंभीर जखमी झाले. हे घर बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (BNP) चे नेते बिलाल हुसेन यांचे होते. पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना रात्री सुमारे १ वाजता घडली. आग लागल्याने बिलाल यांची ७ वर्षांची मुलगी आयशा अख्तर हिचा जागीच मृत्यू झाला. तर, बिलाल हुसेन आणि त्यांच्या इतर दोन मुली सलमा अख्तर (१६) आणि सामिया अख्तर (१४) गंभीररित्या भाजल्या. बिलाल यांच्यावर लक्ष्मीपूर सदर रुग्णालयात उपचार करण्यात आले, तर दोन्ही मुलींना गंभीर अवस्थेत ढाक्याला पाठवण्यात आले. गेल्या आठवड्यात १८ डिसेंबर रोजी ढाकाजवळच्या भालुका येथे हिंदू युवक दीपू चंद्र यांची मारहाण करून हत्या करण्यात आली होती. हल्लाखोरांनी त्यांच्यावर ईशनिंदेचा आरोप केला होता. ते येथीलच एका कापड कारखान्यात काम करत होते. त्यांनी फेसबुकवर धार्मिक भावना दुखावणारी टिप्पणी केली होती असा दावा करण्यात आला होता, परंतु तपासात अशा कोणत्याही टिप्पणीचे पुरावे आढळले नाहीत. बांगलादेशच्या रॅपिड ॲक्शन बटालियनचे कंपनी कमांडर मोहम्मद शम्सुज्जमान यांनी बांगलादेशी वृत्तपत्र द डेली स्टारला सांगितले होते की, असा कोणताही पुरावा मिळालेला नाही, ज्यामुळे दास यांनी फेसबुकवर असे काही लिहिले होते ज्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या जाउ शकल्या असत्या असे म्हणता येईल. दीपूच्या हत्येप्रकरणी आतापर्यंत १२ जणांना अटक करण्यात आली आहे. शम्सुज्जमान यांनी सांगितले की, स्थानिक लोक आणि कापड कारखान्यात दाससोबत काम करणा-यांकडूनही ईशनिंदेसंबंधी कोणतीही माहिती मिळालेली नाही.

## ठाकरे बंधूंच्या युतीची

युती स्वीकारली आहेत. कोणाच्या मनात संभ्रम नाही. तशा सूचना कार्यकर्त्यांना देण्यात आलेल्या आहेत. एकत्र येउन सर्व कामाला लागले आहेत. मनोमिलन झालेलं असून जागावाटपवर काल रात्री शेवटचा हात फिरवला गेला, असं संजय राउतांनी सांगितले. युती झालेली आहे, केवळ जागावाटपासंदर्भातली घोषणा बाकी आहे. आमच्यात जागावाटपावरून कोणताही विसंवाद नाही. वरळीमधील डोमममध्ये जेव्हा दोन भाउ एकत्र आले तेव्हाच युती झाली, असंही संजय राउत म्हणाले. आज रात्री युती जाहीर करायची किंवा मग उद्या, हे आत्ता ठरवू, असंही संजय राउतांनी जाहीर केलं.

## प्रा.जयंत विष्णू नारळीकर

विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातल्या उल्लेखनीय योगदानासाठी प्रदान करण्यात आला. तसेच न्यूट्रान बीमलाइन्स आणि सुपरकंडक्टिव्हिटी क्षेत्रातील योगदानासाठी (परमाणु उर्जा) डा. युसूफ मोहम्मद सेख (बीएआरसी), मुंबई यांसह - कृषी विज्ञानसाठीः डा. ज्ञानेंद्र प्रताप सिंह (आयसीएआर-नॅशनल ब्युरो ऑफ प्लांट जेनेटिक रिसोर्सेस, नवी दिल्ली) जीव विज्ञान क्षेत्रातील मानवी जीनोम सिक्वेन्सिंगद्वारे रोग संवेदनशीलता आणि इतिहासाचे संशोधना साठी डा. कुमारसामी थंगराज (सीएसआयआर-सीसीएमएम, हैदराबाद), रसायनशास्त्र क्षेत्रात स्वस्त पाणी शुद्धीकरण तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी प्रा. तलाप्पिल प्रदीप (आयआयटी मद्रास),प्रा अनिरुद्ध भालचंद्र पंडित (इंजीनियरिंग विज्ञान), ; प्रा. महान एमजे (गणित आणि कंप्यूटर विज्ञान); श्री जयन एन (अंतरिक्ष विज्ञान आणि प्रौद्योगिकी)यांना विज्ञान श्री पुरस्कार प्रदान करण्यात आले.विज्ञान युवा श्रेणीत विविध क्षेत्रांतून अनेक युवा संशोधकांना सन्मानित करण्यात आले, ज्यात भौतिकशास्त्रात प्रा. अमित कुमार अग्रवाल आणि प्रा. सुहृद श्रीकांत मोरे; गणित आणि संगणक विज्ञानात प्रा. सब्यसाची मुखर्जी आणि प्रा. श्वेता प्रेम अग्रवाल; अभियांत्रिकी विज्ञानात प्रा.. आर्कप्रभा बासू; वैद्यकीय क्षेत्रात डा. सुरेश कुमार; अंतराळ विज्ञानात अंकुर गर्ग; तंत्रज्ञान आणि नाविन्यात प्रा. मोहनशंकर शिवप्रकाशम, डा. जगदीस गुप्ता कपुगंती (कृषी विज्ञान); डा. सतेन्द्र कुमार मंगरौठिया (कृषि विज्ञान); देबार्का सेनगुप्ता (जैविक विज्ञान); डा. दीपा अगाशे (जैविक विज्ञान); डा. दिब्येंदु दास (रसायन विज्ञान); डा. वलीउर रहमान (पृथ्वी विज्ञान); प्रो. अर्कप्रवा बसु (इंजीनियरिंग विज्ञान) यांचा समावेश आहे. अरोमा मिशन टीमला सुगंधी पिकांच्या उच्च उत्पादन देणा-या जाती विकसित करून शेतक-यांचे उत्पन्न आणि ग्रामीण रोजगार वाढवल्याबद्दल विज्ञान टीम पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## कराड पहिल्यांदाच कोर्टात

संपूर्ण घटनाक्रम आरोपीला वाचून दाखवत हे तुम्हाला मान्य आहे का?, असा सवाल विचारला. न्यायाधिशांच्या या प्रश्नावर वाल्मिक कराडसह सर्व आरोपींनी आरोप मान्य नसल्याचे म्हटले. यावेळी वाल्मिक कराड पहिल्यांदाच न्यायालयासमोर स्वतःहून आरोप मान्य नसल्याचं बोलला. आता सदर प्रकरणी ८ जानेवारी रोजी पुढील सुनावणी होणार आहे. विशेष सरकारी वकील उज्वल निकम म्हणाले की, आज आरोप निश्चित केले आहेत. खंडणी मिळण्यास अडथळा केला म्हणून संतोष देशमुख यांचा खून केला. पुढील सुनावणी ८ जानेवारी रोजी होईल. आजही आरोपी वकिलांनी या खटल्यात डी फ?र डीले आणि डी फोर डीरेल केले गेले. प्रत्यक्ष पुराव्याचे काम लवकरच सुरू होईल. तीच तीच कारणे न्यायालयात मांडली जात होती. त्यामुळे न्यायालयाने आदेश करावा अशी विनंती केली. खटला लवकरात लवकर चालवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असं उज्वल निकम यांनी सांगितले.

९ डिसेंबर २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील केज तालुक्याच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या झाली होती. या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य ढवळून निघाले होते. सुदर्शन घुले, जयराम चाटे, श्रीकृष्ण आंधळे, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार या सहा आरोपींनी संतोष देशमुख यांना टाकळी शिवारात नेले. या ठिकाणापासून एका बाजूला सुदर्शन घुलेचे शेत आहे. त्याच ठिकाणी अत्यंत क्रूरपणे आरोपींनी सरपंच संतोष देशमुख यांना मारहाण केली. संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचे फोटो आरोपीने आपल्या मोबाईलमध्ये काढले होते. १५ व्हिडीओ आणि ८ फोटो आरोपीकडे मिळाल्याची नोंद आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २४ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# पोखरा योजनेतील भ्रष्टाचाराची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

## ■ जिल्हाधिकाऱ्यांनी दिले चौकशीचे आदेश ■ मोठा गैरप्रकार उघड होण्याची शक्यता

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**जिल्ह्यात सन २०१९ ते २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प ( पोखरा ) भाग - १ या योजनेत लाखों रुपयांचा गैरप्रकार झाला असल्याची ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वाशिम यांनी तात्काळ दखल घेऊन जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम यांना एका पत्रान्वे सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. परिणामी जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सबंधित अधिकाऱ्यांना सदर तक्रारीतील मुद्द्यांची सखोल चौकशी करून आठ दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.**



प्राप्त माहितीनुसार, रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकरी वसंत रामराव खडसे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार दाखल केली आहे. तद्वतच सदर तक्रारीच्या प्रतिलिपी राज्याचे प्रधान सचिव मुंबई, कृषी संचालक पुणे, सहसंचालक अमरावती आणि जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम आदी प्रशासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी सदर गंभीर तक्रारीची सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी उपविभागीय कृषी अधिकारी वाशिम यांच्याकडे सदर चौकशीची जबाबदारी दिली आहे.

सदर तक्रारीत तक्रारदार यांनी म्हटले आहे की, पोकरा योजने अंतर्गत कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक स्वार्थापाई योजनाच पोखरून टाकली आहे. एकीकडे विविध निकष लावून आणि त्रुटी काढून खऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांना योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवले. तर दुसरीकडे एकाच कुटुंबात लाखों रुपयांचा लाभ दिला आहे. त्याच धर्तीवर शेलुखडसे येथील ज्ञानेश्वर खडसे याने स्वतःच्या नावावर व वडील,भाऊ आणि आई यांच्या नावावर लाखों रुपयांचे अनुदान लाटले आहे. तर त्यात एकाच नावावर अनेक घटकांचा डबल लाभ घेतला आहे. विशेष बाब म्हणजे गट क्रमांक ६३३ मध्ये वडिलोपार्जित जुनी विहीर असताना आईच्या नावावर पोकरा योजनेतून गैरप्रकारे नवी विहीर घेतली आहे. तर ही नवी विहीर खोदण्याआधीच आई व वडिलांच्या नावावर गट क्रमांक ६३३ मध्ये कुठलेही फळझाड न लावता फळबाग लागवडीच्या नावाखाली लाखों रुपयांचे अनुदान हडपले आहे. इतकेच नव्हे; तर या महाशयाने शेलुखडसे येथील त्यांच्या मालकीच्या गट क्रमांक ६०२ ला लागून असलेल्या ग्राम पंचायत गावठाण हद्दीत अतिक्रमण करून सरकारी जागेत विहीर खोदली आहे. आणि गैरप्रकाराचा महाप्रताप म्हणजे सदर अतिक्रमित विहीर खाजगी सात बारावर नोंद करून घेतली आहे. आणि त्याच विहीरीच्या भरवशावर पोकरा योजनेतून १५ ते १६ लाख रुपयांचे नेटशेड घेतले आहे. पाईप लाईन, आणि मधून कृषीच्या अनेक योजनांचा गैरप्रकारे लाभ घेतला आहे.

**वस्तुस्थितीची योग्य तपासणी झाल्यास मोठे घबाड समोर येणार :** रिसोड तालुक्यातील पोकरा भाग एक मध्ये समाविष्ट असलेल्या अनेक गावात हीच बोंब असल्याची चर्चा जोर धरत आहे. अनेक गावातील पात्र लाभार्थ्यांना डावलून ठराविक दामाजीपंतांनाच बोगस लाभ दिला असल्याचे पुरावे समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर शेलुखडसे येथील गंभीर तक्रारीची योग्य तपासणी करून पारदर्शक चौकशी केल्यास मोठे घबाड समोर येणार असल्याचे बोलले जात आहे. शिवाय यातील दोषींवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून योग्य ती कारवाई केली तर, नुकत्याच सुरू झालेल्या पोखरा भाग दोन तरी सुरळीत पार पडेल. आणि खऱ्या लाभार्थ्यांनाच लाभ मिळेल असे सुध्दा सुज्ञ लोक बोलत आहेत.

शेलुखडसे येथील शेतकरी ज्ञानेश्वर गजानन खडसे आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करून शासनाची फसवणूक केली आहे. विशेष करून शेतकऱ्यांसाठी सदर योजना एक वरदान ठरणारी आहे. मात्र काही भ्रष्ट

या आधी जालना, संभाजी नगर, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात तक्रारीवरून तपासणी व चौकशी केली असता शेडनेट अनुदान, गोदामे, शेतमाल सुकवणी केंद्र, औजारे बँक इत्यादींच्या अनुदान वाटपात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे सिद्ध झाले आहे. सदर चौकशी समितीने केलेल्या तपासणीत ५६ लाख गैरप्रकार आढळून आले होते. त्याच धर्तीवर आपण ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार केली आहे. माझ्या गंभीर तक्रारीची सखोल व पारदर्शक चौकशी होईल अशी अपेक्षा आहे !

**वसंत रामराव खडसे,** ( तक्रारदार शेतकरी, शेलुखडसे )

# निवडणूक आचारसंहितेत अवैध दारूविरोधात धडक कारवाई



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत अवैध दारू निर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात कठोर पावले उचलण्यात येत असून, त्याच अनुषंगाने दि. २३ डिसेंबर रोजी वाशिम जिल्ह्यात विशेष धडक मोहिम राबविण्यात आली. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अमरावती विभागाचे विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवलकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई यशस्वीरीत्या पार पडली.

या विशेष मोहिमेअंतर्गत वाशिम तालुक्यातील मौजे मोहगव्हाण व सुरकुंडी (शेतशिवार परिसर), तालुका व जिल्हा वाशिम येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिक पद्धतीने छापे टाकत अवैध हातभट्टी दारू निर्मितीचे समूळ उच्चाटन करण्याची कारवाई केली.

या कारवाईदरम्यान एकूण सहा गुन्हे नोंदविण्यात आले असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

कारवाईत सुमारे ६० लिटर गावठी दारू, दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारा ४ हजार ८७५ लिटर मोहासडवा (रसायन) तसेच हातभट्टीसाठी लागणारे इतर साहित्य हस्तगत करण्यात आले. जप्त केलेल्या सर्व मुद्देमालाची एकूण अंदाजे किंमत १ लक्ष ९१ हजार ९००/- इतकी आहे. निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे.

# अकोला गार्डन क्लबच्या पुष्पप्रदर्शनात सागर प्रधान यांची चॅम्पियन ट्रॉफीवर मोहोर



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

अकोला गार्डन क्लब व महाबीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय पुष्पप्रदर्शनाचा आज उत्साहात समारोप झाला. २१ तारखेला प्रदर्शन पाहण्यासाठी अकोलेकरांनी मोठी गर्दी केली होती. शहरातील पुष्पप्रेमी व वृक्षप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग या प्रदर्शनात पाहायला मिळाला. यंदा तब्बल १२०० स्पर्धकांनी विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला.

एकूण ५२ विविध श्रेणींमध्ये पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यामध्ये प्रथम पारितोषिकाची (चॅम्पियन ट्रॉफी) मानकरी सागर प्रधान ठरले. द्वितीय पारितोषिक महाबीजला, तर तृतीय पारितोषिक अनुराधा ढवळे यांना मिळाले. अतिशय प्रतिष्ठेचा मानला जाणारा ‘किंग ऑफ रोज’ पुरस्कार अनुराधा ढवळे यांनी पटकाविला. ‘क्वीन ऑफ रोज’चा सन्मान ज्योती कमलेश कोठारी, ‘प्रिन्स ऑफ रोज’ रामेश्वर लाड, तर ‘प्रिन्सेस ऑफ रोज’ हा पुरस्कार पुन्हा अनुराधा ढवळे यांनी मिळविला.

प्रियांका पडगिलवार, राजेश लोहिया, ज्योती कमलेश कोठारी व शारदा डोंगरे यांना बहुसंख्य बक्षिसे मिळाली. संस्थात्मक गार्डन या श्रेणीत प्रभात किड्स शाळेने प्रथम पारितोषिक पटकाविले.

समारोपीय कार्यक्रमाला महाबीजचे संचालक डॉ. रणजीत सपकाळ, प्रसिद्ध व्यावसायिक नितीन खंडेलवाल, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस अधिकारी मनोज केदारे तसेच अकोला गार्डन क्लबचे संस्थापक सदस्य वसंतबाबू खंडेलवाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. वैशाली पाटील यांनी केले.

अकोला गार्डन क्लबचे विद्यमान अध्यक्ष संजय शर्मा यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सुवर्णमहोत्सवी वर्षाचे अध्यक्ष अजय सेंगर, उपाध्यक्ष सुधीर राठी, जयप्रकाश पाटील, शरद कोकाटे, सचिव श्याम गोटफोडे यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला पदाधिकाऱ्यांसह सर्व कार्यकर्त्यांनी प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

शहरातील गणमान्य व्यक्तींसह नागरिकांनी शेवटच्या दिवशीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावत पुष्पप्रदर्शनाला भरभरून प्रतिसाद दिला.

# संत गाडगेबाबांची पुण्यतिथी साजरी

**कारंजा लाड :** निष्काम कर्मयोगी, समाजसुधारक श्री संत गाडगेबाबांची ६९ वी पुण्यतिथी दि. २० डिसेंबर रोजी कारंजा लाड येथील श्री भायजी महाराज वृद्धाश्रमात भक्तीभावाने व विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरी करण्यात आली.

‘देवकी नंदन गोपाला, गोपाला गोपाला’च्या गजरात कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी ज्येष्ठ नाट्यकलावंत शिवमंगल आप्पा राऊत यांनी संत गाडगेबाबांच्या वेशभूषेत उपस्थितांना बाबांचा संदेश दिला. अधिक्षिका सौ. पूजा राठोड यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला. संत परंपरा जपण्यासाठी व संत विचार जनमानसात रुजवण्यासाठी डेबुजी युथ ब्रिगेड महाराष्ट्रचे संस्थापक राहुल वरणकर यांनी संत गाडगेबाबांची दशसूत्रीसह प्रतिमा वृद्धाश्रमास भेट दिली. या प्रतिमेचे अनावरण श्री विश्वनाथ राऊत (अध्यक्ष, संत गाडगेबाबा नागरी सहकारी पतसंस्था), श्री अविनाश नांदगावकर (माजी सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, कारंजा) व ह.भ.प. गोपाल महाराज ठिल्लोकर यांच्या करकमलांद्वारे करण्यात आले. त्यानंतर विधीवत पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सदानंद तिडके होते. प्रमुख उपस्थितीत अविनाश नांदगावकर, विश्वनाथ राऊत, ह.भ.प. गोपाल महाराज ठिल्लोकर, तसेच मान्यवर उपस्थित होते.

# होतकरू विद्यार्थ्यांना आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्थेतर्फे विद्याश्री शिष्यवृत्ती प्रदान



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

स्थानिक आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था, वाल्हई गेल्या १२ वर्षांपासून ग्रामीण भागातील होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना विद्याश्री शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सातत्याने शैक्षणिक साहित्य व आर्थिक सहाय्य देत आहे. उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांची शैक्षणिक वाटचाल खंडित होऊ नये, यासाठी संस्था आर्थिक मदत सुध्दा उपलब्ध करून देते. या उपक्रमांतर्गत जनता विद्यालय, कवठळ येथे १६ डिसेंबर रोजी मुख्याध्यापक शेखर देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली, आदीशक्ती संस्थेचे कार्यक्रम समन्वयक हेमंत पापळे व गोपाल कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या कार्यक्रमात तीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश प्रदान करण्यात आले.

यामध्ये ओम शंकर घोडे याला प्रथम वर्ष डिप्लोमा – इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन, शासकीय तंत्रनिकेतन, वाशीम साठी रु. १५,००० आर्थिक सहाय्य देण्यात आले. ओम लहान असतानाच त्याचे वडील वारले. त्याची आई शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहे. कवठळ येथील मामांकडे राहून जनता विद्यालयामधून ओमने आपले शालेय शिक्षण घेतले. नववीपासून संस्थेने ओमला शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून मदत केली. यावर्षी दहावीत त्याने ८७.८०% मिळवून तंत्रनिकेतनला प्रवेश घेतला. त्याने शिक्षण आत्मविश्वासाने पूर्ण करावे यासाठी संस्थेतर्फे हे आर्थिक सहाय्य देण्यात आले.

अस्मिता मुकिंद ढोरे हिला प्रथम वर्ष बी.ई. – विद्युत अभियांत्रिकी, जेएसपीएम राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे साठी रु. २५,००० आर्थिक सहाय्य देण्यात आले.

# अकोला परिमंडळात वीज चोरट्यांना महावितरणचा दणका

## - आठ महिन्यात १५२० वीज चोरीच्या घटना उघड
## - वीज चोरी विरोधात मोहिम अधिक व्यापक होणार; मुख्य अभियंता राजेश नाईक

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

अकोला परिमंडळात गेल्या आठ महिन्यात वीज चोरीविरोधात महावितरणकडून राबविण्यात आलेल्या व्यापक मोहिमेत १५२० वीज चोरीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. या प्रकरणांतून एकूण ७ कोटी ८३ लाख रुपयांची आकारणी करण्यात आली असून ७ कोटी ७ लाख रुपये वसूल करण्यात महावितरणला यश आले आहे. वीज चोरी विरोधात मोहिम अधिक तीव्र करण्याचे निर्देश मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी दिले आहे.

थेट वीज वाहिनीवर हुक टाकून वीज जोडण्या, मीटरमध्ये छेडछाड करून अनधिकृत वीज वापर करणाऱ्यांवर अकोला परिमंडळाअंतर्गत अकोला, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यात व्यापक मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेमुळे वीज चोरांचे धाबे दणाणले असून, वितरण व्यवस्थेतील नुकसान कमी होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे भविष्यातही वीज चोरीविरोधात कठोर कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे महावितरण प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

एप्रिल २०२५ पासून म्हणजे गेल्या आठ महिन्यात उघड करण्यात आलेल्या वीज चोरीच्या प्रकरणामध्ये १५२० ग्राहकांनी थेट वीज चोरी किंवा मीटरशी छेडछाड केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. विद्युत कायदा २००३ कलम १३५ अंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईत वीजबिलासह दंडात्मर कारवाईपोटी ७ कोटी ८३ लाख रूपये आकारण्यात आले असून १३२४ प्रकरणात ७ कोटी ७ लाख रूपयाची वसूली करण्यात आली असून वीजबिलासह तजजोड शुल्क न भरल्याने १० प्रकरणात वीज चोरीसाठी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**जिल्हानिहाय उघड झालेली वीज चोरी :** महावितरणच्या अकोला परिमंडळाअंतर्गत येत असलेल्या अकोला, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यापैकी सर्वात जास्त म्हणजे २ कोटी ९६ लाखाच्या ७५१ वीज चोऱ्या बुलडाणा जिल्ह्यात उघड झाल्या आहेत. त्यानंतर अकोला जिल्ह्यात २ कोटी ५८ लाख रूपयाची ४९९ वीज चोरीची प्रकरणे असून वाशीम जिल्ह्यात २७० प्रकरणात २ कोटी २९ लाख रूपयाची वीज चोरी झाल्याचे उघड झाले आहे.



**अशी होते दंडात्मक कारवाई :** वीज मीटर मध्ये फेरफार अथवा छेडखानी करणे हा विद्युत विद्युत २००३ नुसार गुन्हा असून या अंतर्गत संबंधित वीज ग्राहकावर कलम १३५ अन्वे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो. तसेच या ग्राहकांना मीटर रीडिंगच्या दुप्पट रक्कम आकारण्यात येते. त्याचबरोबर प्रति केडब्ल्यू/एचपी नुसार औद्योगिक ग्राहकावर १० हजार रुपये, वाणिज्यिक ग्राहकावर ५ हजार रुपये, कृषी ग्राहकावर १ हजार रुपये तर इतर वर्गवारीतील ग्राहकावर २ हजार रुपये याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येते.

**विद्युत कायद्यात शिक्षेची तरतूद :** तसेच गुन्हा सिद्ध झाल्यास ३ वर्षा पर्यंतच्या शिक्षेची तरतूद वीज कायद्यात आहे. वीज मीटर मध्ये फेरफार करण्यासाठी प्रवृत्त व सहकार्य करणाऱ्या विरुद्ध विद्युत कायद्यातील कलम १५० नुसार गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

**कारवाईदरम्यान अडथळा आणू नये :** वीज चोरीमुळे होणाऱ्या अतिरिक्त वीज वापराचा परिणाम होऊन महावितरणची यंत्रणा अतिभारीत होवून सुरळीत वीज पुरवठ्याला अडथळा निर्माण होतो.याशिवाय महावितरणला करोडो रूपयाचे आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. त्यामुळे महावितरणने एक्शन मोडवर कारवाई सुरू केली असून, या कारवाईदरम्यान अडथळा न आणता सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की श्री. सीताराम अयोध्याप्रसाद अहेरवार, वय ४२ वर्षे, रा. रविदास नगर, कारंजा, ता. कारंजा, जि. वाशीम यांनी श्री. मयूर रमेशराव अढाऊ यांचेकडून मौजे भिलखेडा, ता. कारंजा, जि. वाशीम येथील शेती सर्वे नं. ४०/२ मधील प्लॉट क्र. ६, क्षेत्रफळ १४९.७० चौ.मी. (१६१०.७७ चौ.फुट) हा खुला निवासी प्लॉट खरेदी दस्त क्र. ४५९९/२०१८, दिनांक २९/०९/२०१८ नुसार कायदेशीररित्या खरेदी केलेला असून सदर मालमत्तेवर त्यांचा निर्विवाद मालकी हक्क व ताबा आहे.

सदर मालमत्तेचे पूर्वीचे मालक श्री. मयूर रमेशराव अढाऊ यांनी ही मालमत्ता श्री. नितीन रमेशलाल काकानी यांचेकडून खरेदी दस्त क्र. ३७००/२०१३, दिनांक २०/०७/२०१३ नुसार खरेदी केली होती व त्या दस्ताची मूळ प्रत आमचे पक्षकारास प्राप्त झालेली होती मात्र सदर खरेदी दस्त क्र. ३७००/२०१३ ची मूळ प्रत दिनांक २३/१२/२०२५ रोजी कारंजा ए.पी.एम.सी. ते कारंजा बायपास परिसरात आमचे पक्षकाराकडून गहाळ झाली असून याबाबत कारंजा शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

तरी सदर खरेदी दस्त क्र. ३७००/२०१३ कोणास आढळून आल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**पत्ता : श्री. सीताराम अयोध्याप्रसाद अहेरवार,**
रा. रविदास नगर, कारंजा, ता. कारंजा, जि. वाशीम
मो. क्र. ७६२०४७६९२८

दि. २४/१२/२०२५
स्थळ : कारंजा, जि. वाशीम

**पक्षकारातर्फे**
**ॲड. सुजय दिलीप राऊळ**


# ‘चकाचक’ लाइट्समुळे अपघातांचा धोका
## वाहनांविरूद्ध कारवाईकडे पोलिसांचे होतेयं दुर्लक्ष

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

तालुक्यातून गेलेल्या समृद्धी महामार्ग राष्ट्रीय महामार्गासह इतर प्रमुख राज्य मार्ग आणि ग्रामीण मार्गावर रात्रीच्या वेळी प्रवास करणे अधिक धोकादायक बनले आहे. चारचाकी, सहाचाकी वाहनांसोबतच कार, ट्रॅव्हल्स, ऑटोरिक्षा, माल वाहतूक करणारे मोठे ट्रक, टँकर आणि मिनीडोर यांसारख्या लहान व्यावसायिक वाहनांमध्ये कंपनीने दिलेल्या प्रमाणित लाइट्सऐवजी अति-पॉवरचे एलईडी किंवा एचआयडी लाइट्स बसवण्याचा ट्रेंड वाढला आहे. या ’चकाचक’ लाइट्समुळे समोरून येणाऱ्या वाहनाचे चालक तात्पुरते अंधत्व अनुभवत असल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे.

विशेषतः राष्ट्रीय महामार्गावरून दिवस-रात्र मोठी वाहतूक सुरू असते. रात्रीच्या वेळी, विरुद्ध दिशेने येणाऱ्या मोठ्या वाहनांचे हे बेकायदेशीर, तीव्र प्रकाशझोत थेट समोरच्या चालकाच्या डोळ्यांवर पडतात. या लाइट्सची पॉवर प्रमाणित क्षमतेपेक्षा खूप जास्त असल्याने, समोरच्या चालकाला रस्त्यावरील खाचखळगे, दुभाजक, पादचारी किंवा रस्त्याच्या कडेला उभी असलेली वाहने स्पष्टपणे दिसत नाहीत. ?

डोळे दीपल्यामुळे वाहनचालक नियंत्रणाबाहेर जातो. त्यामुळे भीषण अपघात घडत आहेत.यामुळे रस्ते अपघातांची शक्यता लक्षणीय वाढली असून, अनेक निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात येत आहे.हा गंभीर प्रकार पांढरकवडा शहराच्या अंतर्गत रस्त्यांपासून ते राष्ट्रीय महामार्गापर्यंत सर्वत्र दिसत असतानाही, परिवहन विभाग आणि स्थानिक वाहतूक पोलिस या समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप प्रवासी आणि स्थानिक नागरिक करत आहेत.



**कारवाई करण्याची मागणी :** परिवहन विभाग व वाहतूक पोलिसांनी राष्ट्रीय महामार्ग , राज्य मार्ग व इतर मार्गावर रस्ते सुरक्षा पूर्ववत करण्यासाठी तपासणी मोहीम राबवून पावले उचलणे गरजेचे आहे. अनधिकृत लाइट्स काढून टाकण्याची सक्ती करून, मूळ प्रमाणित लाइट्स बसवण्यास भाग पाडावे. जे दुकानदार अशा अनधिकृत आणि धोकादायक लाइट्सची विक्री आणि स्थापना करत आहेत, त्यांच्यावरही कठोर कारवाईची गरज आहे.

**चालकांची डोकेदुखी वाढली :** अनेकदा या अपघातांमध्ये गंभीर दुखापत किंवा मृत्यूही होत आहे. शहरांतर्गत रस्त्यावर ऑटोरिक्षा आणि मिनीडोरसारख्या वाहनांनी लावलेले हे लाइट्सदेखील दुचाकी आणि इतर लहान वाहनांच्या चालकांसाठी डोकेदुखी ठरले आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९ ■ बुधवार, २४ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# आचारसंहिता संपताच वर्ध्याचे तीन महत्त्वाचे प्रश्न मार्गी

## -पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा निर्णायक पुढाकार

**-रामनगर लीज फ्री होल्डचा शासन निर्णय, ११ ग्रामपंचायतींसाठी घनकचरा प्रकल्पाची जागा, रामनगर पोलीस ठाण्याला हक्काची जागा**

**वर्धा । जनमाध्यम**

आचारसंहिता संपताच वर्धा शहर व लगतच्या ग्रामीण भागातील अनेक वर्षांपासून रखडलेले तीन महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागले असून, यामध्ये पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या निर्णायक भूमिकेची ठळक छाप दिसून येते. रामनगर येथील शेकडो लीजधारकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला अखेर न्याय मिळाला असून, लीज भूखंड फ्री होल्ड करण्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यासोबतच शहरालगतच्या ११ ग्रामपंचायतींसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, रामनगर पोलीस ठाण्यालाही अखेर स्वतःची हक्काची जागा मिळाली आहे.

**रामनगर लीजधारकांना दिलासा : फ्री होल्डचा शासन निर्णय**

वर्धा शहरातील रामनगर परिसरात गेल्या एक दशकापासून शेकडो कुटुंबे लीजच्या जमिनीवर वास्तव्यास होती. लीज नूतनीकरण व कायमस्वरूपी मालकी हक्क मिळावा, यासाठी नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. मात्र हा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिला होता. आमदार असताना डॉ. पंकज भोयर यांनी प्रथम लीज नूतनीकरणाचा प्रश्न मार्गी लावला. त्यानंतर लीजची जमीन फ्री होल्ड करण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

त्यांच्या प्रयत्नांना यश येत मंत्रिमंडळ बैठकीत फ्री होल्डचा निर्णय जाहीर झाला होता. मात्र नगरपालिकेच्या आचारसंहितेमुळे शासन निर्णय निघू शकला नव्हता. आचारसंहिता संपताच डॉ. भोयर यांनी जातीने लक्ष घातल्याने नगर विकास विभागाने दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सर्व्हे क्रमांक १०४, ११० व ११४ मधील निवासी भूखंड कायमस्वरूपी मालकी हक्काने (फ्री होल्ड) करण्याचा शासन निर्णय निर्गमित केला. त्यामुळे रामनगरातील शेकडो भूखंडधारकांचे स्वप्न अखेर पूर्ण झाले आहे.



**रामनगर पोलीस ठाण्याला हक्काची जागा**

शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रामनगर येथे पोलीस ठाणे सुरू करण्यात आले होते. मात्र स्वतःची जागा नसल्याने हे ठाणे नगरपालिकेच्या जागेवर कार्यरत होते. पोलीस ठाण्याला कायमस्वरूपी जागा मिळावी, यासाठी पालकमंत्र्यांनी पाठपुरावा केला. त्यानुसार नगरपालिकेच्या मालकीच्या शिट क्र. ६४ मधील एकूण २४,७१४.८० चौ.मी. क्षेत्रापैकी १,६३५.९३ चौ.मी. जागा रामनगर पोलीस ठाण्यासाठी वर्ग करण्यात आली. याबाबत नगर विकास विभागाने दि. २३ डिसेंबर रोजी आदेश निर्गमित केला असून, आता रामनगर पोलीस ठाणे स्वतःच्या जागेवर कायमस्वरूपी कार्यरत राहणार आहे.

**११ ग्रामपंचायतींसाठी घनकचरा व्यवस्थापनाला चालना**

वर्धा शहरालगतच्या ११ ग्रामपंचायतींमध्ये मागील काही वर्षांत झपाट्याने शहरीकरण झाले आहे. परिणामी घनकचरा व्यवस्थापनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. ग्रामपंचायतींकडे स्वतंत्र जागा नसल्याने कचरा व्यवस्थापन अडचणीत आले होते. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या पुढाकारातून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

नगरपालिकेच्या मालकीची इंझापूर येथील सर्व्हे क्र. १३ मधील चार एकर जागा ११ ग्रामपंचायतींसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यासाठी जिल्हा परिषदेला तीन वर्षांच्या भाडेपट्ट्यावर हस्तांतरित करण्यास नगर विकास मंत्रालयाने मान्यता दिली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे पालकमंत्र्यांकडून आभार**

रामनगर लीज फ्री होल्ड, ११ ग्रामपंचायतींसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व रामनगर पोलीस ठाण्याला हक्काची जागा मिळाल्याबद्दल पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले.

---

वर्ध्यात 'नवा शेरिफ' दाखल

# सौरभकुमार अग्रवाल यांनी स्वीकारला पोलिस अधीक्षकपदाचा पदभार



**-अनुराग जैन यांची नागपूरला बदली; कायदा-सुव्यवस्थेला नवी धार देण्याचे संकेत**

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्याच्या पोलिस प्रशासनात मंगळवारी महत्त्वाचा बदल झाला. जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांची पोलिस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण, नागपूर येथे बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी पुणे येथील गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मंगळवार, २३ डिसेंबर रोजी सौरभकुमार अग्रवाल यांनी अधिकृतपणे वर्धा जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकपदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताच त्यांनी वरिष्ठ अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, गुन्हेगारीवर कठोर कारवाई, महिलांची सुरक्षितता, तसेच सामान्य नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

गुन्हे अन्वेषण विभागातील अनुभवाच्या जोरावर जिल्ह्यातील प्रलंबित गुन्ह्यांचा छडा लावणे, अवैध धंद्यांवर कडक कारवाई आणि पोलिस प्रशासन अधिक गतिमान करण्याचे संकेत नव्या एसपींनी दिले आहेत. नव्या नेतृत्वामुळे वर्धा जिल्ह्यात पोलिसिंगला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

दारूचा धंदा, पोलिसांचा दणका

# अवैध विदेशी दारूवर छापा; ५.६३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**-आरोपी रंगेहाथ अटकेत, चारचाकी कारसह दारूचा साठा पोलिसांच्या ताब्यात**



**वर्धा । जनमाध्यम-** वर्धा जिल्ह्यात अवैध दारू वाहतुकीचे जाळे उध्वस्त करण्यासाठी सावंगी मेघे पोलिसांनी थेट मैदानात उतरून जोरदार कारवाई केली आहे. समतानगर झोपडपट्टी, नागठाणा परिसरात करण्यात आलेल्या छाप्यात विदेशी दारूचा मोठा साठा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी चारचाकी कार असा एकूण ? ५ लाख ६३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत सुशांत राजू खोब्रागडे (वय २४, रा. विक्रमशिला नगर, वर्धा) या तरुणाला रंगेहाथ अटक करण्यात आली आहे.

सावंगी मेघे पोलीस स्टेशनचे पथक नाकाबंदी व पेट्रोलिंग करीत असताना मुखबिराकडून खात्रीशीर माहिती मिळाली. आरोपी हा आपल्या ताब्यातील सिल्व्हर रंगाच्या मारुती सुझुकी अल्टो (MH-३१ CR ४३७७) या वाहनातून विदेशी दारू घरात साठवत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी पंच व स्टाफसह तात्काळ कारवाईचे चक्र फिरवले. खबऱ्याच्या माहितीनुसार आरोपी दारूचा माल घरात नेत असतानाच पोलिसांनी त्याला थांबवले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता ऑफिसर चॉईस कंपनीच्या १८० मि.ली.च्या ९६ शिश्या आणि रॉयल स्टॅग कंपनीच्या १८० मि.ली.च्या ९६ शिश्या असा विदेशी दारूचा साठा आढळून आला. पोलिस इतक्यावरच थांबले नाहीत. आरोपीच्या घराची झडती घेतली असता तेथेही दारूचा साठा आढळून आला. घरात ठेवलेल्या रॉयल स्टॅग कंपनीच्या १८० मि.ली.च्या तब्बल २४० शिश्या पोलिसांनी जप्त केल्या. याशिवाय अवैध दारू वाहतुकीसाठी वापरलेली अंदाजे ? ४ लाख किंमतीची चारचाकी कार देखील ताब्यात घेण्यात आली. विनापरवाना विदेशी दारूची साठवणूक व वाहतूक केल्याप्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

सदर धडक कारवाई सावंगी मेघे पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या नेतृत्वाखाली पोह अभय खोब्रागडे, आकाश चुगंडे, पोशी शाम सलामे, गौरव नरताम, अमोल पवार आदी कर्मचाऱ्यांनी केली.अवैध धंद्यांविरोधात पोलिसांचा हा दणका पुढेही सुरूच राहणार असल्याचा स्पष्ट इशारा यानिमित्ताने देण्यात आला आहे.

---

# बालरुग्ण विभागाशेजारी आगीचा थरार; तत्पर अग्निशमन कारवाईने मोठी दुर्घटना टळली

**-सामान्य रुग्णालयातील स्टोअर रूमला आग, १० रुग्णांसह ३३ जणांचे सुरक्षित स्थलांतर**

**वर्धा जनमाध्यम :** येथील सामान्य रुग्णालयाच्या इमारत क्रमांक दोनमध्ये मंगळवारी दुपारी २, वाजताच्या सुमारास अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. इमारतीच्या दुसऱ्या माळ्यावर असलेल्या स्टोअर रूममध्ये ही आग लागली होती. विशेष म्हणजे ही स्टोअर रूम बालरुग्ण विभागाच्या अगदी शेजारी असल्याने काही काळ रुग्ण, नातेवाईक व कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, वेळीच आग लक्षात येऊन तत्काळ उपाययोजना केल्याने मोठी दुर्घटना टळली.

आगीमुळे स्टोअर रूममधील महत्त्वाचे कागदपत्रे, रेकॉर्ड तसेच औषधांचे बॉक्स जळून खाक झाले असून आर्थिक नुकसान झाले आहे. आगीचा दाट धूर संपूर्ण इमारतीत पसरू लागल्याने रुग्णालय प्रशासनाने प्रसंगावधान राखत तातडीने रुग्णांचे स्थलांतर सुरू केले. यामध्ये एकूण १० रुग्णांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले, तर रुग्ण व नातेवाईक मिळून तब्बल ३३ जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले.



सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही.

आग लागल्याचे लक्षात येताच सुरुवातीला रुग्णालयातील कर्मचारी व उपस्थित नागरिकांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तात्काळ वर्धा नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला माहिती देण्यात आली. अग्निशमन दल घटनास्थळी दाखल होताच खबरदारीचा उपाय म्हणून इमारतीचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आला. त्यानंतर आग विझविण्याचे काम हाती घेत काही वेळातच आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दल व संबंधित अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. या इमारतीच्या तळमजल्यावर क्ष-किरण व सिटी स्कॅन विभाग, पहिल्या माळ्यावर स्त्री शल्य विभाग तर दुसऱ्या माळ्यावर बालरुग्ण विभाग आहे. बालरुग्ण विभागालगतच आग लागल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली होती; मात्र प्रशासनाच्या सतर्कतेमुळे आणि अग्निशमन दलाच्या तत्पर कारवाईमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.

आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन विभागातील मोहन ढोके, प्रदीप तराळे व गौरव शेगावकर यांनी अथक परिश्रम घेतले. दरम्यान, शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आग लागल्याची माहिती मिळताच रुग्णांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले असून कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी दिली.

---

# भरधाव कारच्या धडकेत वर्ध्यात दुचाकीस्वार ठार, मित्र गंभीर जखमी

**-कामावरून परत येत असताना दुचाकीवरील दोन मित्रांना कारने दिली जोरदार धडक**

**वर्धा जनमाध्यम :** मंगळवार, २३ डिसेंबर सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास सालोड (हिरापूर) शिवारात भीषण अपघात घडला. देवळी येथील कंपनीतून काम करून परत येत असलेल्या सुजित वसंत झांबरे (वय ३८) रा. बरबडी आणि त्याचा मित्र यांची दुचाकी भरधाव कारच्या धडकेत फेकली गेली. या अपघातात सुजित झांबरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर मित्र गंभीर जखमी झाला आणि त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



माहितीनुसार, सुजित झांबरे एम. एच. ३२ डब्ल्यू. ७५१४ क्रमांकाच्या दुचाकीवर मित्रासह जात होता. वळणमार्ग ओलांडत असताना महामार्गावरून येणाऱ्या एम. एच. १२ यू. ६३५८ क्रमांकाच्या कारने त्यांना जबर धडक दिली. धडके इतकी भयंकर होती की दुचाकी काही अंतरावर फेकली गेली आणि दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले.

अपघाताची माहिती मिळताच मोर्शी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. जखमी मित्रावर तातडीने प्राथमिक उपचार सुरू आहेत. वृत्तलिहिस्तोवर जखमीचे नाव अद्याप समोर आलेले नाही. पोलिसांनी अपघाताची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

या अपघातामुळे सालोड परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

---

# अखेर वर्ध्यातून रविंद्र काटोलकरला बेड्या

## -शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणात २५ डिसेंबरपर्यंत पीसीआर

**वर्धा जनमाध्यम :** शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास करणा-या पोलिसांच्या 'वेट अॅण्ड वॉच' यंत्रणेने अखेर २३ डिसेंबरला वर्धा शहराशेजारील नालवाडी येथील रहिवासी रविंद्र शंकर काटोलकर यांना ताब्यात घेत अटक केली आहे. नागपूर न्यायालयात हजर केले असता त्यांना २५ डिसेंबरपर्यंत पीसीआर मंजूर करण्यात आली आहे.

**नागपूर-वर्धा शिक्षण प्रशासनात कौशल्याचा गैरवापर-** हल्ली नागपूर येथे माध्यमिक शिक्षणाधिकारी म्हणून सेवा देणाऱ्या काटोलकर यांनी वर्धा जिल्ह्यातही शिक्षणाधिकारी म्हणून काम केले आहे. चौकशीत समोर आले आहे की, २४ डिसेंबर २०२१ ते २० मार्च २०२२ या काळात प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून सेवेत असताना बोगस शालार्थ आयडीच्या माध्यमातून शासनाची कोट्यावधीची फसवणूक केली.

**वर्धा शिक्षण क्षेत्रात खळबळ-** मुख्य आरोपी उल्लास नरड यांना अटक झाल्यानंतर 'नवराष्ट्र' वृत्तमालिकेत प्रकाशित वृत्तानुसार, नरड यांनी वर्धा जिल्ह्याच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त प्रभार डॉ. मनिषा भडंग यांना दिल्याची माहिती समोर आली होती. यामुळे वर्धा जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली होती. नंतर डॉ. भडंग यांच्याकडून अतिरिक्त प्रभार काढण्यात आला आणि जयश्री राऊत यांची वर्ध्यात माध्यमिक शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**शालार्थ आयडी घोटाळ्यात १२ कोटींचा फटका-** चौकशीत समोर आले आहे की, काटोलकर यांनी शाळांद्वारे आलेल्या प्रस्तावांची शहानिशा न करता अनेक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे बोगस शालार्थ आयडी वापरून त्यांचे वेतन आणि थकीत वेतन काढले. यामधून स्वतःस फायदा करून शासनाच्या सुमारे १२ कोटींपेक्षा अधिक रकमेची फसवणूक केल्याचे आढळले आहे.

**पोलिसांची धडक कारवाई-** ठोस पुरावे मिळाल्यानंतर शालार्थ आयडी घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या पोलिसांच्या चमूने वर्ध्यात जाऊन रविंद्र काटोलकर यांना अटक केली आणि पोलिस कोठडीत ठेवले.

---

# स्टिल कॉईल रोल भरलेला ट्रक उलटला; चालक ठार, वाहक जखमी

**वर्धा जनमाध्यम :** कळमेश्वर येथून स्टिल कॉईलचे रोल भरून गुजरातमधील बडोदा येथे निघालेला ट्रक नागपूर-अमरावती महामार्गावरील तळेगाव घाटात भीषण अपघाताचा बळी ठरला. रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला वाचविण्याच्या प्रयत्नात स्टिल कॉईल भरलेला ट्रक पलटी झाल्याने चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर वाहक जखमी झाला. ही घटना मंगळवारी (ता. २१) रात्री सुमारे १२ वाजताच्या सुमारास तळेगाव (श्या. पं.) येथे




घडली. या अपघातात मुकेश कुमार भिल (४३, रा. सबलपुरा, ता. जहाजपूर, जि. भिलवाडा, राजस्थान) यांचा जागीच मृत्यू झाला. तर सत्यनारायण पोरू भिल (२३) हा वाहक जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

---

# धावत्या मालवाहूला अचानक आग; वाहन जळून खाक

**-श्मशानभूमी परिसरात रात्रीची घटना; चालकाचा प्रसंगावधानाने जीव वाचला**

**हिंगणघाट । जनमाध्यम :** हिंगणघाट शहरातील श्मशानभूमी परिसरात असलेल्या नदी पुलावर सोमवारी रात्री धावत्या मालवाहूला अचानक आग लागल्याची थरारक घटना घडली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केल्याने मालवाहू पूर्णपणे जळून खाक झाला. या आगीत वाहनाचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

लहान आर्वी येथील राष्ट्रपाल दिवाकर परमोड हे आपला मालवाहू घेऊन नियोजित ठिकाणी जात होते. मालवाहू नदीवरील पुलावर आला असता अचानक इंजिन भागातून धूर निघू लागला आणि पाहता पाहता वाहनाने पेट घेतला. आग भडकत असल्याचे लक्षात येताच चालकाने तात्काळ वाहन रस्त्याच्या कडेला थांबवून बाहेर उडी घेतली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

दरम्यान, वाहनाला लागलेली आग दूरवरून दिसताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ अग्निशमन विभागाला घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन बंबासह घटनास्थळी दाखल झाले. सुनील डोळस, भूषण कापकर, वैभव कुजेवार, ओम लढी व अमित साहारे यांनी अथक प्रयत्न करून पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळविले.

आगीमुळे काही काळ पुलावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त ठेवत वाहतूक सुरळीत केली. या घटनेची नोंद हिंगणघाट पोलिसांनी घेतली असून आगीचे नेमके कारण काय, याचा तपास सुरू आहे.

---

# शिंभोरा धरणाजवळ भीषण दुचाकी अपघात; आई-मुलगा जागीच ठार, नातू गंभीर जखमी

**-मोर्शी मार्गावरील रक्तरंजित दुर्घटना; पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले, जखमी नातू अमरावतीत दाखल**

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** तालुक्याच्या सीमा नजीक शिंभोरा धरणाजवळ मंगळवार दुपारी ३ वाजता दुचाकीचा भयानक अपघात घडला. या भीषण दुर्घटनेत जामा मस्जिद आष्टीचे माजी मौजम रहेमान शाह यांच्या घराण्याचे दोन सदस्य तडाख्याने ठार झाले, तर त्यांचा २३ वर्षीय नातू गंभीर जखमी झाला.

माहिती नुसार, तमीजा रहेमान शाह (७५) आणि त्यांचा मुलगा करीम शाह रहेमान शाह (५५) हे नातू फारुक शाह (२३) सोबत मोर्शीच्या दिशेने दुचाकीवर प्रवास करत होते. ते आपल्या मुलीच्या मुलाला पाहण्यासाठी आनंदाने जात होते. मात्र, शिंभोरा धरणाजवळ दुचाकीवरून नियंत्रण सुटल्यामुळे अपघात झाला. अपघात इतका भयंकर होता की तमीजा आणि करीम यांचा जागीच मृत्यू झाला, तर फारुक शाह गंभीर जखमी झाला. जखमी नातूला तातडीने अमरावती येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मोर्शी पोलिसांनी घटनास्थळ गाठून तपास सुरु केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अपघाताचे नेमके कारण जाणून घेण्यासाठी स्थानिक नागरिक आणि साक्षीदारांकडून चौकशी केली जात आहे.

---

# मीटरशिवाय थेट वीज वापर; पिपरी (मेघे) येथील नेहारे बंधूंवर गुन्हा

**१८७७ युनिटची बेकायदा वापर उघड, दंड न भरल्याने कारवाई**

**वर्धा । जनमाध्यम :** महावितरणच्या थेट तारांवर आकडा टाकून मीटरशिवाय घरगुती वीज वापरत असल्याप्रकरणी पिपरी (मेघे) येथील नेहारे बंधूंवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक अभियंता प्रवीण डोंगरे यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली.

वर्धा ग्रामीण उपविभागांतर्गत पिपरी कक्षाचे सहाय्यक अभियंता प्रवीण डोंगरे यांनी काही महिन्यांपूर्वी सहकाऱ्यांसह नरेश नेहारे यांच्या निवासस्थानी पाहणी केली. या वेळी महावितरणच्या तारांवरून थेट वायर जोडून निखिल नेहारे व भारत नेहारे हे वीज चोरी करत असल्याचे आढळून आले. घरात कोणतेही अधिकृत वीज मीटर नसतानाही वीजपुरवठा सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

पथकाने घटनास्थळावरून सुमारे ३० फूट लांबीची काळ्या रंगाची वायर जप्त केली. चौकशीत गेल्या एक वर्षापासून वीज चोरी सुरू असल्याचे निष्पन्न झाले. या कालावधीत १८७७ युनिट वीज, सुमारे ३६ हजार ५४० रुपयांची, बेकायदा वापर झाल्याचा अंदाज आहे. याप्रकरणी २ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला.

मात्र, संबंधितांनी तडजोडीची रक्कम तसेच दंडात्मक वीज देयक अद्याप भरले नाही. त्यामुळे अखेर २२ डिसेंबर रोजी सहाय्यक अभियंता डोंगरे यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# भाविकांना अध्यात्मासोबतच तीर्थस्थळी आल्याचे आत्मिक समाधान मिळावे- मुख्यमंत्री फडणवीस

## नाशिक जिल्ह्यातील मालसाणे णमोकार तीर्थ विकासासाठी 36 कोटी 35 लाख रकमेच्या आराखड्याला मान्यता



**मुंबई, दि. २३:** नाशिक जिल्ह्यातील मालसाणे (ता. चांदवड) येथील जैन धर्मियांच्या णमोकार तीर्थ विकासासाठी ३६ कोटी ३५ लाख रकमेच्या आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत मान्यता देण्यात आली. या आराखड्यांतर्गत करण्यात येणा-या कामांमुळे भाविकांना येथे आल्यानंतर अध्यात्मासोबतच तीर्थस्थळी येण्याचे आत्मिक समाधान मिळावे अशा पद्धतीने कामे पूर्ण करावीत,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

या ठिकाणी करण्यात येणारी कामे दर्जेदार असावी, कोणत्याही कामात तडजोड करण्यात येउ नये. ही कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. या ठिकाणी ६ ते २५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कामांमध्ये स्थायी स्वरूपातील २४ कोटी २६ लाख आणि महोत्सवाच्या आयोजनाकरिता १२ कोटी ९ लाख रुपयांच्या कामांचा समावेश आहे. बैठकीस वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार राहुल आहेर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, णमोकार तीर्थ येथे येणा-या भाविकाला कुठल्याही अडचणींचा सामना करावा लागू नये. संबंधित यंत्रणांनी सर्व सोयीसुविधा येथे भाविकांना उपलब्ध करून द्याव्यात. देश - विदेशातून येथे भाविक येणार असून येथे येणा-या प्रत्येक भाविकाला या ठिकाणी येण्याचे समाधान मिळेल, अशा पद्धतीने महोत्सवाचे आयोजन करावे. महोत्सव आयोजनासाठी शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. स्वच्छतेसाठी असलेली कामे प्राधान्याने पूर्ण करावी. भाविकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी. येथील पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करून पाणीपुरवठा नियमित करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. या तीर्थाच्या विकासातून स्थानिक रोजगार निर्माण होणार आहे. त्या दृष्टीने विकास आराखडा राबविण्यात यावा. हे ठिकाण जैन धर्मियांचे राज्यातच नव्हे, तर देशात एक धार्मिक केंद्र म्हणून उदयास येईल. आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठान महोत्सवासाठी देशभरातून १० ते १५ लाख भाविक येतील. हा सोहळा यशस्वी करण्याचे आवाहनही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. बैठकीत नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दृकश्राव्य प्रणालीद्वारे सादरीकरण केले. यावेळी अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, सचिव (नियोजन) शैला ए, नाशिक विभागीय आयुक्तप्रवीण गेडाम, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे, णमोकार तीर्थचे पदाधिकारी उपस्थित होते.

**थोडक्यात णमोकार तीर्थ विकास आराखडा**-णमोकार तीर्थ हे जैन धर्मस्थळ असून नाशिक - धुळे महामार्गावर मौजे मालसाणे गावाजवळ ४० एकरावर स्थित आहे. आराखडा अंतर्गत णमोकार तीर्थ क्रॉकिट रस्ता तयार करणे, संरक्षक भिंत बांधकाम, नौकायन बांधकाम, हेलिपॅड, पार्किंग व्यवस्था, वीज पुरवठा, स्वच्छतेसाठी कामे करण्यात येणार आहे.या ठिकाणी ६ ते २५ फेब्रुवारी २०२६ कालावधीत आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठान महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी पाण्याच्या टाक्या बसविणे, ४५० युनिट टायलेट ब्लाक उभारणी, विद्युतीकरण, सीसीटीव्ही, नियंत्रण कक्ष, तात्पुरती वैद्यकीय युनिट स्थापना करण्यात येणार आहे.

## मेक्सिकन नौदलाचे विमान कोसळले; 5 जणांचा मृत्यू

**वाशिंग्टन /वृत्तसंस्था :**मेक्सिकोच्या नौदलाचे एक विमान सोमवारी गॅल्वेस्टनजवळ अचानक कोसळले. या विमानात एका आजारी तरुणासह आणखी सात जण प्रवास करत होते. या विमान अपघातात किमान पाच जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. टेक्सासच्या किना-याजवळ समुद्रात उर्वरित लोकांचा शोध सुरू आहे. या विमानात मेक्सिकोच्या नौदलाचे चार अधिकारी होते. याशिवाय, एका लहान मुलासह चार सामान्य नागरिकही विमानात होते. मेक्सिकोच्या नौदलाने निवेदन जारी करत सांगितले की या अपघातात नेमके कोणाचा मृत्यू झाला आहे, हे सध्या स्पष्टपणे सांगणे कठीण आहे. अमेरिकन कोस्ट गार्डने विमान अपघातात पाच जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे. मात्र, या अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. पोलीस संपूर्ण प्रकरणाची चौकशी करत आहेत. हा विमान अपघात सोमवारी दुपारी गॅल्व्हेस्टनजवळ झाला. मेक्सिकोच्या नौदलाने दिलेल्या माहितीनुसार, हे विमान वैद्यकीय मोहिमेवर होते आणि एका आजारी तरुण रुग्णाला घेऊन जात होते. अपघाताची माहिती मिळताच तातडीने बचाव व शोध मोहीम सुरू करण्यात आली. गॅल्व्हेस्टन येथील शेरिफ कार्यालयाच्या माहितीनुसार, या अपघाताची चौकशी सुरू आहे. यासंबंधी अधिक माहिती उपलब्ध होताच ती सार्वजनिक केली जाईल. गॅल्व्हेस्टन हे एक बेट असून ते आपल्या सुंदर समुद्रकिना-यांसाठी प्रसिद्ध आहे. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात दाट धुके पसरलेले आहे. मात्र, विमान अपघातामागे खराब हवामान कारणीभूत होते की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मेक्सिकोची नौसेना या दिशेने सखोल तपास करत आहे.

## खासगी बसवर सिनेस्टाईल दरोडा
### सव्वा कोटीचे दागिने लंपास; पुणे-बंगळुरू महामार्गावरील घटना

**कोल्हापूर / प्रतिनिधी-**कोल्हापुरात एका भीषण दरोड्याची घटना घडली आहे. कोल्हापूरहून मुंबईकडे जाणा-या एका खासगी आराम बसला मध्यरात्री गाठून सात ते आठ सशस्त्र दरोडेखोरांनी सुमारे १ कोटी २२ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटला.मिळालेल्या माहितीनुसार, अशोका कंपनीची खासगी आराम बस रविवारी रात्री ११ च्या सुमारास कोल्हापूरहून मुंबईकडे जाण्यासाठी निघाली. कोल्हापूर शहराबाहेरील तावडे हाटेलजवळ तीन अनोळखी व्यक्ती प्रवासी म्हणून बसमध्ये चढले. ही बस पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील किणी गावच्या हद्दीतील भुताचा माळ परिसरात आली असता, बसमध्ये आधीच



बसलेल्या त्या तिघांनी अचानक चाकूचा धाक दाखवून चालकाला बस रस्त्याच्या कडेला थांबवण्यास भाग पाडले. बस थांबताच पाठीमागून एका वाहनातून आलेल्या पाच ते सहा साथीदारांनी बसला वेढा घातला. हे सर्व दरोडेखोर बसमध्ये शिरले आणि त्यांनी अरेरावी करत प्रवाशांना धमकावण्यास सुरुवात केली. त्यांनी बसमधील सुतळी बारदानातील ३४ किलो आणि प्लास्टिक पोत्यातील २६ किलो अशी एकूण ६० किलो चांदी, मशिनरीचे स्पेअर पार्ट, १० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि मोबाईल हँडसेट असा एकूण १ कोटी २२ लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. लूट केल्यानंतर दरोडेखोरांनी जाताना बसचालक आणि प्रवाशांना सज्जड दम भरला. या परिसरात अजिबात थांबायचं नाही, पुढे निघून जा, नाहीतर जीवानिशी मारून टाकू अशी धमकी देउन ते पसार झाले. प्रचंड घाबरलेल्या बसचालकाने बस तशीच पुढे नेली आणि सांगली जिल्ह्यातील कणेगाव येथे बस थांबवून ११२ क्रमांकावर पोलिसांना संपर्क साधला.

## पुणे पुस्तक महोत्सवातात कोटींची उलाढाल

**पुणे /प्रतिनिधी-** पुस्तक महोत्सवात साडेबारा लाख नागरिकांनी भेट देत सुमारे ३० लाखांपेक्षा अधिक पुस्तकांची खरेदी केली असून, त्यातून सुमारे ५० कोटींपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत पुस्तकांची विक्री आणि पुस्तक खरेदी करणा-यांच्या संख्येत वाढ झाली आहे. या महोत्सवात ६० टक्क्यांपेक्षा अधिक तरुणांचा सहभाग होता. त्यामुळे युवकांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यासाठी पुणे पुस्तक महोत्सव यशस्वी ठरला असून, आता हा महाराष्ट्राचा



महोत्सव झाला आहे, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितली. पुस्तक महोत्सवात एकूण साडेबारा लाख नागरिकांनी भेट दिली आहे. यामध्ये तरुण-तरुणींची आणि शालेय विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय होते. त्यामुळे वाचन चळवळ सक्षम करण्याच्या दृष्टीने पुणे पुस्तक महोत्सवाचा प्रवास सुरू आहे.मोबाईल आणि गॅझेट्सच्या दुनियेतून बाहेर पडून नागरिक आणि तरुण पुस्तकांमध्ये रमल्याचे सकारात्मक चित्र येथे पाहायला मिळाले. लेखकांशी संवाद साधण्यासाठी आणि स्वाक्षरी घेण्यासाठी लागलेल्या लांबच लांब रांगा ही पुण्याच्या जागृत वाचन संस्कृतीची पावती आहे. गेल्यावर्षी साधारण २५ लाख पुस्तकांची खरेदी नागरिकांनी केली होती. यातून सुमारे ४४ कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाली होती.

## ग्रंथदिंडीत होणार भारतीय संस्कृतीचे दर्शन 1 जानेवारीपासून साहित्य संमेलनास सुरुवात

**पुणे /प्रतिनिधी-** सातारा येथे दि १ ते ४ जानेवारी या कालावधीत होत असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त काढण्यात येणा-या ग्रंथदिंडी व शोभायात्रेत भारतीय संत परंपरेपासून समाज सुधारकांचे कार्य,भारतीय संस्कृती,लोकसाहित्य तसेच साता-यातील शिक्षण,पर्यटन आणि साहित्य परंपरांचे चित्रण दिसून येणार आहे.तब्बल ३२ वर्षांनंतर मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मान महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे,शाखा शाहूपुरी (सातारा) आणि मावळा फौंडेशनला मिळाला आहे. या उत्सवात सातारा जिल्ह्याची ओळख दर्शविणारे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.यानिमित्ताने गांधी मैदान येथून संमेलनस्थळापर्यंत म्हणजेच शाहू स्टेडियमपर्यंत ग्रंथदिंडी व शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील एकूण ५५ शाळा व महाविद्यालयांचे चित्ररथ समाविष्ट करण्यात येणार आहेत.तसेच शिक्षण विभागातून प्रत्येक तालुक्याचा एक याप्रमाणे ११ व जिल्हा परिषदेचा एक चित्ररथ असणार आहे.चित्ररथांच्या माध्यमातून मराठी संत साहित्यातील सुविचार तसेच मराठी सारस्वतांनी मराठी भाषेच्या योगदानासाठी केलेल्या साहित्य निर्मितीचे दर्शन साहित्यप्रेमींना घडणार आहे.ग्रंथदिंडी व शोभायात्रेत पालखी, छत्र्या,बग्गी,बैलगाड्या, घोडेस्वार यांच्यासह सनई-चौघड्यांचा नाद निनादणार आहे. झांज, लेझिम,बँड पथकासह एन.सी.सी.पथकाचा सहभाग असणार आहे.महाराष्ट्रातील लोककलांचे दर्शनही घडणार आहे.राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविणा-या ग्रंथदिंडी व शोभायात्रेत संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विश्वास पाटील,मावळत्या अध्यक्षा तारा भवाळकर,महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी तसेच स्वागताध्यक्ष श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले सहभागी होणार आहेत.

## हिंदूंनीही चार-चार मुलांना जन्म द्यावा-नवनीत रवी राणा

**अमरावती -**एक मौलाना आहे तो म्हणाला की, मला चार बायका आणि १९ मुले आहेत. तो म्हणतो की, मला तीस-पस्तीस मुले पाहिजे होती. तो कोरम मी पूर्ण करू शकलो नाही याची लाज वाटते. ते जर खुल्यापणे चार बायका १९ मुले पाहिजे असे म्हणत असतील, तर आपल्या हिंदू लोकांनी किमान तीन-तीन, चार-चार मुलं जन्माला घातली पाहिजेत असे अजब विधान नवनीत राणा यांनी पत्रकारांशी बोलताना केले आहे. मौलाना सय्यद कादरी यांनी मला ४ बायका आहेत व १९ मुले आहेत असे सांगितले,



यावर नवनीत राणा यांनी प्रतिक्रिया दिली. नुकतेच भाजप नेत्या नवनीत राणा यांनी मुर्शिदाबाद येथील मशिदीच्या मुद्यावरून मोठे वक्तव्य केले होते. काँग्रेसने आजवर समाजात तेढ निर्माण करण्याचे काम केले. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या आमदारांनीही तेच करण्याचा प्रयत्न केला असा आरोप नवनीत राणा यांनी केला. मी सगळ्या हिंदू लोकांना सांगते की जर ते खुलेपणे सांगत असतील की ४ बायका आणि १९ मुलं आहेत तर आपण किमान तीन-तीन चार-चार मुलं जन्माला घातली पाहिजेत. त्यांचा विचार आपल्या हिंदुस्थानला पाकिस्तान बनवायचा आहे. ते मोठ्या संख्येने मुलं जन्माला घालत आहेत, तर मग आपण एका मुलावर का संतुष्ट राहतो? आपणही तीन ते चार मुलं जन्माला घातली पाहिजेत यामध्ये काही दुमत नाही, असे नवनीत राणा म्हणाल्या.

## पाच हजार लोकांनी उमेदवारी मागितली, आता कपडे फाडण्याची वेळ आली

**नागपूर:** नगरपरिषद निवडणुकांचे निकाल जाहीर होताच उपराजधानीतील राजकीय हालचालींना वेग आला असून आता सर्वांचे लक्ष नागपूर महानगरपालिका निवडणुकीकडे लागले आहे. सलग तीन वेळा सत्तेवर असलेल्या भाजपसमोर चौथ्यांदा विजयाची संधी आहे. भाजपकडून उमेदवारी मागणा-यांची प्रचंड गर्दी झालेली आहे. दोन दिवसांमध्ये नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात कार्यकर्त्यांसमोर भाषण करताना त्यांना सबुरीचा सल्ला दिला. यावेळी गडकरींचे भन्नाट भाषण सर्वत्र चर्चेचा विषय झालेला आहे. गडकरींनी सांगितले की तब्बल ५००० लोकांनी भाजपकडे उमेदवारी मागितलेली आहे. नागपूर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे होमटाउन आहे. त्यामुळे भाजपसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे. नगरपरिषद निवडणुकांतील घवघवीत यशानंतर भाजपमध्ये आत्मविश्वास वाढला असून, त्याच पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह वरिष्ठ नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मनपा निवडणुकीसाठीची रणनीती, प्रभागनिहाय तयारी आणि उमेदवार निवडीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नितीन गडकरी म्हणाले की, लोकांची काळजी घेण्याचे धंदे करू नका. कोणाला पाहायचे धंदे करू नका. निवडणुकीत इलेक्शन मॅनेजमेंट असा काही प्रकार नसतो. जनतेला त्यांची कामे होणे महत्वाचे आहे. मी एक विनंती केली की आपण एक फिल्म तयार करा. कारण आपल्या केलेले एवढे काम आहे की ती सगळी लोकांना



दाखवता आली पाहिजे आणि हे काम अजून करायचे आहेत म्हणून भारतीय जनता पार्टीला तुम्ही निवडून द्या. आम्हाला सत्तेत आण आम्ही नागपूरला देशातलंच नाही तर जगातला सुंदर चांगलं शहर म्हणून मान्यता मिळवून दिल्याशिवाय राहणार नाही. हा कार्यक्रम आपल्या सगळ्याचा आहे. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा सरकार मोदी यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीतल्या सरकार आहे आणि नागपूर ते भाजपचा महापौर राहिला आणि विकासाच्या गाडीला तीन-तीन इंजिन लागले तर स्थिती बदलल्याशिवाय राहणार नाही असं मला विश्वास आहे असेही गडकरी म्हणाले. आपला सगळ्यांना विनंती आहे की निवडणुकीमध्ये पाच हजार लोकांनी तिकीट मागितलेली आहे.

एकच सुंदरी आणि ५० लोक म्हणतात की आमचं त्यांच्यासोबत जमवा. पण कुणाकुणाचं जमणार आहे. खुर्चीवर एकच माणूस बसू शकतो. दोन-तीन नाही बसू शकत. पण आम्ही हा प्रयत्न करू की ज्या कार्यकर्त्याला जनतेच्या समर्थन असेल त्याचाच निवड करताना विचार होणार आहे. जो कार्यकर्ता निष्ठावाला आहे अनेक वर्ष पासून निवडून येतोय त्यालाच प्राधान्य दिले जाणार आहे. जात, धर्म, पंथ, भाषा याचा कुठलाही विचार तिकीट वाटप करताना केला जाणार नाही. नागपूर माझा आणि नागपूरची जनता माझी आहे. पक्ष जो उमेदवार निवडून त्याच्या पाठीमागे उभे रहा त्याला निवडून देण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणे हेच आपले काम आहे. आपण विचारा करिता काम करणारे लोक आहोत. आज आपल्या पक्षाचा अजेंडा आहे. त्यामुळे मनाचा मोठेपणा दाखवून ज्याला तिकीट मिळेल त्याच्यासमोर उभे राहून त्यालाच निवडून द्या. या निवडणुकीमध्ये महापौर हा भाजपचाच झाला पाहिजे यासाठीच पूर्ण प्रयत्न करा असे आवाहन गडकरींनी केले.

## गडचिरोलीत मुख्यमंत्र्यांच्या शिलेदारांनी गड राखला, अजित पवार गटाचीही मुसंडी

**गडचिरोली:** जिल्ह्याच्या राजकारणात महत्त्वाच्या समजल्या जाणा-या गडचिरोली, आरमोरी आणि देसाईगंज या तिन्ही नगरपालिकांच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षाने विरोधकांना धोबीपछाड देत पुन्हा एकदा निर्विवाद सत्ता स्थापन केली. राज्याचे मुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या या निवडणुकीत भाजपने केवळ गडच राखला नाही, तर महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आणि काँग्रेसच्या आव्हानालाही शिताफीने थोपवले.गडचिरोली नगरपालिकेत भाजपने प्रणोती निंबोरकर या तरुण आणि सुशिक्षित चेह-याला संधी दिली होती. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्यक्ष सभेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांमध्ये फुंकलेले चैतन्य आणि स्थानिक स्तरावर आमदार मिलिंद नरोटे यांच्यासह भाजपच्या नेत्यांची व्युहरचना विजयासाठी निर्णायक ठरली. निंबोरकर यांनी ११,७६२ मते घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. विशेष म्हणजे, येथे दुस-या क्रमांकासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत राष्ट्रवादीच्या नैताम यांनी काँग्रेसला मागे टाकत मुसंडी मारली, ज्याचा अप्रत्यक्ष फायदा भाजपलाच झाला. आरमोरी नगरपालिकेत भाजपने रुपेश पुणेकर या नवीन चेह-याला संधी दिली होती. ही निवडणूक ज्येष्ठ सहकार नेते अरविंद पोरेड्डीवार आणि प्रकाश पोरेड्डीवार यांच्यासाठी प्रतिष्ठेची होती. पोरेड्डीवार बंधूंनी आपल्या सहकार क्षेत्रातील दांडग्या अनुभवाचा आणि



दांडग्या जनसंपर्काचा वापर करत भाजपची फळी भक्कम केली होती. राष्ट्रवादीने काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला भगदाड पाडल्यामुळे येथे तिरंगी लढत पाहायला मिळाली. या मतविभाजनाचा पुरेपूर फायदा उचलत पुणेकर यांनी ५,५२८ मते मिळवून राष्ट्रवादीच्या जयकुमार मेश्राम यांचा पराभव केला, तर एकेकाळी बालेकिल्ला असलेल्या काँग्रेसला तिस-या क्रमांकावर समाधान मानावे लागले. देसाईगंजमध्येही माजी आमदार कृष्णा गजबे यांनी भाजपची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली होती.

## अंड्यांचे भाव कडाडले

**मुंबई** : कडाक्याच्या थंडीत अंड्यांचा भाव चांगलाच वधारला आहे. एक डझन अंड्यासाठी १०० रुपयांची नोट कामी येत आहे. त्यामुळे खवय्यांच्या तोंडची चव गेली आहे. यापूर्वी त्यापेक्षा स्वस्तात अंडी येत होती. पण थंडी वाढताच मागणी वाढल्याने अंड्याच्या किमतींचा भडका उडाला आहे. त्यामुळे थंडीत ऑम्लेट आणि अंडा करीसाठी ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागत आहेत. मुंबई महानगर क्षेत्रात अंड्यांच्या किमती ९८-१०० रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. थंडीत अंड्यांची मागणी वाढली आहे. तर देशभरातून होणारा पुरवठा खुंटला आहे. पुरवठा सुरळीत होईपर्यंत अंड्यांचे भाव भडकलेलेच



असतील. मागणी आणि पुरवठ्यातील तफावतीमुळे खवय्यांना अंड्यासाठी खिसा खाली करावा लागत आहे. पूर्वीपेक्षा किमतीत मोठी वाढ झाली आहे. पूर्वी एक अंडे ६-८ रुपयांदरम्यान मिळत होते. तो भाव आता १० रुपयांपेक्षा अधिक आहे. हिवाळ्यात अंड्यांना जास्त मागणी असते. पण त्या तुलनेत पुरवठा मात्र होताना दिसत नाही. थंडीच्या दिवसात महाराष्ट्रासह उत्तर भारतातील अनेक राज्यांत अंड्यांची मागणी वाढते. या काळात अंड्यांचा वापर वाढतो. त्या तुलनेत उत्पादन कमी झाल्याने तुटवडा निर्माण झाला आहे. अंड्याच्या किमती सध्यापेक्षा अधिक वाढण्याची भीती पण व्यक्त होत आहे. पुरवठा लवकर सुरळीत नाही झाला तर किमती भडकू शकतात. हिवाळ्यात अंड्यांना जास्त मागणी असते. पण त्या तुलनेत पुरवठा मात्र होताना दिसत नाही. थंडीच्या दिवसांत महाराष्ट्रासह उत्तर भारतातील अनेक राज्यांत अंड्यांची मागणी वाढते. या काळात अंड्यांचा वापर वाढतो. त्या तुलनेत उत्पादन कमी झाल्याने तुटवडा निर्माण झाला आहे. अंड्याच्या किमती सध्यापेक्षा अधिक वाढण्याची भीती पण व्यक्त होत आहे. पुरवठा लवकर सुरळीत नाही झाला तर किमती भडकू शकतात.

## भूमी अभिलेख विभागाच्या कर्मचा-यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करणार



मुंबई, दि.२३ : भूमी अभिलेख विभागाच्या अधिकारी कर्मचा-यांच्या मागण्यांचा शासनस्तरावर सकारात्मक विचार केला जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भूमि अभिलेख विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांच्या संघटनासमवेत झालेल्या बैठकीत सांगितले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्यासह महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी व भूमी अभिलेख विभागाच्या अधिकारी कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. भूमी अभिलेख विभागाच्या अधिकारी कर्मचा-यांना जमीन मोजणीसाठी आवश्यक अत्याधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्याच्या सूचना करत, महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, भूमी अभिलेख विभागाकडील भू-करमापक पदाच्या वेतनश्रेणीबाबत केलेल्या मागणीबाबत विशेष बाब म्हणून मंत्रिमंडळस्तरावर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही केली जाईल. तलाठी संवर्गात ज्या प्रमाणे प्रवास भत्ता दिला जातो त्या प्रमाणे प्रवास भत्ता देणेबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल. या बैठकीत भूमी अभिलेख विभागातील कर्मचा-यांच्या पदोन्नती, आकृतीबंध, अनुकंपा भरती, सरळसेवा भरती, कर्मचा-यांना आवश्यक प्रशिक्षण देणे आणि सेवाज्येष्ठता यादी याबाबत चर्चा करण्यात आली. या संदर्भात विभागाने गतीने कार्यवाही करावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित अधिका-यांना दिले. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सुधीर भाउंची भावना योग्य आहे. परंतु तांत्रिकपणे मंत्रिपद असते तर जिंकलो असतो असे नसते. मंत्रि-पदाचा आणि जिंकण्याचा काही संबंध नसतो. आम्हाला थोडे बळ, पाठबळ दिले पाहिजे ही भावना मुनगंटीवारांची आहे ते बरोबर आहे. देवेंद्र फडणवीस कायम सुधीर मुनगंटीवारांना पाठबळ देत असतात. मुनगंटीवारांना मजबूत ठेवले आहे. आता यावेळी ते मंत्री बनू शकले नाहीत परंतु सुधीरभाउ महाराष्ट्राचे नेते आहेत. राज्याचे माजी अध्यक्ष आहेत. राज्यात सुधीरभाउ कुठेही गेले आणि त्यांना कुणी स्वीकारणार नाही असे नाही. महाराष्ट्रातील जनतेला त्यांचे नेतृत्व मान्यच आहे.

## राज्याचे नवे पोलीस महासंचालक होण्याचा सदानंद दाते यांचा मार्ग मोकळा

**मुंबई** : राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) विद्यमान महासंचालक सदानंद दाते यांना त्यांच्या मूळ महाराष्ट्र केडरमध्ये परत पाठविण्याच्या प्रस्तावातील केंद्रीय कॅबिनेट समितीने मान्यता दिली आहे. एनआयए प्रमुख म्हणून त्यांच्या मुदतपूर्व प्रत्यावर्तन प्रस्ताव तात्काळ अंमलात आणण्याच्या दिशेने मंजूर करण्यात आल्याने आता १ जानेवारी २०२६ पासून राज्याचे नवे पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एनआयएचे प्रमुख म्हणून दाते यांना केंद्र सरकार मुक्तकरील का, याबाबत संदिग्धता होती.

विद्यमान महासंचालक रश्मी शुक्ला यांना राज्य शासनाने दिलेला वाढीव दोन वर्षांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर रोजी संपत आहे. नव्या महासंचालकांची नियुक्ती करण्यासाठी राज्य शासनाने केंद्रीय लोकसेवा आयोगाला यादी पाठविली असून त्यात सर्वात वरिष्ठ अधिकारी म्हणून दाते यांच्या नावाचा समावेश आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून तीन नावांची शिफारस केली जाईल. दाते यांना मूळ राज्यात परत पाठविण्याच्या प्रस्तावाची राज्य शासन प्रतीक्षा करीत होते. आता ही अडचण दूर झाल्यामुळे दाते यांची नियुक्ती करण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे गृहखात्यातील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. १९९० च्या तुकडीचे आयपीएस अधिकारी असलेले दाते हे राष्ट्रीय तपास



यंत्रणेचे प्रमुख म्हणून केंद्रात प्रतिनियुक्तीवर होते. दाते हे अत्यंत प्रामाणिक आणि कर्तव्यकठोर अधिकारी म्हणून पोलीस दलात परिचित आहेत. सेवाज्येष्ठतेनुसार दाते हे सर्वात वरिष्ठ आयपीएस अधिकारी आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाला सात अधिका-यांची नावे पाठविण्यात आली आहेत. यामध्ये दाते यांच्यासह महासंचालक (विधी आणि तांत्रिक) संजय वर्मा, गृहरक्षक दलाचे समादेशक रितेश कुमार, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक संजीवकुमार सिंघल, महाराष्ट्र गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या महासंचालक अर्चना त्यागी, नागरी संरक्षण दलाचे महासंचालक संजीव कुमार आणि रेल्वेचे महासंचालक प्रशांत बुरडे यांचा समावेश आहे.यापैकी तीन नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून राज्य शासनाला पाठविली जातात. त्यापैकी एका नावावर राज्य शासनाला शिक्कामोर्तब करता येते. त्यामुळे राज्य शासनाकडून दाते यांच्याच नावावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे. दाते हे डिसेंबर २०२६ मध्ये सेवानिवृत्त होणार असले तरी त्यांची नियुक्ती झाली तर त्यांना दोन वर्षांचा कालावधी मिळू शकेल. दाते यांनी मुंबई पोलिस दलात गुन्हे शाखा तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या सहआयुक्तपदाची जबाबदारी पार पाडली आहे.

राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख म्हणूनही ते कार्यरत होते. तेथे असतानाच त्यांना महासंचालकपदी बढती मिळाली. अल्पावधीतच ते राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख बनले. दिल्लीत झालेल्या बॉम्बस्फोटाचा तपास त्यांच्याच मार्गदर्शनाखाली सुरु होता. याशिवाय मीरा-भाईंदर-वसई-विरारचे पोलीस आयुक्त, छत्तीसगढ येथे केंद्रीय राज्य राखीव पोलीस दलाचे विशेष पोलिस महानिरीक्षक हे पदही त्यांनी भूषविले. त्याआधी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या आर्थिक गुन्हे विभागात ते अधीक्षक होते.

## ईव्हीएमवर सर्वात आधी राष्ट्रीय पक्षाचे उमेदवार

**मुंबई :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठीच्या नियमांत राज्याच्या ग्रामविकास खात्याने एक महत्त्वपूर्ण बदल केला. यापुढे ईव्हीएम बॅलेट मशीनवर पहिला राष्ट्रीय पक्ष, त्यानंतर प्रादेशिक पक्ष मग अपक्ष उमेदवार असा क्रम असणार आहे. या क्रमानेच उमेदवारांची यादीही प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ग्रामविकास खात्याने त्यासंबंधी जीआर प्रसिद्ध केला आहे. या आधी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत आडनावाच्या अद्याक्षरानुसार क्रमवार नावे असायची. त्यामुळे राष्ट्रीय पक्षाच्या आणि राज्य प्रादेशिक पक्षाच्या उमेदवारांची नावे खाली जायची. आता नव्या गॅझेटनुसार राष्ट्रीय पक्षाच्या आणि प्रादेशिक पक्षाच्या उमेदवारांची नावे सर्वात वर असतील, असा निवडणूक नियम बदलला आहे. १५ डिसेंबर २०२५ रोजी ग्रामीण विकास विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. हे नियम तातडीने लागू करण्यात आल्याने आगामी पंचायत समिती निवडणुकांवर त्याचा थेट परिणाम होणार आहे. उमेदवारांपर्यंत सर्वांची स्पष्ट ओळख निर्माण होणार आहे, असे सांगण्यात आले

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सगळ्यांचेच अंदाज खरे!

मतदानोत्तर चाचण्या, सर्वेक्षणानंतर बांधलेले निवडणुकीचे अंदाजही चुकतात. पण, नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुकीचे अंदाज सगळ्यांचेच जवळजवळ खरे ठरले. अगदी महाविकास आघाडीच्या नेत्यांचेही! स्थानिक पातळीवरचे दोन-चार अंदाज इकडे तिकडे झाले असतीलही. पण, राज्य पातळीवरचे अंदाज सगळ्यांचेच खरे ठरले. भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्राच्या जनमानसावर कब्जा केला आहे, हे उघड आहे. त्यांचा प्रभाव किती खोलवर गेला आहे, एवढाच चर्चेचा (वादाचा नव्हे!) विषय होता. त्याचे उत्तर या निकालातून मिळालं आहे. एकेकाळी शहरी उच्चवर्णीय मध्यमवर्गीयांचा पगडा असलेला हा पक्ष राज्यात तळागाळात, सर्व विभागात किती विस्तारला आहे, याचा लेखाजोखाच या निवडणुकीने सगळ्यांसमोर ठेवला आहे. भारतीय जनता पक्षाचे विरोधक भानावर असतील, तर त्यांनी या वस्तुस्थितीची दखल घ्यायला हवी. ही दखल ते घेणार नसतील आणि त्या पक्षावर केल्या जाणाऱ्या जुन्याच टीकेच्या कथानकात अडकून पडणार असतील, तर ते भानावर येईपर्यंत भाजपला त्यांचा विचारही करण्याची गरज नाही, हे महाराष्ट्रातील मतदारांनी दाखवून दिले आहे. नगरपालिका आणि नगर परिषदांचे कार्यक्षेत्र म्हणजे महाराष्ट्राचे निमशहरी क्षेत्र. गेल्या २५ वर्षांत आजूबाजूच्या खेड्यांतून या भागात फार मोठ्या वेगाने स्थलांतर झाले. तिथे मतदारांनी जर भाजपला इतके स्वीकारले असेल, तर महानगरपालिका निवडणुकांनंतर येऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत त्या पक्षाला चिंता करायचंच कारण नाही, असा निष्कर्ष आताच काढला, तरी तो चुकीचा ठरेल असे वाटत नाही. महानगरपालिका निवडणुकीत भाजप क्रमांक एकचा पक्ष असेल, असं राजकीय वर्तुळात आताच मानले जाते आहे. ते खरे ठरले, तर राज्यातील सत्तेपासून गावच्या कारभारापर्यंत महाराष्ट्रात भाजपचंच वर्चस्व प्रस्थापित झाले आहे, हा स्पष्ट संदेश देशात जाईल. भाजपचा महाराष्ट्रातील सर्व पातळ्यांवरचा विस्तार सिद्ध होईल. त्याचा अधिकाधिक विस्तार करत राहणं हाच त्या पक्षाच्या नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा यापुढचा कार्यक्रम असेल. भाजप प्रत्येक निवडणूक जीवनमरणाची लढाई असल्यासारखा लढतो, हे आता देशात सगळ्यांनीच पाहिलं आहे. महाराष्ट्रातल्या निवडणुकाही त्याला अपवाद नाहीत. पक्षाची सूक्ष्म नियोजनाची एक पद्धत आहे. 'मा फलेषु कदाचन' या उक्तीनुसार फळाचा विचार न करता 'कर्मण्ये वाधिकारस्ते' वृत्तीने ते मेहनत घेतात. त्यामुळे, गेल्या ३०-३५ वर्षांत कोणत्याही निवडणुकीवर वरचष्मा भाजपचाच असतो. काँग्रेसला आधुनिक निवडणूकतंत्र अवगत नाही, असे विश्लेषणही या निवडणूक निकालानंतर काही जणांनी केलं! नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांच्या अगदी सुरुवातीला महायुतीतील अन्य पक्ष भाजपची तयारी पाहूनच स्तिमित झाले होते. शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांना त्यातूनच बळ मिळालं असावं. कारण, त्यांनीही त्यांच्या ताकदीनुसार भाजपच्या तोडीस तोड मेहनत घेतली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यातही उजवे ठरले. पक्ष वाढीसाठी सतत प्रयत्नशील असलेला, वर्तमान राजकारणाच्या गरजा पूर्ण करण्याची धमक असलेला आणि आपल्या राजकीय उद्दिष्टांसाठी जोखीम पत्करण्याची तयारी असलेला नेता म्हणून दिल्लीपासून गल्लीपर्यंत त्यांची ओळख झाली आहे. नेत्याची ऊर्जाच कार्यकर्त्यांत पाझरत असते. शिंदे यांच्या ऊर्जेचा परिणाम म्हणून त्यांच्याच ईर्षेने शिवसैनिकही निवडणुकीच्या मैदानात उतरल्याने त्यांचे अनेक ठिकाणी महायुतीतल्याच मित्र पक्षांशी खटके उडाले. त्याचा महायुतीवर काही परिणाम झाला नाही. कारण, हा संघर्ष उंबऱ्यापर्यंत जाऊ द्यायचा नाही, याचं भान शिंदेंना अचूक आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवारही एकीकडे लेकाचं लग्न आणि दुसरीकडे पक्षकार्य अशा दोन्ही आघाड्यांवर लढले. शिंदे आणि पवार या दोघांनाही त्यांच्या कष्टाचं फळ मिळाले. साधारण विधानसभा निवडणुकीसारखेच आकडे पुन्हा गाठून दोघांनीही महायुतीतली आपली उपयुक्तता सिद्ध केली. विरोधकांमध्ये काँग्रेसला मिळालेले यश अनेकांना आश्चर्यचकित करणारे ठरले. ना मातब्बर नेता, ना साधनसामग्री, ना पक्षसंघटनेचा आधार, ना देशात पक्षासाठी कुठेही प्रोत्साहनात्मक वातावरण-तरीही पक्षाच्या स्थानिक शिलेदारांनी आपापले गड राखण्यासाठी मेहनत घेतली. आपल्या पक्षाची जनमानसातली पत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी राखून दाखवली. दिवाळं निघालं ते उबाठा आणि राष्ट्रवादी (शरद पवार) या दोन गटांचं. राजकीय इच्छाशक्ती संपलेल्या या दोन्ही पक्षांचा जनाधार झपाट्याने कमी होतो आहे. राहिलेले निष्ठावंतही पुढच्या निवडणुकीपर्यंत किती टिकतील, हा प्रश्नच आहे. म्हणजे, या दोन्ही पक्षांतील फुटलेले गटच आपल्या मूळ पक्षांची निशाणी कायम ठेवणार, हे या निवडणूक निकालांनी दाखवून दिले आहे. येत्या महानगरपालिका निवडणुकीत त्यावर शिक्कामोर्तब होईल. महाराष्ट्राचे राजकारण पुन्हा पुनर्रचनेकडे सरकेल! या निवडणुकांत जे (गैर) प्रकार घडले, ते मात्र महाराष्ट्रासाठी चिंताजनक आहेत. महापालिका निवडणूक ही त्यापेक्षा अधिक ताकदवानांची लढाई आहे. ही निवडणूक पक्षांना आणि पक्षनेत्यांना कितीतरी अधिक पटीने बळ देणारी आहे. त्यामुळे, ती त्या पटीत, तेवढ्या ताकदीने लढवली जाणार, हे उघड आहे. महानगरीत जनता सुजाण असते, असं मानले जाते. आधीच्या निवडणुकांनी मैदान साफ करून दिले आहे. त्यामुळे, आघाडीच्या पक्षांना आता अटीतटीची ताकद लावण्याची गरज लागू नये. त्यामुळे, येथील निवडणूक गैरप्रकारांविना झाली, तर त्यातच महाराष्ट्राची शान आहे.

# महापालिकांत विरोधकांची अग्निपरीक्षा

लोकसभा निवडणुकांत मतदारांनी महाराष्ट्रात महाविकास आघाडीला हात दिला. ही लाट विधानसभेत महायुतीने झोपवली. एकनाथ शिंदे यांच्या 'लाडक्या बहिणीं'नी आणि फडणवीस यांच्या आश्वासक चेहऱ्याने निकाल बदलवले. महाराष्ट्राचे ते राजकीय निकाल हे राज्याचे वास्तव असल्याचे नगरपालिकांच्या निकालांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. समूहाने सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्यावर केलेल्या पाहणीतही जनतेने महायुतीलाच कौल दिला होता. ती पाहणी हाच राज्याचा मूड असल्याचे पुन्हा एकदा कालच्या निकालांनी सिद्ध केले. हे का घडते आहे? विकासाला मत, लाडक्या बहिणींचा पाठिंबा, हिंदुत्वाला दिलेली विकासाची जोड, अशी कारणे सत्ताधारी देऊ शकतील; पण हा प्रश्न विरोधकांना पडतो आहे का? महानगरपालिकांच्या निवडणुकांना सामोरे जाताना विरोधकांना याबाबत आत्मपरीक्षण करावे लागेल.

नगरपालिका, नगरपंचायतींचे निकाल लागले! महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा महायुतीच्या पारड्यात भरभरून मत टाकले. या निकालांचा मागोवा घेतच आता २९ महानगरपालिकांच्या महासंग्रामाला महाराष्ट्र सामोरा जाईल.मुंबई हा 'मिनी भारत' आहे. या मुंबईत भाजपला रोखणे हे विरोधकांचे ठरले असेल तर त्यासाठी त्यांच्याजवळ काय आयुधे आहेत? त्यांचा येणाऱ्या तीन आठवड्यात कस लागेल. मुंबई आमची म्हणत मराठी माणसांना एकत्र करणे, दलित-अल्पसंख्याकांना तुम्ही अनसेफ आहात असे दाखवणे, हे सगळे करण्यासाठी महायुतीविरोधीशक्ती एकत्रित हव्यात. सध्या त्या दिसत नाहीत. त्यामुळेच २९ महानगरपालिकांचे निकाल नगरपंचायतींप्रमाणे एकतर्फी लागणार तर नाहीत ना, अशी शंका घेणे सुरू झाले आहे. हा सामना उलटवणे यात ठाकरे बंधूंचे आणि महाविकास आघाडीचे खरे कर्तृत्व दडलेले आहे. नगरपरिषदांच्या निकालांचे अर्थ संमिश्र आहेत. भाजपने जे यश मिळवले ते विक्रमी आहे. मात्र, त्यांना आव्हान देत काही ठिकाणी त्यांच्याच युतीमधील क्रमांक दोनचा धाकटा भाऊ असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही दमदार कामगिरी नोंदवली. भाजपला शतप्रतिशतचा नव्हे, तर सहयोगाचा मंत्र भजावा लागणार आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही त्यांचे काका शरद पवार यांना मागे टाकले.एक वर्ष झाल्यानंतर जनता सरकारच्या कारभारावर समाधानी असल्याचे चित्र निकालांनी स्पष्ट केले. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीला महासंग्राम संबोधले जाते. ही रणधुमाळी ठाकरे ब्रँडच्या कसोटीची आहे, तसेच मुंबई नक्की कुणाची? हे स्पष्ट करणारीही आहे. या निवडणुकीला सामोरे जाताना ठाकरे नेमके काय करतील, हा प्रश्न या तीन आठवड्यांत गाजेल. झाले गेले विसरून भाऊ-भाऊ एकत्र आले. कोणतेही घर एकत्र राहणे, कुटुंबाने एकत्र किंवा जीवनातील आव्हाने संयुक्तरीत्या पेलणे भारतात अतिशय महत्त्वाचे मानले जाते. 'महाभारता'चा इतिहास असलेल्या भारताला भाऊबंदीचा शाप आहे.दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर पुन्हा एकदा मराठी माणूस ठाकरे ब्रँडकडे वळेल का? हे महानगरपालिकेची निवडणूक ठरवेल. महानगरपालिका जिंकणे हा ठाकरे ब्रँडसमोरचा सर्वात मोठा आव्हानाचा विषय आहे. शिवसेनेने स्थापनेनंतर अनेक आव्हाने अनुभवली. अनेक आव्हानांना ठाकरे



यांनी यशस्वी तोंड दिले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्या निर्णयाला विरोध करीत ४० आमदार निघून गेले. त्यानंतरही लोकसभेत ठाकरे यांना यश मिळाले. मराठी अस्मिता, मुंबईच्या विकासात असलेले ठाकरेंचे योगदान हे सगळे मुद्दे लक्षात घेता, शिवसेना नेमकी कशी कामगिरी करेल, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.नगरपालिका निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरे, शरद पवार, लोकसभा गाजवणाऱ्या खासदार सुप्रिया सुळे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे कुठेही प्रचाराला गेले नाहीत. वारंवार यावर सत्ताधाऱ्यांनी बोट ठेवले. महापालिकेच्या निवडणुका वेगळ्या. ठाकरेंसाठी तर अतिमहत्त्वाच्या. हे चारही नेते या मतदानाकडे घरी बसून बघणार नाहीत, हे निश्चित. शरद पवार वयोवृद्ध झाले असले तरी आजही सक्रिय आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस हा सत्तेवर प्रेम असलेला पक्ष. त्याचा पगडा ग्रामीण महाराष्ट्रावर जास्त. त्यामुळे जिल्हा परिषदांच्या पुढच्या निवडणुकांमध्ये शरद पवार जास्त तयारीने उतरतील. भाजप संघटनात्मक ताकदीच्या जोरावर मुंबई आणि आसपासच्या महानगरपालिकांवर वर्चस्व मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. मात्र, मुंबईबरोबरच कल्याण-डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर अशा सर्वच महापालिकांमध्ये राजकीय पक्षांचा कस लागणार आहे. भाजपला निर्विवाद यश मिळाले असले, तरी त्यांचे मित्र असलेले पक्षही त्यांना काही ठिकाणी पराभूत करण्यात यशस्वी झाले. एकनाथ शिंदे यांनी कोकणात जोरदार मुसंडी मारली. आपला पक्ष हा खरी शिवसेना आहे, क्रमांक दोनचा पक्ष आहे, हे त्यांनी सिद्ध केले. उद्धव ठाकरे हे बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र असले तरी आपला पक्ष पुढे असल्याचे या निकालांनी शिंदे यांनी पुन्हा दाखवून दिले. त्यामुळे अडीच वर्षांच्या काळातली कामगिरी जनतेच्या मनात जागी दिसते आहे. अजित पवार यांनी आपल्यात इलेक्टिव्ह मेरिट असल्याचे या निवडणुकांमध्ये दाखवून दिले. आता पिंपरी-चिंचवड, ज्या नगराच्या विकासात त्यांनी मनापासून लक्ष घातले तेथे विजयी कामगिरी त्यांना करावी लागणार आहे. समोरचा शत्रू भाजपच आहे. अशा परिस्थितीत ते कशारीतीने कामगिरी करतील, यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून राहतील. नापास झालेल्या महाविकास आघाडीतल्या तीन पक्षांमध्ये पहिल्या क्रमांकावर आला तो काँग्रेस पक्ष. काँग्रेसला विदर्भाने बऱ्याच मोठ्या प्रमाणात हात दिला. काँग्रेस स्वबळावर मुंबईत नशीब आजमावत आहे. महानगरपालिका सभागृहात काँग्रेसचे २० नगरसेवक होते. तो आकडा तसाच राहील का, याकडे बघावे लागेल. भाजपला अभूतपूर्व यश मिळाले असले, तरी कोकण टप्प्यामध्ये प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ज्या आक्रमकपणे शिंदेंना आव्हान देण्याचा प्रयत्न केला तो यशस्वी झाला नसल्याचे दिसले.भाजपमध्ये देवेंद्र फडणवीस हे एकटेच हुकमी एक्के आहेत आणि त्यांच्यावरच सर्व मदार आहे, असे चित्र आहे. ते जिथे जातात तिथे कामगिरी उत्तम होते, ते जिथे जात नाही तिथे त्या पक्षाला यश मिळत नाही. विदर्भात पक्षाने जे यश मिळवले ते संघटनेचे यश आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूलमंत्री म्हणून जी दमदार कामगिरी सध्या नोंदवली आहे. त्याचेही ते फळ आहे. चंद्रपूरसारख्या परंपरागत भाजपचा गड असलेल्या जिल्ह्यामधली पडझड अजूनही सावरली जात नाही, हे भाजपसाठी समाधानकारक नाही. हे निकाल महानगरपालिकेच्या तयारीचे सूत्र असतील. त्यामुळे येत्या काळामध्ये विशेषतः तीन आठवड्यांमध्ये जो काय धुरळा उडेल, जी काय वावटळ उठेल, त्यात कोणते पक्ष टिकतात आणि कोणते हरतात, ते बघायचे.

**मृणालिनी नानिवडेकर**

## मुख्यमंत्री योगी आदित्यनाथांनी आरसा दाखवला

उत्तर प्रदेश विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विरोधकांवर डागलेली तोफ केवळ राजकीय टीका नव्हती, तर ती आजच्या विरोधी पक्षाच्या कार्यपद्धतीवर केलेले एक गंभीर भाष्य होते. कोडीनयुक्त कफ सिरफच्या निमित्ताने सुरू झालेली चर्चा शेवटी राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांच्या राजकीय परिपक्वतेवर येऊन थांबली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ज्या पद्धतीने 'देशातील दोन नमुन्यांचा' उल्लेख केला, तो जनमानसातील एका मोठ्या वर्गाच्या भावनांचे प्रतिनिधित्व करतो.

राहुल गांधी आणि अखिलेश यादव या दोघांनीही वयाची पन्नाशी पार केली आहे. लोकशाहीत इतक्या वर्षांचा अनुभव असलेल्या नेत्यांकडून देश एका प्रगल्भ आणि ठोस व्हिजनची अपेक्षा करतो. मात्र, दुर्दैवाने या दोन्ही नेत्यांच्या वर्तणुकीत आणि विधानांमध्ये वारंवार पोरकटपणा दिसून येतो. महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा सुरू असताना किंवा देश संकटात असताना परदेशवारीला प्राधान्य देण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या गांभीर्यावर प्रश्नचिन्ह उभे करते. म्हणूनच मुख्यमंत्र्यांनी त्यांना 'बबुआ' किंवा 'नमुने' म्हणून हिणवणे हे सयुक्तिक वाटते, कारण त्यांची विधाने अनेकदा वस्तुस्थितीला धरून नसतात.समाजवादी पक्षाच्या राजवटीत उत्तर प्रदेशने जे भोगले आहे, ते जनता विसरलेली नाही.

त्यावेळी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली होती. गल्लीबोळातील गुंडांपासून ते मोठ्या माफियांना राजाश्रय मिळत होता. मुलींची सुरक्षितता हा सर्वात मोठा चिंतेचा विषय होता; शाळा-महाविद्यालयांबाहेर रोड रोमिओंचा सुळसुळाट असल्याने पालकांना आपल्या लेकींना शिक्षणासाठी पाठवतानाही भीती वाटत असे. अनधिकृत कत्तलखान्यांमुळे (स्लॉटर हाऊस) सर्वसामान्य वस्त्यांमध्ये राहणे असह्य झाले होते.एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे विकासाचे आणि भविष्याचे 'व्हिजन' मांडत असताना, दुसरीकडे राहुल गांधी आणि अखिलेश यादव हे केवळ नकारात्मक टीका आणि बेताल विधाने करण्यात धन्यता मानतात. ज्यांच्याकडे स्वतःच्या राज्यासाठी किंवा देशासाठी ठोस धोरण नाही, त्यांच्या हाती सत्ता देणे किती धोक्याचे आहे, याची जाणीव सामान्य जनतेला झाली आहे. योगी आदित्यनाथ यांनी सभागृहात या नेत्यांना जो आरसा दाखवला, तो त्यांच्या राजकीय अपरिपक्वतेचा आणि जनतेशी तुटलेल्या संपर्काचाच पुरावा आहे.

## 'घोस्टपेअरिंग' सायबर हल्ल्यापासून सावधान!

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या भारतीय संगणक आपत्कालीन प्रतिसाद पथकाने (सीईआरटी-इन) व्हॉट्सप वापरकर्त्यांसाठी एक सूचना जारी केली आहे, या सूचनेनुसार, 'घोस्टपेअरिंग' नावाच्या एका नवीन धोकादायक सायबर हल्ल्याद्वारे होणाऱ्या व्हॉट्स?प हॅकिंगविषयी व्हॉट्सप वापरकर्त्यांना सावध करण्यात आले आहे. 'घोस्टपेअरिंग' नावाच्या या असुरक्षिततेमुळे वापरकर्त्यांचे संदेश, फोटो आणि व्हिडिओ धोक्यात येऊन हल्लेखोर हॅकर्स त्यांच्या खात्यावर पूर्ण नियंत्रण मिळवू शकतात. विशेष म्हणजे सायबर हल्लेखोरांना त्यासाठी कोणत्याही पासवर्ड, ओटीपी किंवा सिम स्वॅपिंगशिवाय गरज लागत नाही. 'घोस्टपेअरिंग'च्या धोक्यापासून वाचण्यासाठी आपल्या व्हॉट्सपवर ओळखीच्या नंबरवरून आलेल्या संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका, व्हॉट्सॲप किंवा फेसबुक असल्याचा दावा करणाऱ्या इतर साइट्सवर फोन नंबर टाकू नका, व्हॉट्सप अकाऊंटमध्ये टू-स्टेप व्हेरिफिकेशन चालू ठेवा, अशा प्रकारच्या सुरक्षेच्या सूचना सीईआरटीकडून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे व्हॉट्सप वापरताना सतत सतर्क राहणे आणि वर दिलेल्या सुरक्षा टिप्स वापरणे हे व्हॉट्सपच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

व्हॉट्सप वापरकर्ते वैयक्तिक संवाद, व्यापार, व्यवसाय, फाइल शेअरिंग इत्यादीसाठी व्हॉट्सपचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. अशावेळी जर ते हॅक झाले तर ते मोठे नुकसान करू शकते.

**प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## लाल टोप्यांची सक्ती नको !

ख्रिसमस आणि ख्रिस्ती नववर्षाच्या निमित्ताने सांताक्लॉजच्या लाल टोप्या आणि मुखवटे बाजारात विक्रीसाठी आलेले सर्वत्र दिसू लागले आहेत. लहान मुलांसह तरुणांमध्येही १ जानेवारीपर्यंत यांची क्रेज कायम असते. मराठीबहुल शहरातील बहुसंख्य पालकांना आपल्या पाल्याला मराठी शाळेत घालणे मागासलेपणाचे वाटत असल्याने आजमितीला शहरांसारख्या ठिकाणी सर्वाधिक मराठी मुले इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांतून इंग्रजीचे धडे घेत आहेत. परिणामी शिवजयंतीला घालायला फेटा मागाणाऱ्या मुलांपेक्षा ख्रिसमसला लाल टोप्या मागणाऱ्या मुलांची संख्या बऱ्याच पटीने वाढली आहे. किंबहुना अनेक शाळांतून ख्रिसमसच्या आधी मुलांनाच लाल टोप्या घालून येण्यास बजावले जाते. काही खाजगी कंपन्यांच्या कार्यालयांत सुद्धा ख्रिसमस आणि नववर्षाचे सेलिब्रेशन ठेऊन त्याकरिता ड्रेसकोड म्हणून लाल टोप्या घालण्याची सक्ती केली जाते. महाविद्यालयांची स्थितीही याहून वेगळी नाही. भारताने धर्मनिरपेक्ष लोकशाही स्वीकारल्याने इथे प्रत्येक धर्मीय व्यक्तीला आपले सण उत्सव त्यांच्या रितीरिवाजाप्रमाणे साजरे करण्याचा अधिकार आहे; मात्र अन्य धर्मिय विद्यार्थ्यांवर किंवा कर्मचाऱ्यावर टोप्या वगैरे घालण्याची सक्ती नसावी. शिवजयंतीला किंवा गुढीपाडव्याला फेटे घालून येण्याची सक्ती कधी मराठी शाळांतून मुलांवर केल्याचे आजतागायत ऐकिवात नाही त्यामुळे कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांनीही ती बंधने पाळावीत.

**मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी, मुंबई

## पतंगबाजांना आवरा

नाशिकच्या ओझर परिसरात दुचाकीने जात असताना एका तरुणाच्या गळ्याला नायलॉन मांजा अडकून गंभीर दुखापत झाली. सुदैवाने त्याच्यावर तातडीने उपचार करण्यात आल्याने त्याचे प्राण वाचले. दुसऱ्या एका घटनेत नाशिकच्याच गंगापूर रोड परिसरात नायलॉन मांजात अडकून अनेक पक्षी गंभीर जखमी झाले तर काही पक्षी मृत्युमुखी पडले. गेल्या दोन दिवसांतील या घटनांमुळे धारदार नायलॉन मांजामुळे होणाऱ्या जीवघेण्या अपघातांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नवीन वर्षात येणारा संक्रांतीचा सण जसजसा जवळ येतो तसतसे पतंग उडविणाऱ्यांच्या उत्साहाला उधाण येते. मात्र हे पतंगबाज वापरत असलेल्या नायलॉन मांजामुळे पशुपक्ष्यांसह माणसांचे होणारे जीवघेणे अपघात ही आता सामान्य बाब होऊन राहिली आहे. एका आकडेवारीनुसार राज्यात धोकादायक नायलॉन मांजाच्या वापरामुळे गेल्या १५ वर्षांत १८२ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच पक्षी आणि प्राण्यांच्या मृत्यूच्याही अनेक घटना घडल्या. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने मानव, प्राणी (विशेषतः पक्षी) आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी २०१७ मध्ये नायलॉन मांजाचे उत्पादन, विक्री आणि वापर यावर अधिकृतपणे बंदी घातली आहे आणि या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास दंड आणि तुरुंगवासासह शिक्षेची तरतूद केली. पतंगोत्सवात नायलॉन मांजा वापरणाऱ्या पतंगबाजांना आवरण्यासाठी सरकारने या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

## संस्काराचे महत्त्व

'विद्या विनयेन शोभते' जगात अशा मोजक्याच उच्च शिक्षित व्यक्ती असतात ज्या कोणत्याही पदावर असताना विनम्रतेनेच वागतात. बऱ्याच जणांना शिक्षणामुळे मिळालेल्या पदाचा अहंकार असतो आणि त्याच्याकडून उद्दाम, उर्मटपणे बोलणे, वागणे होते. या उलट जे संस्कारी असतात ते कायम माणूस म्हणून जगताना पाय जमिनीवर ठेवून लोक कल्याणार्थ कार्य करतात.देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून २४ नोव्हेंबर २०२५ या दिवशी सूर्यकांत यांनी सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली.

शपथ घेतल्यानंतर त्यांनी प्रथम आत्तापर्यंत लांबलेल्या खटल्यांची सूची मागवली आणि त्यांचा निपटारा करण्यासाठी चार प्रशासकीय आदेश लागू केले. मिळालेल्या माहितीनुसार देशात पाच कोटीहून अधिक खटले प्रलंबित आहे. 'उशिराने मिळालेला न्याय हा अन्यायासारखाच असतो. जेव्हा एखादी व्यक्ती न केलेल्या गुन्ह्यासाठी काही वर्षे कारागृहात काढते आणि ती काढल्यानंतर तिची निर्दोष म्हणून सुटका झाली तरी आयुष्याची वाया गेलेली वर्षे परत मिळत नाही. त्याचबरोबर कारागृहाचा दाग कलंक म्हणून आयुष्यभर लागतो. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी जे प्रशासकीय आदेश लागू केले आहे त्यातील एक महत्त्वाचा पालट म्हणजे नव्याने प्रविष्ट होणाऱ्या जामीनाच्या याचिकांवर दोन दिवसात सुनावणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचे सहाय्य घेऊन सुनावण्यांची संख्या वाढविण्यावर भर दिला आहे. आम्ल आक्रमणासारख्या संवेदनशील प्रकरणाचा निपटारा करण्याच्या संदर्भात देशातील सर्व राज्यातील उच्च न्यायालयाकडून आम्ल आक्रमणाच्या प्रलंबित खटल्यांची सूची मागवून घेतली आहे. त्यासाठी त्यांनी एक महिन्याची समय मर्यादा ही दिली आहे. आम्लपिडीत व्यक्तींना दिव्यांगाच्या दर्जा आणि सुविधा देण्याच्या दृष्टीने कार्यपद्धत निर्माण करण्यासाठी त्यांनी पावले उचलली आहे. न्यायदानाचा कालावधी आणि खर्च कमी करण्याच्या दृष्टिकोनातूनही त्यांनी काही निर्देश दिले आहे. प्रदूषणाच्या संदर्भात भास्य करतांना ते म्हणाले की श्रीमंत सर्वात अधिक प्रदूषण करतात आणि त्याच्या त्रास गरिबांना भोगाव लागतो. महानगरात लोकांची जीवनशैली पालटणे सोपे नसते. अर्थात त्यांचा रोख वायू प्रदूषण करणारी प्रचंड संख्येने वाढलेली वाहने आणि ती वापरणारे यांच्या संदर्भात होता.

बिहार निवडणुकीमध्ये ६५ लाख मतदारांची नावे सूचीतून काढण्यात आली त्याविषयी माहिती सार्वजनिक करण्यास सांगितले त्यातून घुसखोरीचा गंभीर प्रश्न देशातील नागरिकांपर्यंत पोहोचून लोकशाहीची किती हानी झाली आहे हे समजू शकते. न्याय देताना तो न्यायालयीन भाषेत नव्हे तर सर्वसामान्य लोकांना समजेल अशा भाषेत असावा असेही सांगितले.न्याय सर्वांसाठी सारखा असतो एवढा पालट भारतीय न्यायव्यवस्थेमध्ये होणे सर्वसामान्यांना अपेक्षित आहे.

**लीना मकरंद**
गाडगीळ पनवेल

## संरक्षण क्षेत्रातही भ्रष्टाचाराची कीड

आपण रोज वर्तमानपत्र, टीव्हीवर भ्रष्टाचाराच्या बातम्या वाचत असतो, ऐकत असतो. सरकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी, काही सरकारी आस्थापने यात कुठे ना कुठे भ्रष्टाचार आपण ऐकत असतो. आतापर्यंत फक्त इथपर्यंतच भ्रष्टाचार मर्यादित आहे असे वाटत होते. परंतु कालची बातमी ऐकून धक्का बसला. संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहयोग आणि निर्यात प्रकरणाशी संबंधित अधिकारी लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा याला लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक झाली. केवळ त्यांनाच नव्हे तर त्यांच्या पत्नीलाही अटक करण्यात आली. शर्मा यांच्या घरातून २ कोटी २३ लाख ,तर पत्नीच्या घरातून दहा लाख रुपये जप्त करण्यात आले. आणि ही लाच खाजगी कंपन्यांशी संगणमत करून, अवैध मार्गाचा वापर करून त्यांना फायदा पोहोचवण्यासाठी घेण्यात आल्याचे कळले. म्हणजे आता भ्रष्टाचार संरक्षण क्षेत्रापर्यंत पोहोचला. संरक्षण क्षेत्र म्हणजे सगळ्यात महत्त्वाचं क्षेत्र. ज्यामुळे राष्ट्र सुरक्षित असतं. जे क्षेत्र त्याग भावना, साहस, अनुशासन ,राष्ट्रभक्ती इत्यादी गुणांसाठी सगळ्यांचे मन जिंकणारे आहे .तिथेच जर असे प्रकार होत असतील तर आदर्श ठेवायचा कोणाचा? सामान्य जनतेच्या मनात विश्वास राहील का? सैनिकी शिक्षणात देशसेवा सर्वोपरी ही प्रथम शिकवण असते. मग असे प्रकार घडतात कसे? याचाच अर्थ आता केवळ नीतिमत्ता शिकवून चालणार नाही तर ती साधना आहे या दृष्टीने मन , बुद्धी शुद्ध करणारे शिक्षण द्यायला हवे असे वाटते . भ्रष्टाचाराची ही कीड देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करते . भ्रष्टाचाराची ही मानसिकता एखाद्या आजाराप्रमाणे आहे. तो आजार वेगाने पसरल्याचे आपण बघतोच आहोत .नेतेच भ्रष्टाचार करतात तर प्रशासन भ्रष्ट असणारच. समाजाने आदर्श ठेवायचे तर ते कोणाचे ?आज आपल्या देशात भ्रष्टाचार हा शिष्टाचार झालेला आहे. जर भ्रष्टाचार खरोखरच या देशातून हद्दपार करायचा असेल, तर सरकारी मानसिकता हवी, कठोर कायदे हवेत आणि त्याची त्वरित अंमलबजावणी व्हावी. अन्यथा ही कीड आपली अर्थव्यवस्थाच नव्हे, तर संरक्षण क्षेत्रही पोखरून टाकेल .

# बँकांनी अधिकाधिक प्रकरणे मंजूर करून उद्योग वाढीस प्रोत्साहन द्यावे : जिल्हाधिकारी

**जनमाध्यम प्रतिनिधी**


यवतमाळ : बँकांनी अधिकाधिक प्रकरणे मंजूर करून जिल्ह्यात उद्योग वाढीस प्रोत्साहन द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल भवन येथे जिल्हा अग्रणी बँक यांच्यातर्फे सप्टेंबर २०२५ तिमाही अखेर झालेल्या आर्थिक वर्षातील बँकर्स समीक्षा बैठकीत ते बोलत होते. या आर्थिक वर्षातील सर्व सरकारी प्रोत्साहनपर उपक्रम व प्राथमिक क्षेत्रातील कर्ज वाटपाचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घेतला. मंदार पत्की, मुख्य कार्यकारी अधिकारी व बँक अधिकारी उपस्थित होते.



अग्रणी बँक प्रबंधक ज्ञानेश्वर टापरे, यांनी जिल्ह्यातील बँकाद्वारा सप्टेंबर २०२५ अखेर प्राप्त लक्षांक व बँकेने साध्य केलेले उदिष्टे या संबंधी माहिती जिल्हाधिकारी यांना सादर केली. जिल्ह्यात या आर्थिक वर्षात एकूण कर्ज वाटप ६ हजार १६१ कोटीचे झालेले असून ते लक्षांकाच्या ६६ टक्के आहे. प्राथमिक क्षेत्राला ४२८९ कोटीचे व अप्राथमिक क्षेत्रास १८७२ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

अन्य प्राथमिक क्षेत्रामध्ये १११ कोटीचे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला १५०० कोटीचे वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी यांनी बँकांचा सरकारी प्रायोजित उपक्रम व प्राथमिक क्षेत्रातील कर्ज वाटपाचा आढावा घेण्यात आला. सर्वप्रथम त्यांनी पिक कर्ज वाटपांच्या आढावा घेतला त्यात आपल्या जिल्ह्याचा पीक कर्ज सर्व बँकांनी मिळून खरिप हंगामा करीता रु.१ हजार ४०९ कोटीचे वाटप केलेले आहे व ते लक्षांकाचा ६४ टक्के आहे. तसेच सर्व बँकांनी पशुसंवर्धन व मत्स्य व्यवसाय अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना केसीसी संबंधी जनजागृती करून त्यांना किसान क्रेडिट कार्ड उपलब्ध करून द्यावे अशी सूचना जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना केली. मुख्य कार्यकारी अधिकारी, मंदार पत्की, यांनी बँकांना उमेद अंतर्गतवैयक्तिक कर्ज वाटपा संबधित कर्जमंजुरीचे प्रमाण वाढवण्या संबंधी व बचत गटांचे सर्व प्रलंबित कर्ज प्रकरण निकाली काढण्याच्या सुचना दिल्या. आनंद पिंगळे, प्रकल्प संचालक, डीआरडीए यांनी उमेद अंतर्गत बचत गटांना होणाऱ्या कर्ज वाटपाचा आढावा सभागृहास सादर केला. जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत.सुशिल गरुड, महाव्यवस्थापक यांनी उद्दिष्टे व प्रलंबित कर्ज प्रकरण बद्दल माहिती दिली, महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मंडळ व इतर मागासवर्गीय महामंडळाच्या योजनांच्या कर्ज प्रकरणे अजूनही बँक शाखास्तरावर प्रलंबित आहेत ते प्रलंबित प्रकरण लवकरात लवकर निकाली काढावे पात्र उमेदवारांना जास्तीत जास्त कर्ज उपलब्ध करून द्यावे व जिल्ह्याच्या विकासामध्ये सर्वांनी आपलं सहकार्य करावे, असे निर्देश देण्यात आले.

सदर बैठकीमध्ये ज्ञानेश्वर टापरे अग्रणी बँक प्रबंधक, पियुष अग्रवाल, प्रबंधक, भारतीय रिझर्व बँक, नागपूर, अतुल इंगळे, व्यवस्थापक, नाबार्ड, श्री प्रविण दुधे, महाव्यवस्थापक, यवतमाळ जि. को. बँक, श्रीमती शिल्पा गायकवाड, मुख्य प्रबंधक, भारतीय स्टेट बँक, आनंद पिंगळे, प्रकल्प संचालक, डीआरडीए, सुशील गरुड, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, दिपक तिवारी, संचालक, आरसेटी इतर विविध बँकांचे जिल्हा समन्वयक व सरकारी प्रायोजित उपक्रमाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.



## बालाजी देवस्थानच्यावतीने गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी

बाभुळगाव - बालाजी देवस्थान समितीच्या वतीने वैराग्यमूर्ती स्वच्छतेचे महामेरू आणि थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी दि. 20 रोजी बालाजी देवस्थान मंदिरात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सामाजिक कार्यकर्ते चंदू अडेकर यांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या या थोर संतांच्या स्मृतीला यावेळी उजाळा देण्यात आला. ग्रामविकासासाठी गाडगे महाराजांनी दिलेली दशसूत्री आजही तितकीच प्रासंगिक असून, त्यांच्या विचारांमुळेच समाजात परिवर्तनाची लाट निर्माण झाली, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. याप्रसंगी बालाजी देवस्थान समितीचे अध्यक्ष रिकपचंद जैन, उपाध्यक्ष राजू येवतकर, सचिव प्रेमचंद छल्लाणी, सहसचिव रमेश गुप्ता, कोषाध्यक्ष नन्ना महाजन, सदस्य राजू बोरकर, दिनेश वर्मा, प्रताप देशमुख, प्रकाश पारतकर ,नरेश दखनकर , बालू वांढरे, मुन्ना ठाकूर, व गावातील नागरिक उपस्थित होते.

# वर्कऑर्डरसाठी कंत्राटदारांची 'फिल्डिंग'..! पैनगंगेचे पात्र माफियांच्या ताब्यात

**जनमाध्यम प्रतिनिधी**


यवतमाळ - यवतमाळ जिल्ह्यातील रेती घाटांच्या लिलावाची प्रक्रिया पूर्ण होऊन बराच काळ लोटला असला, तरी अद्याप कंत्राटदारांना 'वर्क ऑर्डर' मिळालेल्या नाहीत. तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय विलंबामुळे अधिकृत उत्खनन सुरू होऊ शकलेले नसताना, दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उपसा सुरू असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे.

जिल्ह्यातील पैनगंगा नदी पात्रातील दहा महत्त्वाच्या रेती घाटांचा लिलाव नगरपरिषद निवडणुकीपूर्वीच पार पडला होता. संबंधित कंत्राटदारांनी लिलावाची रक्कम भरून आवश्यक तांत्रिक पूर्तता देखील केली होती. मात्र, लिलाव अंतिम टप्प्यात असतानाच निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने खनिकर्म विभागाने वर्क ऑर्डर देणे स्थगित केले. निवडणुका संपल्यानंतर आदेश मिळतील, अशी अपेक्षा होती. मात्र, अद्यापही कंत्राटदारांना 'थोडे



दिवस थांबा' एवढेच उत्तर मिळत आहे.या विलंबामुळे कंत्राटदारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. बँकांचे व्याज, यंत्रसामग्रीचा खर्च वाढत असून प्रत्यक्ष काम सुरू नसल्याने नुकसान सहन करावे लागत आहे. परिणामी, वर्क ऑर्डर मिळवण्यासाठी काही कंत्राटदारांनी राजकीय नेत्यांकडे धाव घेत 'फिल्डिंग' लावण्यास सुरुवात केल्याची चर्चा जिल्ह्यात सुरू आहे. दरम्यान, अधिकृत आदेश नसल्याचा फायदा घेत रेती माफिया सक्रिय झाले आहेत. पैनगंगा नदी पात्रातून जेसीबी, पोकलेनच्या सहाय्याने रात्रीच्या वेळी शेकडो ब्रास रेतीचा अवैध उपसा केला जात असून ती मोठ्या किमतीत विकली जात आहे. महसूल विभाग डोळेझाक करत असल्याचा आरोप होत आहे.आज अवैध उपसा झालेल्या घाटांवर भविष्यात अधिकृत कंत्राटदारांनी ताबा घेतल्यास रेती शिल्लक नसेल, अशा स्थितीत जबाबदारी कोणाची? असा सवाल उपस्थित केला जात आहे. जिल्हाधिकारी आणि खनिकर्म विभाग लवकर निर्णय घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून अन्यथा बांधकाम क्षेत्रावरही त्याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## वेचक





### कलगाव येथे माकडांचा धुमाकूळ; नागरिक त्रस्त


महागाव : कलगाव येथे गेल्या काही दिवसांपासून माकडांचा मोठ्या प्रमाणात धुमाकूळ सुरू असून यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माकडांकडून घरे, शेतातील पिके तसेच रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांवर हल्ले होत असल्याच्या घटना वाढल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर माकडाच्या हल्ल्यात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली असून यामुळे संपूर्ण गावात संतापाची लाट उसळली आहे. या गंभीर घटनेनंतर ग्रामस्थांनी वनविभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. माकडांचा बंदोबस्त न केल्यास भविष्यात आणखी जीवितहानी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना युवा सेना तालुका प्रमुख तथा ग्रामपंचायत सदस्य सुशील गावंडे म्हणाले, "कलगाव येथे माकडांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. माकडाच्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. यापुढे अशा घटना घडू नयेत यासाठी वनविभागाने तात्काळ चोख उपाययोजना कराव्यात. अन्यथा महिलांना घेऊन थेट फॉरेस्ट कार्यालयात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा त्यांनी दिला. दरम्यान, ग्रामस्थांनी वनविभाग व स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी त्वरित पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी केली आहे.

### आसेगाव देवी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत बांधला वनराई बंधारा



यवतमाळ - बाभूळगाव पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या आसेगाव देवी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत वेगवेगळे उपक्रम हाती घेण्यात आलेले आहे या उपक्रमाचा एक भाग म्हणून ग्रामपंचायत तर्फे यावली रोडवरील नाल्यावर श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यात आला. ग्रामपंचायतीने पाणी आडवा पाणी जिरवा या उद्देशाखाली जमिनीची पाण्याची पातळी वाढवण्याचे दृष्टीने वेगवेगळे ठिकाणी बंधारे बांधले आहे. यावेळी बाभुळगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सौ ढोले मॅडम,विस्तार अधिकारी हेडाऊ, लांजेकर, सहाय्यक गटविकास अधिकारी दत्तात्रय तंबलवाड,सरपंच सचिन चव्हाण,ग्रा.प अधिकारी ओंकेश कावलकर ,ग्रामपंचायत सदस्य सुभाष ताबडू,महसूल विभागाचे महसूल सहाय्यक गडपायले,जिल्हा परिषदेचे शिक्षक शिक्षक राऊत सर,विद्यार्थी,आशा सेवीका कृषी सहायक,दातारकर कृषी सखी ग्रामपंचायत चे सर्व कर्मचारी व ग्राम स्तरावरील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### प्रा. सिताराम ठाकरे पाटील यांची जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या प्रतिनिधीपदी निवड!



महागाव - सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सोडवणारे आणि सहकार क्षेत्रात भरीव योगदान असणारे व्यक्तिमत्त्व म्हणून प्रा. सिताराम ठाकरे पाटील यांची ओळख आहे.करंजखेड येथील माजी सरपंच तथा सहकार महर्षी म्हणून ओळख असलेले पाटीलांची यवतमाळ जील्हा मध्यवर्ती बँकेच्या प्रतिनिधीपदी निवड झाली, ही करंजखेड गावासाठी अभिमानाची बाब आहे. प्रा. सिताराम ठाकरे यांचा सहकार क्षेत्रातील विविध विकास कामांच्या अनुभवातून जनसामान्यांसाठी सेवाभावी वृत्तीचा जनसामान्यांना निश्चितच लाभ होणार आहे. सामाजिक चळवळीत सक्रिय असणारे प्रा. ठाकरे गरजवंताच्या हाकेला ओ देऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतत पुढाकार घेतात. जनसामान्यांचे नेते प्रा. सिताराम ठाकरे पाटील यांची झालेली निवड ही त्यांच्या कार्याची पावती आहे. सहकार क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान पाहता करंजखेड विविध सेवा सहकारी सोसायटीद्वारे एकमुखाने झालेली निवड ही प्रा. सिताराम ठाकरे पाटील यांच्या प्रामाणिक, सेवाभावी वृत्तीची पावती आहे.

# राज्यस्तरीय मातंग समाज उपवर वधू-वर परिचय मेळावा ; परिचय पुस्तिकेचे प्रकाशन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - मातंग समाजातील लग्नायोग्य युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा, पालकांचा वेळ, खर्च व मानसिक ताण कमी व्हावा, तसेच समाजातील स्थळांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध व्हावी या उद्देशाने अण्णाभाऊ साठे क्रांती परिषद (म.रा.), मुक्तासाळवे महिला शक्ती परिषद आणि मातंग उपवर वधू-वर सूचक केंद्र व विवाह मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य राज्यस्तरीय मातंग समाज उपवर वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्रीराम भवन, विश्रामगृहाजवळ, नवी वस्ती, बडनेरा (जि. अमरावती) येथे होणार आहे.



या मेळाव्यास महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, छत्तीसगड व राजस्थान येथील विविध जिल्ह्यांमधून नोंदणीकृत उपवर युवक-युवती व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यावेळी १,००० पेक्षा अधिक उपवर युवक-युवतींच्या छायाचित्रांसह सविस्तर बायोडाटे असलेल्या राज्यस्तरीय मातंग उपवर युवक-युवती परिचय पुस्तिकेचे भव्य प्रकाशन होणार आहे. या पुस्तिकेत शिक्षित, उच्चशिक्षित, शासकीय-निमशासकीय कर्मचारी, व्यावसायिक, उद्योजक तसेच विधवा व घटस्फोटीत स्थळांचा समावेश आहे.

मेळाव्यात प्रशस्त स्थळ, भोजन व निवास व्यवस्था, स्वतंत्र चर्चा कक्ष, पास प्रणाली व सुलभ नोंदणीची सुविधा उपलब्ध राहणार आहे. मातंग समाजातील उपवर युवक-युवती व पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थापक व अध्यक्ष ईश्वरदास गायकवाड यांनी केले आहे. नोंदणीसाठी ९९२३९४१५८९ / ९३२५८९७३२५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# जळका येथे तालुकास्तरीय खेळ व क्रीडा स्पर्धेचे आयोजन

## प. सं. व केंद्र यांचे द्वारे 25 ते 27 डिसेंबर तीन दिवसीय सामने

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - खेळ व कला संवर्धन मंडळ पंचायत समिती राळेगाव व केंद्र यांचे वतीने, तालुकास्तरीय शालेय खेळ व क्रीडा स्पर्धा -2025 चे आयोजन प्रतिभा आश्रमशाळा जळका येथे करण्यात आले आहे. दी. 25 डिसेंबर रोजी स्पर्धेच्या उदघाट्न सोहळ्याला आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ.अशोक उईके उपस्थित असतील .कब -बुलबुल उत्सव,सांघिक व वैयक्तिक खेळ यात विध्यार्थी -विध्यार्थिनीं सहभागी होतील . विध्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित व्हावा, त्यांच्या उपजत गुणांना वाव मिळावा या उद्देशाने या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन जळका येथे करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच सुशीला शेराम, प्रमुख अतिथी म्हणून माजी जि. प. सदस्या उषाताई भोयर,माजी प. सं. सदस्या शीला सलामे, उपसरपंच संजय पांडे, शाळा व्यव. समिती अध्यक्ष रवी डवरे, उपाध्यक्ष सोनाली आडे, लोकविकास संस्था सचिव संकेत राजगडकर व ग्रा. प. सदस्य व शाळा व्यव. समिती सदस्य जळका आदि मान्यवर उपस्थित राहतील. या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा बक्षीस वितरण सोहळा शनिवार 27 डिसेंबर ला होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुशीला तुमराम सरपंच जळका, बक्षीस वितरण सोहळ्याचे प्रमुख उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील,प्रमुख अतिथी तहसीलदार अमित भोईटे,गट विकास अधिकारी केशव पवार, पोलीस निरीक्षक शीतल मालटे, राळेगाव मुख्याधिकारी गिरीश पारेकर, सहा. गविअ. भारती इसाळ, गटशिक्षणाधिकारी नवनाथ लहाने, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कपिल गोटे, आर. एफ. ओ. मेघा गुंडलवार, शाळा व्यव. समिती अध्यक्ष रवी डवरे,सर्व ग्रा. प. व शाळा व्यव. समिती सदस्य ही मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहे. तालुका स्तरीय शालेय खेळ व क्रीडा स्पर्धेच्या हा तीन दिवसीय महोत्सव गट विकास अधिकारी केशव पवार, सहा. गविअ. भारती इसाळ, गटशिक्षणाधिकारी नवनाथ लहाने, विस्तार अधिकारी निलेश दाभाडे यांच्या मार्गदर्शनात होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जळका, राळेगाव केंद्रप्रमुख डॉ. कल्पना डवले, खैरी केंदप्रमुख हरिदास वैरागडे, वाढोणा केंद्रप्रमुख संजय पांडे, सावरखेडा केंद्रप्रमुख मुकेशचंद्र भोयर, धानोरा केंद्रप्रमुख दीपेश शेंडे, क्रीडा सचिव सागर इंझळकर, जि. प. शाळा जळका मुख्याध्यापक जगदीश ठाकरे व सर्व मुख्याध्यापक सर्व शिक्षकांवृंद विशेष शिक्षक परिश्रम घेतं आहे.

# हवामान बदल विषयावरील राष्ट्रीय निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - स्थानिक शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय केळापूर (पांढरकवडा),सरदार पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय मोहदा आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय जळगाव जामोद यांच्या संयुक्त विद्यमाने "क्लायमेट चेंज : क्रायसिस टू कलेक्टिव ॲक्शन" या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.

भारतासह संपूर्ण जग हवामान बदलाच्या गंभीर समस्येला सामोरे जात असून वाढते तापमान, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती व त्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम या विविध पैलूंवर विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधांतून सखोल मांडणी केली. ही स्पर्धा खुल्या गटासाठी आयोजित करण्यात आली होती. त्यामुळे देशभरातील



विविध राज्यांतील महाविद्यालये व विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या राष्ट्रीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक एम.ए. भूगोल शाखेतील विद्यार्थिनी रविना (बाबा मस्तनाथ विद्यापीठ, रोहतक – हरियाणा) यांनी पटकावला असून त्यांना ३३३३ रुपये रोख पारितोषिक देण्यात आले. द्वितीय क्रमांक एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजीच्या विद्यार्थिनी अनिशा याडू (पंडित रविशंकर शुक्ला विद्यापीठ, रायपूर – छत्तीसगड) यांनी मिळवला असून त्यांना २२२२ रुपये पारितोषिक देण्यात आले. तर तृतीय क्रमांक बी.एस्सी. गणित शाखेतील संस्कृती अमोल चौधरी (मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, महाराष्ट्र) यांनी पटकावला असून त्यांना १११ रुपये पारितोषिक देण्यात आले. संस्था सचिव माननीय श्री. विजयराव मोघे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यासाठी शिवरामजी मोघे महाविद्यालय केळापूरचे प्राचार्य डॉ.अजय सोळंके, सरदार पटेल महाविद्यालय मोहदाचे प्राचार्य डॉ. नितीन सिंगवी,श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय जळगाव जामोदचे प्राचार्य डॉ. जी. एम. मायी तसेच डॉ.राधेश्याम चौधरी,डॉ.निलेश निंबाळकर,डॉ.सुनील चोरे व डॉ.सुयोग मानकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# दिग्गजांना धडा..! रिक्षा चालकाच्या 'सुसाट' विजयाची चर्चा

## मागास समजल्या गेलेल्या प्रभागाने दाखवली मतांची श्रीमंती

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - दिग्रस नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एका साध्या रिक्षाचालकाने राजकीय समीकरणे उलथवून लावत इतिहास घडवला आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत तीनचाकी रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे बिलाल मिरावाले यांनी थेट नगरपालिकेत प्रवेश करत "सुसाट रिक्षा"ची ताकद दाखवून दिली आहे.

एमआयएम पक्षाचे उमेदवार बिलाल मिरावाले यांना मोतीनगर प्रभागातून उमेदवारी देण्यात आली होती. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास समजल्या जाणाऱ्या या प्रभागातील मतदारांनी मोठे राजकीय बल, पैसा आणि आमिष यांना नाकारत चार बलाढ्य व श्रीमंत उमेदवारांना



धोबीपछाड देत बिलाल यांना अवघ्या ४७ मतांच्या फरकाने दणदणीत विजय मिळवून दिला. या विजयाने तथाकथित उच्चभ्रू, सुशिक्षित आणि स्वतःला सुसंस्कृत म्हणवणाऱ्या समाजाला एक प्रकारची सणसणीत चपराक दिली असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. कारण संपूर्ण शहरातील अनेक प्रभागांत धनदांडग्या उमेदवारांनाच संधी मिळालेली असताना, मोतीनगरच्या मतदारांनी मात्र माणुसकी, संघर्ष आणि प्रामाणिक पणाला कौल दिला. विशेष म्हणजे, बिलाल यांच्या विजयासाठी येथील महिला व नागरिकांनी उपास, नवस आणि प्रार्थना केल्या. इतकेच नव्हे तर, गरीब नागरिकांनीच त्यांच्या अनामत रकमेची जमवाजमव केली. निवडणुकीसाठी त्यांना नवे कपडे, चपला व आवश्यक साहित्य देखील लोकांनीच विकत घेऊन दिले. ही बाब या निवडणुकीला वेगळे आणि भावनिक परिमाण देणारी ठरली. दिग्रस नगरपालिकेच्या शंभर वर्षांच्या इतिहासात प्रथमच एमआयएम पक्षाचा खाता उघडत, बिलाल मिरावाले यांच्या रूपाने तळागाळातील, सक्रिय आणि संघर्ष शील उमेदवाराला जनतेने संधी दिली आहे. हा विजय केवळ एका उमेदवाराचा नसून, लोकशाहीतील सामान्य माणसाच्या ताकदीचा विजय असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# 'फुलसांवगी' परिसर बनला गांजा तस्करीचा हब, तरुण पिढी नशेच्या विळख्यात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - एकीकडे जिल्हा प्रशासनाकडून व्यसनमुक्तीचे दावे केले जात असताना, दुसरीकडे यवतमाळ जिल्ह्यातील फुलसांवगी हे गाव गांजा तस्करीचे मुख्य केंद्र (हब) म्हणून समोर आले आहे. पोलिसांच्या वारंवार होणाऱ्या कारवायांना न जुमानता तस्करीचे जाळे अधिकच घट्ट होत असून, यात अल्पवयीन मुलांचा बळी दिला जात असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

फुलसांवगी ते थेट तेलंगणा फुलसांवगी हे गाव केवळ स्थानिक पुरवठ्यापुरते मर्यादित राहिले नसून, येथून मोठ्या प्रमाणात गांजाची आंतरराज्य तस्करी केली जात असल्याचे समोर आले आहे. तस्करांनी आपले जाळे ढाणकी, बीटरगाव, महागाव ते थेट माहूर आणि तेलंगणातील आदिलाबाद पर्यंत पसरवले आहे. पोलिसांनी आजवर अनेक तस्करांना जेरबंद केले असले, तरी या व्यवसायातील 'मुख्य सूत्रधार' अजूनही मोकाटच असल्याने तस्करी थांबण्याचे नाव घेत नाही आहे. या तस्करीचे सर्वात भयावह रूप म्हणजे यात अल्पवयीन मुलांचा वाढता सहभाग. तस्कर या मुलांना पैशांचे आमिष दाखवून किंवा व्यसनाची सवय लावून त्यांच्याकडून गांजाची ने-आण करण्याचे काम करून घेत आहेत. ही मुले पोलिसांच्या नजरेत लवकर येत नसल्याने तस्करांनी ही नवी शक्कल लढवली आहे. यामुळे शाळकरी आणि महाविद्यालयीन मुलांचे भविष्य अंधकारमय




झाले आहे. शासनाने दारूच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ केल्याने व्यसनाधीन तरुणांनी आपला मोर्चा आता गांजाकडे वळवला आहे. दारूपेक्षा गांजा स्वस्त आणि सहज उपलब्ध होत असल्याने यवतमाळ शहरासह ग्रामीण भागातील तरुण पिढी गांजाच्या झुरक्यात गुरफटली आहे. मागणी वाढल्याने या अवैध व्यवसायात अनेकांनी उडी घेतली असून, गल्लीबोळात गांजाची पाकिटे सहज उपलब्ध होत आहेत. गांजाच्या अतिसेवनामुळे तरुणांमध्ये मानसिक आजार, फुफ्फुसांचे विकार आणि इतर दुर्धर आजारांचे प्रमाण वाढले आहे. यवतमाळ जिल्ह्याची ओळख एकेकाळी शेतीसाठी होती, मात्र आता वाढत्या व्यसनाधीनतेमुळे हा जिल्हा 'आजारी तरुणांचा जिल्हा' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.

संसदेत पडसाद उमटून सुद्धा प्रशासन सुस्त.. : यवतमाळचे खासदार संजय देशमुख यांनी नुकत्याच झालेल्या संसदेच्या अधिवेशनात या गंभीर विषयावर आवाज उठवला होता. गुटखा, तंबाखू आणि प्रामुख्याने गांजा यांसारख्या अंमली पदार्थांवर कडक निर्बंध लादण्याची मागणी त्यांनी केली होती. मात्र, लोकप्रतिनिधींनी इतक्या मोठ्या स्तरावर प्रश्न मांडूनही स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणेने याकडे डोळेझाक केल्याचे चित्र दिसत आहे. फुलसांवगीमध्ये गांजाचा मोठा साठा असल्याची शक्यता वारंवार वर्तवण्यात येत आहे. या साठ्यांवर तात्काळ छापे टाकून हा व्यवसाय मुळापासून उपटून टाकावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता, यामागच्या मोठ्या गुंडांना जेरबंद करण्याची गरज आहे. यवतमाळ जिल्ह्याला गांजाच्या या विळख्यातून वाचवण्यासाठी शासनाने केवळ घोषणा न करता ठोस कृती करण्याची वेळ आली आहे. जर वेळीच उपाययोजना केल्या नाहीत, तर संपूर्ण तरुण पिढी या नशेच्या आहारी जाऊन उद्ध्वस्त होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# कापूस पिकावर बोंडअळी नसून बोंडसड रोगाचा प्रादुर्भाव

## संशोधन करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ – यवतमाळ जिल्ह्यात कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. सन २०१९ पासून कापूस पिकावर बोंडअळी असल्याची अफवा पसरविण्यात आली; मात्र शास्त्रीय संशोधनातून कापूस पिकावर बोंडअळी नसून बोंडसड (Boll Rot) रोगाचा प्रादुर्भाव असल्याचे स्पष्ट झाले आहे. या संदर्भात अंबोडा (ता. महागाव) येथील शेतकरी अमृत दादाराव देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

देशमुख यांनी नमूद केले की, सन २०१८ पासून कापूस संशोधन केंद्र, नागपूर येथील शास्त्रज्ञांच्या संपर्कात राहून या विषयावर माहिती दिली जात आहे. संशोधनातून बोंडअळीऐवजी बोंडसड रोग असल्याचे निष्पन्न झाले असतानाही बोंडअळीच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून महागड्या औषधांची फवारणी करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांचा लाखो रुपयांचा खर्च वाया गेला. उत्पादनात घट आणि आर्थिक अडचणींमुळे अनेक शेतकरी अडचणीत सापडले असून आत्महत्यांचे प्रसंगही घडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कापूस पिकावरील बोंडसड रोगाबाबत कृषी विभाग, कृषी विद्यापीठ, शास्त्रज्ञ व शेतकऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन शास्त्रीय संशोधनावर आधारित ठोस उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. एका महिन्याच्या आत या विषयावर निर्णय न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे व सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

## पिंपळखुटा गावात विविध विकासात्मक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी

**धामणगांव रेल्वे/ वार्ताहर**

राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत पिंपळखुटा(ता. धामणगाव, जि. अमरावती) येथे गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध लोकाभिमुख उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. या उपक्रमांमुळे गावातील आरोग्य,स्वच्छता, पाणीपुरवठा, पर्यावरण संवर्धन तसेच सामाजिक विकासाला चालना मिळाली आहे. या कार्यक्रमा मध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०२५-२६ अंतर्गत ग्रामपंचायत पिंपळखुटा यांची अंतिम तपासणी करण्यात आली. पथक प्रमुख म्हणून मा. डॉ. प्रफुल्ल भोरखडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती धामणगाव रेल्वे हे प्रामुख्याने उपस्थित होते. पथक सदस्य म्हणून निलेश वाघ, विस्तार अधिकारी, (पंचायत) तथा ऋषिकेश परतेकी व गजानन सोमवंशी (कनिष्ठ अभियंता) ग्रा.पा.पुरवठा उपविभाग, धामणगाव रेल्वे, त्याचबरोबर अनिता डोंगरे (अंगणवाडी पर्यवेक्षिका) प्रेमकुमार आंबुलकर (गटसमन्वयक) व विशाल सुटे (समूह समन्वयक) उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायतीची परिशिष्ट-२ अनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तपासणी तथा प्रत्यक्ष भेटी देऊन गुणांकन



करण्यात आले. यावेळी सचिव कुमारी पल्लवी रंगारी गावातील सरपंच दिलीप राऊत उपसरपंच पद्मा मेश्राम तथा इतर पदाधिकारी, तथा इतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. तपासणी वेळी गावातील सर्व गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. बचत गट, युवक मंडळ व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

अभियानाअंतर्गत गावात गुरे-ढोरे पाणी पिण्यासाठी हौद उभारण्यात आला, त्यामुळे पशुधनाच्या पाणीपुरवठ्याची समस्या कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच गावात दिशादर्शक फलक बसविण्यात आल्याने गावात ये-जा करणाऱ्या नागरिकांना व पाहुण्यांना योग्य मार्गदर्शन मिळणार आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वनराई बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले. यामुळे पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून जंगली प्राण्यांना याचा लाभ होणार आहे.याच कार्यक्रमात पंतप्रधान आवास (घरकुल) योजना अंतर्गत लाभार्थ्यांना नव्या घरांचा गृहप्रवेश देण्यात आला. पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान दिसून आले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे पिंपळखुटा गाव विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून लोकसहभागातून गाव समृद्ध करण्याचा संकल्प ग्रामपंचायतीच्या वतीने यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ३ जानेवारी रोजी सूपरमून दिसणार

**अमरावती/ क्रा.प्र.**

जेव्हा पृथ्वी आणि चंद्रातील अंतर सर्वात कमी असते तेव्हा सुपरमून होतो. यामुळे चंद्र मोठा आणि उजळ दिसतो. ३ जानेवारी रोजी पौर्णिमेच्या दिवशी सूपरमून दिसणार आहे. या दिवशी पृथ्वीपासून चंद्राचे अंतर कमी राहिल. त्यामुळे चंद्र या दिवशी मोठा व प्रकाशमान दिसेल. सरासरी पृथ्वी-चंद्र हे अंतर ३ लाख ८५ हजार कि.मी. असते. जेव्हा पृथ्वी-चंद्र हे अंतर ३ लाख ७० हजार कि.मी. च्या आत असते त्याला सुपरमून असे म्हणतात.



चंद्र पृथ्वीच्या जवळ आल्याने समुद्राच्या भरती-ओहोटीची तिव्रता वाढणे, वादळ यासारख्या घटना घडू शकतात. पृथ्वीवरुन आपण नेहमी चंद्राचा ५९ टक्के भाग पाहता येतो. चंद्रावरुन पृथ्वी ही ९८.४ टक्के दिसू शकते. चंद्रावरुन पृथ्वीवर प्रकाशकिरण येण्यास १.३ सेकंद लागतात.

चंद्राचे वय हे ४.६५ अब्ज वर्ष आहे. चंद्र हा पृथ्वीपासून दरवर्षाला ३.८ सेंटीमिटर लांब जात आहे. त्यामुळे पृथ्वीचा फिरण्याचा वेग कमी होईल व १०० वर्षांनी दिवस हा २ मिली सेकंदने मोठा होईल. चंद्रावर ३० हजार विवरे व १२ पर्वत आहे. पर्वत व विवरे दुर्बिणीमधून अगदी चांगल्या प्रकारे पाहता येतात. ३ जानेवारी ला संध्याकाळी दिसणारा सूपरमून खगोलप्रेमींनी व जिज्ञासूंनी अवश्य बघावा. नवीन वर्षातील ही पहिली संधी आहे. हा सूपरमून अगदी साध्या डोळ्यांनी पाहता येईल, अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी दिली आहे.

सुपरमून ही एक खगोलीय घटना आहे ज्यामध्ये चंद्र त्याच्या सामान्य आकारापेक्षा मोठा दिसतो. वर्षातून तीन ते चार वेळा सुपरमून दिसतात. सुपरमून दिसण्याचे कारण खूपच रंजक आहे. या काळात, चंद्र पृथ्वीभोवती फिरत असताना त्याच्या अगदी जवळ येतो. या अवस्थेला पेरिजी म्हणतात. दरम्यान, जेव्हा चंद्र पृथ्वीपासून दूर जातो तेव्हा त्याला अपोजी म्हणतात. ज्योतिषी रिचर्ड नोले यांनी पहिल्यांदा १९७९ मध्ये सुपरमून हा शब्द वापरला. चंद्र दर २७ दिवसांनी पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करतो. दर २९.५ दिवसांनी एकदा पौर्णिमा देखील येते. प्रत्येक पौर्णिमा हा सुपरमून नसतो, परंतु प्रत्येक सुपरमून पौर्णिमेला येतो. चंद्र पृथ्वीभोवती लंबवर्तुळाकार कक्षेत फिरतो, म्हणून पृथ्वी आणि चंद्रातील अंतर दररोज बदलते.

## रेल्वेगाड्यांमध्येही तत्काळ तिकीट आरक्षणासाठी आता ओटीपी आधारित प्रमाणीकरण

**अमरावती** : भारतीय रेल्वेने तत्काळ तिकीट आरक्षणासाठी नवीन ओटीपी आधारित प्रमाणीकरण प्रणाली टप्प्या-टप्प्याने अंमलात आणण्याचा निर्णय घेतला असून अमरावती-पुणे एक्स्प्रेससह मध्य रेल्वेवरील पाच रेल्वेगाड्यांमध्ये तत्काळ तिकीट आरक्षणासाठी ही नवीन ओटीपी-आधारित प्रमाणीकरण प्रणाली लागू करण्यात आली आहे.

मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार गाडी क्रमांक ११०५० पुणे-अमरावती एक्स्प्रेस, गाडी क्रमांक ११०२९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस -कोल्हापूर कोयना एक्स्प्रेस, गाडी क्रमांक ११०५५ लोकमान्य टिळक टर्मिनस- गोंडा गोदान एक्स्प्रेस, गाडी क्रमांक ११०६१ लोकमान्य टिळक टर्मिनस जयनगर एक्स्प्रेस, गाडी क्रमांक १२१५७ पुणे – सोलापूर हुतात्मा एक्स्प्रेस या रेल्वेगाड्यांमध्ये ओटीपी आधारित प्रमाणीकरण प्रणाली १९ डिसेंबरपासून सुरू करण्यात आली आहे.ही नवीन प्रणाली संगणकीकृत पीआरएस खिडकी, अधिकृत दलाल, तसेच आयआरसी टीसीच्या संकेतस्थळ आणि ॲपद्वारे आरक्षित करण्यात येणाऱ्या तत्काळ तिकिटांसाठी लागू आहे.

या प्रक्रियेनुसार आरक्षणाच्या वेळी दिलेल्या मोबाइल क्रमांकावर प्रवाशांना एकदाच वापरता येणारा संकेतांक (ओटीपी) प्राप्त होईल. ओटीपीची यशस्वी पडताळणी झाल्यानंतरच तत्काळ तिकीट जारी करण्यात येईल.

## कमलाबाई टावरी स्कूलमध्ये चिमुकल्यांच्या अभिनयातून साकारली 'आषाढी वारी'



**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

विठ्ठल- विठ्ठल गजरात, टाळ-मृदंगाच्या तालावर आणि भक्तीभावाने ओथंबलेल्या वातावरणात पंढरपूरची आषाढी वारी जणू घुईखेड येथे अवतरली होती. वर्ग पाचवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयातून साकारलेल्या आषाढी वारी दर्शनाने उपस्थितांची मने जिंकली आणि डोळ्यांचे पारणे फेडले.

कमलाबाई टावरी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचालित चांदूर रेल्वे तालुक्यातील कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड येथे संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. डॉ. बद्रीदास रामचंद्रजी टावरी (बाबूजी) यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य सांस्कृतिक महोत्सव उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. वीरेंद्र जगताप (माजी आमदार) होते. प्रमुख अतिथी म्हणून घोडे अकॅडमी, चांदूर रेल्वेचे संचालक अंकुश घोडे, तसेच संस्थेचे संचालक कृष्णकुमार टावरी, उपाध्यक्ष प्रेमकुमार टावरी, संस्थेच्या सदस्या शारदा टावरी, स्नेह टावरी, शाळा प्रमुख रूपेश भोयर आणि उपमुख्याध्यापक सतीश वानखडे प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश मिरासे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. वर्ग पाचवीच्या विद्यार्थ्यांनी पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाचा सोहळा, वारकऱ्यांची दिंडी, अभंग-भजनांच्या माध्यमातून सादर करत आषाढी वारीचा भक्तिरस अनुभव दिला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षिका मृणाल पाचखेडे व माधुरी लाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन लिना क्षीरसागर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राधा राऊत, राणी जवंजाळ, मनीषा बनकर, शारीरिक शिक्षक अजिंक्य मदन यांनी विशेष योगदान दिले. तसेच शालेय कर्मचारी अतुल राजगुरे, होमेंद्र भोयर, गोपाल मांडवेकर, बंडू गिरी, नलू जुनघरे, वंदना गावंडे व सुबोध पांडे यांनी मोलाची मदत केली.

## पशिचम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती/ क्रा.प्र.**

युनिर्व्हसिटी ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, जयपूर येथे ०८ ते १२ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.





चमूंमध्ये आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वेचा वेदांत व-हाडे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा मधुर जोगळेकर, श्रेयस कांबळे, राजकुमार कासदेकर, कार्तिक मरसकोल्हे व कैलाश ठाकरे, स्व. दादाराव अडसड शारीरिक शिक्षण महाविद्यालय, धामणगांव रेल्वेचा वेदांत पंचबुध्दे, सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाचा सुभान मुन्नीवाले, अभिषेक काळे व मंगेश इंगळे, इंदिरा महाविद्यालय, कळंबचा आदित्य सिरसाट व रवि भुशनवार, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा बंटी साहु, अनिकेत जाधव, जीवन पवार व तेजस हरमकर, एस.एस. जी.एम.सी.ई. शेगांवचा देवांग भोंडे, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा अमेय पोटे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा दर्शन सलामे आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा रामक्रिष्ण धिकार याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे दि. २७ डिसेंबर, २०२५ ते ०५ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# अमरावतीत 'Think Like a Topper' गुणवत्ता विकास कार्यशाळा

**अमरावती/ का.प्र.**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद अमरावती, अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघ व मेरिट मेकर प्रोजेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गुणवत्ता वाढ व विकास कार्यशाळा – Think Like a Topper' हा उपक्रम संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.





या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा. संजिता महापात्रा (भा.प्र.से.) परिस्थिती कशिही असू द्या आपण हार मानायची नाही सतत पुढे चालत रहायचे,मोठ होण्यासाठी मोठे स्वप्न बघणे आवश्यक आहे असे अमरावती जिल्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मत व्यक्त करुन विद्यार्थ्यांना परिक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प. अमरावतीप्रिया देशमुख होत्या त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले. त्यांनी बदलत्या शिक्षण पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे आवाहन केले.

मुख्याध्यापक संघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष प्रविणजी दिवे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन विद्यार्थी दशा व दिशा याची चांगली मांडणी केली गुणवत्ता वाढ होण्यासाठी जिल्ह्यात हा प्रयोग मुख्याध्यापक संघाद्वारे पहिल्यांदाच करण्यात आला.कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक. संदीप मुर्तडकर, संचालक – मेरिट मेकर प्रोजेक्ट यांनी 'Think Like a Topper' या संकल्पनेतून यशस्वी विद्यार्थ्यांची विचारसरणी, अभ्यासाचे योग्य नियोजन, उत्तरलेखन कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन व परीक्षाभिमुख तयारी याबाबत सखोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमास अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष मा.प्रविणजी दिवे, सचिव मा. प्रदीपजी नानोटे, अमरावती महानगर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष मा. मजहर सुफी अली, सचिव मा. विशालजी भोयर मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष गजानन राव वानखेडे,ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविंद्र हगवणे सहसचिव गजानन मानकर, नितिन ठाकरे तसेच सारथी चे संचालक मा. प्रथमेश देशमुख आदी अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या प्रियाताई कडू, मालवे, कोहळे जिल्हा शिक्षणसंस्था अमरावतीचे इखणकर मान्यवर उपस्थित होते.या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाबाबत योग्य दिशा मिळाल्याने सदर उपक्रम यशस्वी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले देशमुख यांनी अतिशय सुंदर असे सुत्रसंचालन करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली तसेच अमरावती मुख्याध्यापक संघाचे महानगर सचिव भोयर यांनी आभार व्यक्त केले.

## संक्षिप्त

### बी.डी.एस. हायस्कूल येथे डॉ.पंजाबराव देशमुख जयंती



**चांदूर रेल्वे -** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,चांदूर रेल्वे येथे शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्त शाळेमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे आजीवन सभासद बाबुराव देशमुख, राजाभाऊ देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक डॉ. अतुल ठाकरे, शाळा तपासणी अधिकारी नंदकुमार मानकर, जिंगल बेल इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक अतुल उजैनकर, माजी मुख्याध्यापक अशोक मोटघरे, डाखोरे तसेच कार्यक्रम संयोजक एस.व्ही.पाटील,पवन देशमुख, एस.जी.उदापुरे, एस.बी. देशमुख, राठोड व मन्नालाल गुप्ता विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन कडू उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या गौरव गीतावरील विद्यार्थीनींने केलेल्या सुंदर सामुहीक नृत्याने व स्वागतगीताने झाली. सोबतच मुख्याध्यापक डॉ. अतुल ठाकरे व सहाय्यक शिक्षिका डॉ. ज्योती शेंदुरजने यांना नुकतीच आचार्य पदवी प्राप्त झाल्याबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक डॉ.अतुल ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटक ॲड.गजानन पुंडकर साहेब यांनी विद्यार्थ्यांना भाऊसाहेब जयंती कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले व रीतसर कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. जे.बी.शेंदुरजणे यांनी केले तर आभार एस.जी.उदापुरे यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### शिराळा येथे निषेध मोर्चा व सभा



**शिराळा -** येथील बस स्टॉपवर लावलेल्या महापरिनिर्वाण दिनाचे बॅनरवर अज्ञात व्यक्तीने खोडसाळ पणा केल्यामुळे बौद्ध व शिराळा येथील प्रतिष्ठित नागरिक यांनी निषेध मोर्चा काढुन शांतता मार्गाने निषेध करण्यात आला. कोणतेही वाहन न अडविता शांततीच्या मार्गाने निषेध सभा घेण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पोस्टर वर अज्ञात व्यक्तीने खोडसाळ पणा केल्यामुळे बौद्ध व शिराळा येथील प्रतिष्ठित नागरिक युवक यांनी अज्ञात व्यक्तीचा निषेध करुन घोशणा देण्यात आल्या. सदर कार्यक्रमाला यावेळी कृउबास संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य मिंलिदभाऊ तायडे, राष्ट्रवादीचे मनोजभाऊ देशमुख, मंगेश काळमेघ, प्रहारचे शिवाजी खाडे, भाजपचे राजु गंधे, अरुणभाऊ देशमुख, माजी सरपंच सचिन देशमुख, मारोतराव नागे, पत्रकार डीआर वानखडे, रुपरावजी तायडे, दिनेश तायडे अवधूत तायडे सुरेशराव सुखदान, पोलीस पाटील प्रशांत ढोरे, सिध्दार्थ ततंरपाळे, शेखर तायडे, सत्यजित नितवणे, अजय तायडे, कपिल तायडे, तथा महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### वंचित मुलांसाठी आरोग्य भारतीचा अभिनव उपक्रम

**अमरावती-** अमरावती महानगरातील आरोग्य भारती आणि श्री अंबादेवी संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती शहरातील वंचित मुलांसाठी दादाची शाळा हा उपक्रम राबविला जाणार आहे. या अभिनव उपक्रमाचा उद्घाटन सोहळा नुकताच पद्मश्री शंकर बाबा पापळकर यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बालरोग तज्ञ डॉ.जयंत पांढरीकर, माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.श्यामसुंदर निकम, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राजकुमार दासरवाड, दादाची शाळा चे संचालक अभिजीत पोखरणीकर व डॉक्टर आशिष डगवार उपस्थित होते.शहरात राहणाऱ्या वंचित मुलांसाठी त्यांना आश्रय मिळावा व त्यांचे भविष्य सुकर व्हावे यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला आरोग्य भारतीचे सचिव प्रसाद बनसोड, राजेश कोल्हे, डॉ. कौशिक जोशी ,डॉ.मंगेश कोल्हटकर, डॉ.राजेंद्र साठे ,डॉ.अश्विनी सहस्त्रबुद्धे, शैलेश पोतदार, सुनील सरोदे, चंद्रशेखर भोंदू, सुनील खराटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर प्रिया मोहोड व प्रांजली जोगे यांनी केले.

### संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**चांदुर रेल्वे -** स्थानिक राजर्षी शाहू सायन्स कॉलेज मधील कला, संगीत व सांस्कृतिक समितीद्वारे महान समाजसुधारक संत गाडगे बाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व स्वर्गीय अतुल जगताप माध्यमिक महाविद्यालय मधील विद्यार्थ्यांसाठी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर व तसेच त्यांच्या कार्यावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. पराग वडनेरकर, तसेच स्वर्गीय अतुल जगताप माध्यमिक महाविद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. तळोकार तसेच राजश्री शाहू इंग्लिश स्कूल च्या मुख्याध्यापिका भगत, आयपीसी समन्वयक प्रा. वाणी तसेच कला संगीत व सांस्कृतिक समितीच्या समन्वयक प्रा.डॉ.केचे उपस्थित होते.

अध्यक्षांनी आपल्या भाषणात गाडगेबाबांनी त्यांच्या जीवनात केलेल्या सामाजिक कार्याचे सखोल आणि अनमोल अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच वेशभूषा स्पर्धेला परिषद म्हणून प्रा. डॉ.भगत मॅडम आणि प्रा. ममता पळसपगार मॅडम परीक्षक म्हणून लाभल्या. सदर कार्यक्रमाला डॉ. केचे, सह समन्वयक डॉ. पाचकवडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

# चांदूरबाजार निवडणुकीच्या निकालाने भाजप अन काँग्रेसला मंथनाची गरज ?

**चांदूरबाजार/वार्ताहर**

नुकत्यांच लेल्या चांदूरबाजार सरपरिषदेच्या निवडणुकीत प्रहार नशक्ती पक्षाचे नगराध्यक्षासहित नगरसेवक निवडून आल्याने डारने धडाकेबाज एंट्री करीत नगरपरिषदे वर प्रहारचा झेंडा रोवला बसल्याने शहरातील भाजप व काँग्रेसला पाहिजे तसे यश न मिळाल्याने हे दोन्ही पक्ष जणुकाही कोमात गेल्याचे निवडणुकीच्या निकालातून दिसून येत आहे. आता जि.प. व पं.स. च्या निवडणुकीसाठी झापले अस्तित्व टिक्कविण्यासाठी भाजप व काँग्रेस नेत्यांनी एक वेगळी रणनीती आखून या पराभवातून सावरण्यासाठी दोन्ही पक्षाच्या नेत्यांना मंथन करण्याची गरज असल्याचे दिसून येत आहे.

नगरपरिषदेची निवडणूक २ डिसेंबरला झाली असता तब्बल २० दिवसांनी लागलेल्या निकालाने प्रहार जनशक्ती पक्षाने आपले वर्चस्व प्रस्थापित करून नगरपालिकेवर झेंडा रोवला आहे. नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाकरिता एकूण पाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. त्यामध्ये प्रहार पक्षातर्फे मनिषा मनीष नांगलिया, भाजपतर्फे कांताबाई उबनलाल अहिर, काँग्रेसतर्फे फरहाना तबसून साजिद, राष्ट्रवादी (अ.प) तर्फे फातेमाबानो, तर शिवसेना (उबाठा) तर्फे सरोज अरुण चौधरी यांनी निवडणूक लढविली असता यामध्ये मनीषा मनीष नांगलीया यांनी ५००१ मते घेवून भाजपच्या कांताबाई अहिर यांचा ७३५ मतांनी पराभव केला आहे. या पाचही उमेदवारांना नाकारत ९४ मतदारांनी नोटाचे बटन दाबून आपला रोष व्यक्त केला आहे. चांदूरबाजार नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचो निवडणुकीकरिता प्रहार, भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी (अजित पवार) राष्ट्रवादी (शरद पवार) तसेच शिवसेना (उबाठा) या पक्षाच्यावतीने नगरसेवककरिता प्रहार जनशक्ती पक्षाचे १९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. त्यामधील १३ विजयी झाले, भाजप पक्षाचे १७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले असताना त्यामधील फक्त २ उमेदवार विजयी झाले, तर काँग्रेस यांनी १३, राष्ट्रवादी (श. प.) यांनी २, राष्ट्रवादी (अ.प) यांनी ६, तर शिवसेना (उबाठा) यांनी ५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले असताना यातील प्रत्येक पक्षातील फक्त एक उमेदवार विजयी झाले, तर अपक्ष ३० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले असताना त्यामधील २ उमेदवार विजयी झाली आहे.यामध्ये बऱ्याच प्रभागामध्ये मतदारांनी नोटाचे बटन दाबून आपला रोष व्यक्त केला आहे, तर काँग्रेसचे श्वेता देवानंद गायकवाड यांचा दोन मतांनी, म. जावेद यांचा नऊ मतांनी, तर चंदा खंडारे यांचा पाच मतांनी या तीन उमेदवारांचा पराभव अगदी थोड्या मतांनी झाला असल्याने शहरातील कार्यकर्त्यांना नक्कीच मार्गदर्शन तसेच पुढील रणानीती आखण्याची गरज आहे. आता या निकालावरून असे लक्षात येते की, आगामी होऊ घातलेल्या जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना वर्चस्वाच्या यांनी आपल्या लढाईकरिता प्रत्येक पक्षातील नेत्यांनी मंथन करून आपल्या काय चुका झाल्या. त्या दुरुस्त करण्यासाठी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून नव्याने दम भरून आगामी जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत पूर्ण ताकदनिशी मैदानात उतरण्याची गरज असल्याचेसुद्धा दिसून येत आहे.

## शहरात एकच चर्चा प्रभाग चौदाव्याने घेतले भाजपच्या उमेदवारांना पदरात

### भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचा लीड तोडत १२४ मतांची दिली आघाडी

**अंजनगाव सुर्जी /वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी नगर पालिकेच्या नव्वद वर्षाच्या इतिहासात कधी नव्हे इतकी चूरशीची निवडणूक यावेळी झाली असून सहा फेरी मध्ये जनतेतून थेट निवडून येणाऱ्या नगरध्यक्ष पदासाठी होणाऱ्या मत मोजणीत कधी भाजप तर कधी काँग्रेस आघाडी अशी धडकी भरवणारे प्रसंग घडले शेवटी झालेल्या अटीतटीच्या सहाव्या फेरीत भाजप ला १२४ मतांनी आघाडी घेत निसटता विजय मिळाला यात चौदाव्या प्रभागात नगरसेविका पदासाठी असलेल्या उमेदवार प्रियंका शंकर मालठाणे भरघोस मतांची आघाडी घेऊन भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला लीड दिल्याने भाजप चे अविनाश गायगोले यांच्या विजयासाठी निर्णायक ठरल्या आहेत.

त्यामुळे या प्रभागाने भाजप ची शान राखल्याचे सर्वत्र बोलल्या जात आहे.



२१ ला येथील नगर पालिकेच्या सभागृहात सार्वत्रिक निवडणूकीची मत मोजणी झाली यात शहारातील चौदा प्रभागातील २८ नगरसेवक व एक नगराध्यक्ष यांच्यासाठी एकूण सहा फेरीमध्ये मतमोजणी झाली यात पहिले पाच प्रभागाच्या दोन फेऱ्यात भाजप व शिंदे सेना यांच्यात लढत पाहायला मिळाली त्यानंतर प्रभाग सहा पासून शिंदे सेनेला मागे टाकत काँग्रेस च्या पंजाने तिसऱ्या चौथ्या फेरीत मजल मारत भाजप ला टक्कर देत पाचव्या फेरीत ४११ मतांनी आघाडी घेत पहिल्या क्रमांकात स्थान मिळवले त्यानंतर सहाव्या फेरीत प्रभाग तेरा व चौदा प्रभागात झालेल्या मत मोजणीत भजप चे अविनाश गायगोले यांना १८५३ व काँग्रेस च्या आयशाबनो रशीद खां यांना १३१८ मते मिळालयाने एकूण मतदानात गायगोले हे १२४ मतांनी आघाडी घेत विजयी झाले गायगोले यांना १०१८१ मते मिळाली तर आयशाबनो रशीद खां यांना १००५७ मते मिळाली तर विद्यमान आमदार गजानन लवटे यांचे कानिष्ठ चिरंजीव उबाठा चे उमेदवार यश लवटे यांना तिसऱ्या क्रमांकाची ६१३२ तर शिवसेना शिंदे गटाच्या डॉ स्पृहा डकरे यांना चौथ्या क्रमांकाची ५५९४ इतकी मते मिळाली यावेळी शहारात निवडणूकीच्या प्रचाराच्या रणधुमाळीत होणाऱ्या चर्चेतून अंजनगावात अतीतटीची लढत होणार हे भाकीत स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित करून पूर्वीच वर्तवले होते नेमके तेच गणित मत मोजणीत समोर आले नगराध्यक्ष पदासह काही प्रभागातील उमेदवार सुद्धा बारा ते अठरा मतांच्या फरकाने विजयी झाले. त्यामुळे शहरात एकच चर्चा प्रभाग चौदाव्याने भाजपची राखली शान अशी चर्चा शहरात जागोजागी होत आहे.

## स्वबळाचा अट्टाहास भाजपला नडला, काँग्रेसलाही धडा

**अमरावती/का.प्र.**

नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीत १२ पैकी सहा ठिकाणी वर्चस्व प्रस्थापित करण्यात भाजपला यश मिळाले असले तरी, अनेक ठिकाणी मित्र पक्षांसोबत युती न केल्याने भाजपला नुकसान सहन करावे लागले आहे. काँग्रेसने निवडणुकीत झुंज दिली खरी, पण दोन नगरपालिकांमध्येच यश मिळू शकले. जिल्ह्यातील मतदारांनी संमिश्र असा कौल दिला आहे, त्यातून भाजप आणि काँग्रेसलाही धडा मिळाला आहे.

या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी गेल्या निवडणुकीच्या तुलनेत भाजपचे दोन जागांचे झालेले नुकसान ही 'सतर्कते'चा इशारा देणारी बाब ठरली आहे. काँग्रेसने चिखलदरा आणि दर्यापूर या दोन प्रतिष्ठेच्या जागा जिंकून अस्तित्व दाखवून दिले आहे, तर शिवसेना शिंदे गट, शिवसेना उद्धव ठाकरे गट, प्रहार जनशक्ती पक्ष आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते नीलेश विश्वकर्मा यांच्या नेतृत्वातील आपले चांदूर आघाडीने प्रत्येकी एक जागा जिंकून स्थान बळकट केले आहे.भाजपने जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी, अचलपूर, वरूड, शेंदूरजनाघाट आणि धामणगाव रेल्वे या पाच नगरपालिका आणि धारणी नगरपंचायतीवर झेंडा फडकवला आहे. गेल्या निवडणुकीत भाजपने आठ ठिकाणी वर्चस्व



प्रस्थापित केले होते. यावेळी प्रहारने भाजपाकडून चांदूरबाजारची जागा खेचून घेतली आहे, तर मोर्शीत भाजपची जागा यावेळी शिवसेना शिंदे गटाला मिळाली आहे. दर्यापूरची जागा भाजपकडून काँग्रेसने हिसकावून घेतली आहे. या ठिकाणी शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाने एकत्र येऊन भाजप चे नुकसान करण्यात मोठे योगदान दिले आहे.या निवडणुकीत काही नगरपालिकांचा अपवाद वगळता महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्ष हे स्वतंत्रपणे लढले. त्यामुळे स्थानिक पातळीवरील पक्षसंघटनात्मक शक्तीचे मोजमाप करण्याची संधी सर्वच पक्षांना मिळाली होती.चिखलदरा नगरपालिकेत काँग्रेसने भाजपला चांगलाच धक्का दिला. ऐन निवडणुकीआधी राष्ट्रवादी अजित पवार गटातील नगराध्यक्षपदाच्या उमेदवारासह माजी नगरसेवकांचा संपूर्ण संच भाजपमध्ये आणण्याची भाजपची खेळी ही त्यांच्यावरच उलटली. चिखलदरा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती हे अविरोध निवडून आले होते. त्यामुळे ही पालिका भाजपसाठी प्रतिष्ठेची होती, पण भाजपच्या पळवापळवीच्या राजकारणाला मतदारांनी नाकारले.

दर्यापूरमध्ये अकोटचे भाजपचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नी नलिनी भारसाकळे यांना पराभव पत्कारावा लागला. त्यांच्या जाऊ आणि काँग्रेसच्या उमेदवार मंदाकिनी भारसाकळे यांनी त्यांचा पराभव केला. काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे यांच्या गृह क्षेत्रातील हे यश काँग्रेससाठी महत्त्वाचे.अंजनगाव सुर्जी आणि अचलपूर मध्ये भाजपचा विजय झाला. हिंदू मतांच्या धृवीकरणाचा लाभ भाजपला झाला. अंजनगावात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार गजानन लवटे यांच्या पुत्राचा पराभव लवटे यांच्यासाठी धोक्याचा इशारा देणारा ठरला.धामणगावात भाजपच्या अर्चना रोठे-अडसड या नगराध्यक्षपदी निवडून आल्या, शिवाय सर्व २० जागांवर भाजपचे सदस्य निवडून आले. वरूड आणि शेंदुरजनाघाट मधील भाजपचे यश उल्लेखनीय ठरले. चांदूर रेल्वेत आपले चांदूर आघाडीच्या डॉ. प्रियंका विश्वकर्मा मोर्शीत शिंदे गटाच्या प्रतीक्षा गुल्हाने, चांदूर बाजारमध्ये प्रहारच्या मनीषा नांगलिया, नांदगाव खंडेश्वरमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या प्राप्ति मारोटकर यांचा विजय संबंधित पक्षांना बळ देणारा ठरला.

## ग्राहक हक्कांचे सामाजिक वास्तव

२४ डिसेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन हा केवळ एका कायदेशीर तरतुदीची आठवण करून देणारा दिवस नसून तो आधुनिक समाजातील बाजारपेठेचे स्वरूप, ग्राहकाचे स्थान आणि लोकशाही मूल्यांची कसोटी लावणारा महत्त्वाचा प्रसंग आहे. औद्योगिकीकरणानंतर आणि विशेषतः जागतिकीकरण व डिजिटल क्रांतीनंतर बाजारव्यवस्था अधिक व्यापक, वेगवान आणि गुंतागुंतीची झाली आहे. या प्रक्रियेत ग्राहक हा केवळ वस्तू किंवा सेवा खरेदी करणारा घटक न राहता तो आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेतील एक महत्त्वाचा सहभागी घटक बनला आहे. त्यामुळे ग्राहक हक्कांचा विचार करताना केवळ कायदे, नियम किंवा तक्रार निवारण यापुरते मर्यादित न राहता समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्याचे व्यापक सामाजिक परिणाम समजून घेणे अत्यावश्यक ठरते.

समाजशास्त्र बाजारपेठेकडे केवळ आर्थिक व्यवहारांची जागा म्हणून पाहत नाही, तर ती सत्तासंबंध, विषमता, वर्गरचना आणि सांस्कृतिक प्रभाव यांचे प्रतिबिंब मानते. बाजारात उत्पादक, व्यापारी, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि सेवा पुरवठादार यांच्याकडे प्रचंड भांडवल, माहिती, जाहिरातशक्ती आणि निर्णयक्षमता एकवटलेली असते. याउलट सामान्य ग्राहक अनेकदा मर्यादित माहिती, आर्थिक गरज, वेळेची टंचाई आणि सामाजिक दबाव यांखाली निर्णय घेत असतो. या असमतोलातूनच ग्राहक शोषणाची बीजे रुजतात. भेसळयुक्त अन्नपदार्थ, निकृष्ट औषधे, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, लपविलेल्या अटी-शर्ती, अवाजवी दर आणि अपुऱ्या सेवा या समस्या आजच्या बाजारव्यवस्थेत सामान्य झालेल्या दिसतात. हे प्रकार केवळ वैयक्तिक नुकसान घडवत नाहीत, तर समाजाच्या आरोग्यावर, विश्वासावर आणि नैतिकतेवरही खोल परिणाम करतात.भारतीय समाजरचनेत ग्राहक हा एकसारखा नसून तो विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांमध्ये विभागलेला आहे.अनेकदा अशिक्षित किंवा अर्धशिक्षित ग्राहकांना करारातील अटी, मोजमापातील फसवणूक किंवा गुणवत्तेतील तफावत समजून घेणे कठीण जाते. याउलट शहरी भागातील ग्राहकांकडे पर्याय अधिक असले तरी करारांची गुंतागुंत, सेवा क्षेत्रातील अस्पष्टता आणि डिजिटल व्यवहारांमुळे शोषणाचे नवे प्रकार उदयास आलेले दिसतात. त्यामुळे ग्राहक हक्कांचा प्रश्न हा केवळ व्यक्तीपुरता मर्यादित न राहता सामाजिक संरचनेशी घट्टपणे जोडलेला आहे.ग्राहक हक्कांची संकल्पना ही मानवी हक्कांच्या व्यापक चौकटीत समाविष्ट आहे. सुरक्षिततेचा हक्क म्हणजे केवळ धोकादायक वस्तूंपासून संरक्षण नव्हे, तर भेसळयुक्त अन्न, निकृष्ट औषधे, असुरक्षित वाहतूक सेवा आणि अपुऱ्या आरोग्य सुविधा यांपासून समाजाचे रक्षण करणे होय. अशा उल्लंघनांचा परिणाम थेट सार्वजनिक आरोग्यावर होतो आणि त्याचा आर्थिक व सामाजिक भार संपूर्ण समाजाला सहन करावा लागतो.

माहितीचा हक्क हा जाहिरातप्रधान आणि ब्रँड-केंद्रित समाजात विशेष महत्त्वाचा ठरतो. आकर्षक जाहिराती, सवलतींचे आमिष आणि आभासी प्रतिमा यांच्या प्रभावाखाली ग्राहक अनेकदा वास्तवापासून दूर जातो. वस्तूंचा खरा दर्जा, घटक, उपयोग, दुष्परिणाम आणि अटी यांची स्पष्ट माहिती मिळणे हा ग्राहकाचा मूलभूत हक्क आहे. परंतु साक्षरतेतील असमानता, भाषेची अडचण आणि तांत्रिक माहितीची गुंतागुंत यामुळे अनेक ग्राहक या माहितीपासून वंचित राहतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे 'माहितीतील विषमता'चे गंभीर उदाहरण आहे, जे आर्थिक विषमतेइतकेच समाजासाठी घातक ठरते.निवडीचा हक्क हा बाजारपेठेतील स्वातंत्र्याचे प्रतीक मानला जातो, परंतु प्रत्यक्षात तो अनेक मर्यादांनी बांधलेला असतो. मक्तेदारी, सांठगाठ, ब्रँडचे वर्चस्व आणि जाहिरातींचा सततचा मारा यामुळे ग्राहकाची निवड अनेकदा नियंत्रित होते. ग्रामीण भागात तर पर्यायांचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील अवलंबित्व यामुळे निवडीचा हक्क कागदावरच राहतो. त्यामुळे निवडीचा हक्क प्रत्यक्षात प्रभावी करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप, स्पर्धात्मक वातावरण आणि सामाजिक नियमनाची गरज भासते. ग्राहकांचे ऐकून घेणे आणि त्यांना न्याय देणे ही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत अट आहे. परंतु प्रत्यक्षात तक्रार नोंदविण्याची गुंतागुंतीची प्रक्रिया, न्याय मिळविण्यास लागणारा वेळ आणि खर्च यामुळे अनेक ग्राहक न्यायप्रक्रियेपासून दूर राहतात. डिजिटल युगात ग्राहक हक्कांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. ऑनलाइन खरेदी, डिजिटल पेमेंट, ॲप-आधारित सेवा आणि सोशल मीडिया जाहिरातींमुळे ग्राहकांचे जीवन जरी सोयीचे झाले असले तरी फसवणूक, डेटा चोरी, गोपनीयतेचा भंग आणि सायबर गुन्हे यांचा धोका वाढलेला आहे. डिजिटल साक्षरतेतील तफावतामुळे अनेक ग्राहक या नव्या धोक्यांसमोर असुरक्षित राहतात. त्यामुळे आज ग्राहक हक्कांचा विचार करताना डिजिटल सुरक्षा, माहिती संरक्षण आणि तांत्रिक जागरूकता हे नवे सामाजिक मुद्दे केंद्रस्थानी आलेले आहेत.ग्राहक हक्कांचा प्रश्न हा केवळ वैयक्तिक अन्यायापुरता मर्यादित नसून तो सामाजिक न्यायाशी जोडलेला आहे. जेव्हा गरीब ग्राहकाची फसवणूक होते, तेव्हा त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर आणि समुदायावर होतो. कर्जबाजारीपणा, आरोग्यावरील वाढता खर्च, मानसिक ताणतणाव आणि सामाजिक अस्थैर्य या समस्या निर्माण होतात. त्यामुळे ग्राहक संरक्षण ही सामाजिक कल्याणाची एक महत्त्वाची बाजू ठरते.शेवटी, राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की ग्राहक हा बाजारपेठेतील दुर्बल घटक नसून तो लोकशाहीचा एक सजग नागरिक आहे. त्याचे हक्क, त्याची सुरक्षितता आणि त्याची प्रतिष्ठा ही समाजाच्या प्रगतीची खरी मोजपट्टी आहे. या दिनानिमित्ताने ग्राहक शिक्षण, सामाजिक जागृती आणि सामूहिक जबाबदारीची भावना दृढ केली, तरच ग्राहक हक्कांचा खरा अर्थ साकार होईल आणि बाजारपेठ मानवी मूल्यांनी समृद्ध होईल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

## ऑनलाईन खरेदी आणि ग्राहकांचे सुरक्षा कवच

दरवर्षी २४ डिसेंबर हा दिवस भारतात 'राष्ट्रीय ग्राहक दिन' म्हणून साजरा केला जातो. २४ डिसेंबर १९८६ रोजी तत्कालीन राष्ट्रपतींनी ऐतिहासिक 'ग्राहक संरक्षण कायद्या' वर स्वाक्षरी केली होती, ज्याची आठवण म्हणून हा दिवस पाळला जातो. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि बाजारपेठेतील अनिष्ट प्रथांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी त्यांना सक्षम करणे, हेच या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट आहे.परंतु, १९८६ आणि आजच्या परिस्थितीत जमीन-अस्मानाचा फरक आहे. गेल्या काही वर्षात इंटरनेट आणि स्मार्टफोन्समुळे खरेदी-विक्रीची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. आजचा ग्राहक हा केवळ दुकानात जाणारा ग्राहक राहिला नसून तो डिजिटल ग्राहक' (Digital Consume) बनला आहे. या बदलत्या काळाची गरज ओळखून आणि ऑनलाईन व्यवहारांमधील वाढत्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जुना कायदा बदलून अधिक सक्षम असा ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ लागू करण्यात आला.

विशेषतः ऑनलाईन खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी या नवीन कायद्यात अत्यंत महत्त्वाच्या ६ तरतुदी खालीलप्रमाणे आहेतः

१. ई-कॉमर्स आता कायद्याच्या कक्षेत (Scope of E-commerce) २०१९ च्या नवीन कायद्याने 'ई-कॉमर्स'ला कायदेशीर चौकटीत आणले आहे. यानुसार, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट सारख्या मोठ्या ई-कॉमर्स कंपन्यांपासून ते सोशल मीडियावर वस्तू विकणाऱ्या विक्रेत्यांपर्यंत सर्वजण आता कायद्याला जबाबदार आहेत. त्यांना आता केवळ 'आम्ही मध्यस्थ आहोत' (Intermediary) असे सांगून आपली जबाबदारी टाळता येणार नाही.

२. खराब वस्तूंसाठी 'उत्पादन दायित्व' (Product Liability) ही या कायद्यातील सर्वात क्रांतिकारी तरतूद आहे. जर ऑनलाईन मागवलेली वस्तू सदोष (Defective) असेल आणि त्यामुळे ग्राहकाला काही इजा किंवा नुकसान झाले, तर त्याची जबाबदारी आता साखळीतील प्रत्येकाची असू शकते. म्हणजे, वस्तू बनवणारा (Manufacturer), सेवा पुरवणारा आणि ती वस्तू विकणारा ऑनलाईन प्लॅटफॉर्म (Seller) हे सर्वजण ग्राहकाच्या नुकसानभरपाईसाठी जबाबदार धरले जाऊ शकतात.

३. परतावा आणि रिफंडचे नियम (No Return Policy is Illegal) अनेकदा ऑनलाईन साइट्सवर 'No Return, No Refund' असे ठळकपणे लिहिलेले असते. परंतु, कायद्यानुसार जर वस्तू किंवा सेवा सदोष असेल, तर ती परत घेण्यास नकार देणे हा 'अनुचित व्यापार व्यवहार' (Unfair Trade Practice) ठरतो. तसेच, ग्राहकाने ऑर्डर रद्द केल्यास त्यांच्यावर अवास्तव शुल्क (Cancellation Charges) लावण्यासही मनाई करण्यात आली आहे.

४. न्यायक्षेत्राची व्याप्तीः आता कंपनीच्या दारात जाण्याची गरज नाही जुन्या कायद्यात ग्राहकाला मोठी अडचण अशी होती की, ज्या शहरात कंपनीचे मुख्य ऑफिस आहे (उदा. मुंबई किंवा दिल्ली), तिथे जाऊन दावा दाखल करावा लागत असे. पण २०१९ च्या कायद्याने ग्राहकाला स्वतःच्या राहत्या किंवा नोकरीच्या ठिकाणी (Place of Residence) असलेल्या जिल्हा आयोगात तक्रार दाखल करण्याचा अधिकार दिला आहे. यामुळे सामान्य ग्राहकाचा आणि वकिलांचा मोठा त्रास वाचला आहे.

५. 'डार्क पॅटर्न्स' (Dark Pattern) पासून सावध राहा सध्या ई-कॉमर्स कंपन्या ग्राहकांना फसवण्यासाठी नवनवीन क्लृप्त्या वापरतात. उदा. 'फक्त २ वस्तू शिल्लका' असे खोटे सांगून घाई करणे (False Urgency), किंवा नकळत बास्केटमध्ये जादा वस्तू ॲड करणे (Basket Sneaking). याला 'डार्क पॅटर्न्स' म्हणतात. सरकारने आता या पद्धतींवर बंदी घातली असून, अशी फसवणूक झाल्यास ग्राहक दाद मागू शकतात.

६. भ्रामक जाहिरातींवर कठोर कारवाई ऑनलाईन विश्वात अनेकदा जाहिरात एक आणि प्रत्यक्षात वस्तू भलतीच, असा अनुभव येतो. अशा भ्रामक जाहिरातींना (Misleading Ads) आळा घालण्यासाठी 'केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाला (CCPA) कठोर कारवाईचे अधिकार दिले आहेत. खोटी माहिती देणाऱ्या कंपन्यांवर आणि त्या जाहिरातीत काम करणाऱ्या सेलिब्रिटींवरही (Endorsers) दंडात्मक कारवाई होऊ शकते.

ग्राहकांनी काय काळजी घ्यावी? (Checklist for Consume) कायदा आपल्या बाजूने असला तरी, 'सावध तो सुखी' हेच उत्तम ! पक्की पावती (Invoice): वस्तू आल्यावर बिल आले आहे ना, याची खात्री करा.

अनबॉक्सिंग व्हिडिओ: महागडी वस्तू उघडताना (Unboxing) त्याचा व्हिडिओ शूट करा, जेणेकरून वस्तू फुटलेली असल्यास तो पुरावा म्हणून वापरता येईल.तक्रार नोंदवाः फसवणूक झाल्यास ई-कॉमर्स कंपनीच्या 'Grievance Officer' कडे ४८ तासांच्या आत लेखी तक्रार करा.येणाऱ्या राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त सर्व सुजाण नागरिकांना व ग्राहकांना मनःपूर्वक शुभेच्छा! कायदा आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, गरज आहे ती आपण सजग होण्याची.

'जागो ग्राहक जागो, आपल्या हक्कांची व सुरक्षिततेची मागणी करा!'

**ॲड. राहुल हेमंत कडूसकर**



(बी.ई. (संगणक विज्ञान), एलएल.बी.)

# कट्यार येथील आदिवासींना जातीवाचक शिवीगाळ; आरोपी मोकाटच

## पीडित कुटुंबाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

■ प्रतिनिधी | अकोला ■

***अनुसूचित जमातीवरील अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यात दोन महिने उलटूनही आरोपींना अटक न झाल्याने पीडित कुटुंबाने प्रशासनाविरोधात थेट उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील आरोपी मोकाट फिरत असून साक्षीदारांना धमकावत असल्याचा आरोप पीडितांनी केला आहे.***



कट्यार (ता. जि. अकोला) येथील रहिवासी राजू नारायण सोळंके यांच्या कुटुंबावर ५ ऑक्टोबर २०२५ रोजी सार्वजनिक ठिकाणी जातीवाचक शिवीगाळ, अश्लील अपमान, जीवे मारण्याच्या धमक्या देत गंभीर अत्याचार करण्यात आला होता. याप्रकरणी ६ ऑक्टोबर रोजी बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात इंर्ग्क्रमांक ३१७/२०२५ नोंदविण्यात आली. या गुन्ह्यात अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ अंतर्गत कलम ३(१)(r), ३(१)(s), ३(२)(va) तसेच भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम ३(५), ३५१(२), ३५२, २९६ लावण्यात आली आहेत. तरीही आरोपी संजय महादेव देवकार, प्रकाश महादेव देवकार व दीपक महादेव देवकार यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. आरोपी गावात खुलेआम फिरत असून साक्षीदारांवर दबाव टाकत दहशत निर्माण करीत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे पीडित कुटुंब आणि साक्षीदार भयग्रस्त वातावरणात जीवन जगत असल्याचे त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळपासून जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे पीडित कुटुंबासह समाजातील नागरिकांनी शांततामय उपोषण सुरू केले. अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार तात्काळ अटक व पीडितांना संरक्षण अपेक्षित असताना तपास यंत्रणेची दिरंगाई चिंताजनक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

उपोषणकर्त्यांनी सर्व आरोपींना तात्काळ अटक, निष्पक्ष तपासासाठी तपास अधिकारी बदलणे अथवा विभागीय चौकशी, पीडित कुटुंब व साक्षीदारांना संरक्षण, साक्षीदारांना धमकावल्याप्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करणे तसेच वरिष्ठ पातळीवर देखरेख ठेवून केलेल्या कारवाईचा लेखी अहवाल देण्याच्या मागण्या केल्या आहेत. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास उपोषण अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला असून, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडल्यास त्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील, असा ठाम इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

# राष्ट्रीय किसान दिनी आदर्श ग्रामनिर्मितीचा संकल्प करा – कुलगुरू डॉ. शरद गडाख

■ प्रतिनिधी | अकोला ■



चेलका येथे शेतकरी–शास्त्रज्ञ परिसंवाद व शिवार फेरी संपन्न

दिवसेंदिवस घटत चाललेली उपजाऊ शेती जमीन आणि ग्रामीण युवकांचे शहरांकडे वाढते स्थलांतर ही चिंतेची बाब असली, तरी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती पुन्हा एकदा फायदेशीर आणि व्यावसायिक होत असल्याचे आशादायी चित्र असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. राष्ट्रीय किसान दिनानिमित्त अकोला जिल्ह्यातील आदर्श ग्राम चेलका येथे आयोजित शेतकरी–शास्त्रज्ञ परिसंवाद व शिवार फेरी कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

भारताचे माजी पंतप्रधान व शेतकऱ्यांचे कैवारी स्व. चौधरी चरणसिंह यांच्या जयंतीनिमित्त २३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय किसान दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण संचालनालयामार्फत आदर्श ग्राम संकल्पनेअंतर्गत हा कार्यक्रम प्रगतिशील शेतकरी रामेश्वर पाटील उंडाळ यांच्या शेतावर आयोजित करण्यात आला.

यावेळी कुलगुरू डॉ. गडाख यांनी शाश्वत, विषमुक्त, सेंद्रिय व नैसर्गिक शेतीबरोबरच हायड्रोपोनिक्स, एरोपोनिक्ससारखे आधुनिक तंत्रज्ञान शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. उत्पादन खर्च निम्म्याने कमी करणे, उत्पादकता वाढविणे तसेच गावातच प्रक्रिया उद्योग उभारून प्रक्रियायुक्त शेतमालाला थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणे हे शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सक्षम आणि आदर्श ग्रामनिर्मितीसाठी मॉडेल व्हिलेज संकल्पना प्रभावीपणे राबविण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी 'शेती ही केवळ व्यवसाय नसून जीवनपद्धती आहे' असे सांगत शेतकऱ्यांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी शास्त्रज्ञ, प्रशासन आणि शेतकरी यांचे एकात्मिक प्रयत्न गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. राष्ट्रीय किसान दिवस हा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चिंतन करून आधुनिक तंत्रज्ञानाशी शेती जोडण्याचा संकल्प करण्याचा दिवस असल्याचे डॉ. देवानंद पंचभाई यांनी नमूद केले.

संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने, शिक्षण संचालक डॉ. देवानंद पंचभाई, विस्तार शिक्षण विभागप्रमुख डॉ. नितीन कोष्टी, जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे, तालुका कृषी अधिकारी सौ. संध्या करवा, मॉडेल व्हिलेज नोडल अधिकारी प्रा. प्रकाश घाटोळ यांच्यासह विविध विषयतज्ज्ञ, ग्रामपंचायत प्रतिनिधी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश घाटोळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. किशोर बिडवे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चेलका ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# वातावरण नियंत्रण उपकरणाच्या पेटंटला मंजुरी

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची यशस्वी वाटचाल

■ प्रतिनिधी | अकोला ■



संरक्षित शेतीत वातावरण नियंत्रणाच्या दिशेने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी महत्त्वाची प्रगती साधली आहे. विद्यापीठाच्या कृषी अभियांत्रिकी अंतर्गत कृषी स्थापत्य अभियांत्रिकी विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या वातावरण नियंत्रण उपकरणाला इंडियन पेटंट ऑफिसकडून पेटंट मंजूर झाले आहे.

या नव्या तंत्रज्ञानाच्या उपकरणामुळे हवेतील वायू, सूर्यप्रकाश, आर्द्रता तसेच प्रकाशाची तीव्रता यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. स्मार्ट सेन्सर प्रणाली आणि स्वयंचलित नियंत्रण तंत्रज्ञानावर आधारित हे उपकरण संरक्षित शेतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यामुळे पिकांना आवश्यक पोषक वातावरण निर्मिती होऊन पिकांची वाढ, उत्पादन आणि गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार असून पर्यावरणीय संतुलन राखण्यासही हातभार लागणार आहे.

या पेटंटच्या नोंदणीबद्दल कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी कृषी अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे, कृषी स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. सुचिता गुप्ता, डॉ. राजेश मुरूमकर, डॉ. भाग्यश्री पाटील, डॉ. मृदुलता देशमुख तसेच प्रा. अजय तळोकार यांचे अभिनंदन केले.

संबंधित संशोधकांनी सांगितले की, हे तंत्रज्ञान कमी खर्चिक असून दीर्घकालीन वापरासाठी उपयुक्त आहे. या शोधाला पेटंट संरक्षण मिळाल्यामुळे 'मेक इन इंडिया' आणि हरित तंत्रज्ञान क्षेत्राला चालना मिळणार आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे यापूर्वी विद्यापीठाच्या कृषी अभियांत्रिकी विभागांतर्गत सौर प्रकाश कीटक सापळा, बहुउद्देशीय फेरो लाईट व फेरोसिटी लाईट कीटक सापळा, सौरऊर्जेवर चालणारे प्राणी प्रतिबंधक यंत्र, कृषी अवशेषांपासून उच्च मूल्याचे बायोचार निर्मिती यंत्र, बायोमास डिस्टिलेशन प्रणाली, सौरऊर्जेवर चालणारे खत पसरविणारे यंत्र, सिताफळ गर विलगीकरण यंत्र अशा सात पेटंटची नोंदणी झाली आहे. सदर वातावरण नियंत्रण उपकरण हे कृषी अभियांत्रिकी अंतर्गत नोंदणीकृत आठवे पेटंट ठरले आहे. कृषी अभियांत्रिकी विभागांतर्गत विकसित यंत्रे व उपकरणांमुळे विद्यापीठाला रॉयल्टी प्राप्त होत असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी दिली. एकूणच, हे पेटंट पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सकारात्मक व भविष्यात उपयुक्त ठरणारे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

### जानकीबाई डिजिटल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**अकोला** : बाल विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी अनेक नव उपक्रम राबविणाऱ्या जानकीबाई डिजिटल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न झाला. यात जेसीईडी स्कूल व ना.मा. चौधरी शाळेच्या संघात स्पर्धा घेण्यात आल्यात.

# 'इन्कलाब सेवा समिती'च्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■



आजच्या धकाधकीच्या जीवनात कौटुंबिक वादांचे प्रमाण वाढत असून प्रत्येक वेळी न्यायालयात जाणे सर्वसामान्यांना परवडणारे नसते. अशा परिस्थितीत २०१३ पासून कौटुंबिक वाद समजुतीने व संवादातून सोडवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'इन्कलाब सेवा समिती' ही स्वयंसेवी संस्था करीत आहे.

स्थानिक स्वराज्य भवन, अकोला येथे निखीलेश दिवेकर यांच्या वतीने 'इन्कलाब सेवा समिती'चे अध्यक्ष मोहम्मद एजाज यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या समितीकडे दररोज चार ते पाच प्रकरणे निवाड्यासाठी येतात. यामध्ये महिलांच्या पोटगीसंबंधी प्रश्न, मुलांच्या ताब्याचे वाद, तसेच हुंडासंबंधी तक्रारींचा समावेश असतो. काही प्रकरणे न्यायालयात गेल्यास शोषित महिलांना सरकारी वकील उपलब्ध करून देण्यासही संस्था मदत करते.

विशेष म्हणजे, समितीमार्फत ही सर्व प्रकरणे पूर्णतः निशुल्क सोडवली जात असून पती-पत्नी व त्यांच्या नातेवाईकांवर कोणताही आर्थिक भार पडत नाही. आतापर्यंत संस्थेने दहा हजारांहून अधिक प्रकरणे यशस्वीरीत्या हाताळली आहेत. समितीचे कार्यालय आरपीटीएस रोड, जुने शहर, अकोला येथे आहे.

# शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचा समारोप




■ प्रतिनिधी | अकोला ■

शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक १४ ते २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत स्थानिक दत्तक ग्राम सांगळूद येथे उत्साहात पार पडले. या सात दिवसीय शिबिराचा समारोप सोहळा दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला.

या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. श्री. गोपालजी खंडेलवाल हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना समाजसेवा, राष्ट्रनिर्मिती व स्वयंसेवक म्हणून जबाबदारीचे महत्त्व याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. जगदीश साबू तसेच सामाजिक कार्यकर्ते व छावा संघटनेचे श्री. रंजीत भाऊ काळे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, प्रगतशील शेतकरी, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अदिती मानकर यांनी केले. सात दिवसांच्या श्रमसंस्कार शिबिराचा सविस्तर अहवाल कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र रेवासकर यांनी सादर केला. आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. निशा वराडे यांनी केले.

याप्रसंगी स्वयंसेवक विद्यार्थी पुष्पक काळे, श्रुती थोरात, कोमल महाले-महल्ले व आनंद लाहोळे यांनी शिबिरातील अनुभव व मनोगत व्यक्त केले. श्रमदान, स्वच्छता, जनजागृती व सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# जि. प. शाळा लोहारी खु. येथे शाळास्तरीय गणित प्रदर्शनी उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोट ■



महान भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय गणित दिनाचे औचित्य साधून जि. प. शाळा लोहारी खु. येथे शाळास्तरीय गणित प्रदर्शनीचे आयोजन उत्साहात करण्यात आले. गणित–विज्ञान विषयाच्या शिक्षिका कु. सोनाली निचळ यांच्या संकल्पनेतून ही प्रदर्शनी राबविण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रदर्शनीचे उद्घाटन मुख्याध्यापक नितीन धोरण यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी गोडी निर्माण करणे तसेच दैनंदिन जीवनातील गणिताचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे कु. सोनाली निचळ यांनी प्रास्ताविकात नमूद केले. गणित हा भीतीचा विषय नसून आनंदाने शिकण्याचा विषय आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक नितीन धोरण यांनी केले.या प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी गणिताच्या विविध संकल्पनांवर आधारित एकूण ३१ आकर्षक व उपयुक्त प्रतिकृती सादर केल्या. अंकांची ओळख, बेरीज–वजाबाकी, लहान–मोठेपणा, घनफळ व क्षेत्रफळ, घड्याळ व वेळ, अपूर्णांक, कालमापन तसेच दैनंदिन जीवनातील गणितावर आधारित मॉडेल्स पाहून उपस्थितांनी विशेष कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता व तर्कशक्ती विकसित होत असल्याचे दिसून आले.प्रदर्शनीस उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक नितीन धोरण यांच्यासह शिक्षिका सोनाली निचळ, रुपाली ढवळे व सोनाली उज्जैनकर यांनी परिश्रम घेतले.

शेवटी आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**Change In Name**

I have change my Name From
**Mohd ILyas Ab. Ansar**
(As per old Passport Name/wrong Name) To
**MOHAMMAD ILYAS ABDUL ANSAR**
(New Name as Per on Two -Photo ID) Passport No ..... Address (it as Per Old Passport or if Change then as per Adhar) Near Panch Bngla Khidki Pur old city VTC Akola District AKOLA State Maharashota Pin Code No.444002

# श्री संताजी विद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी



■ प्रतिनिधी | अकोला ■

श्री संताजी विद्यालय अकोला येथे संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी स्वच्छता अभियान घेऊन साजरी करण्यात आली. सर्वप्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमात संत गाडगेबाबा यांच्या विचारांना प्रेरित होऊन सर्व मुलांनी शाळेच्या आजुबाजूच्या परिसरात जाऊन स्वच्छता अभियान राबविले. व या कार्यक्रमाच्या वेळेस वर्ग ७ विचा विद्यार्थी ओम नागरे व वर्ग ३ री चा विद्यार्थी सत्यम हल्दुनिया यांनी संत गाडगेबाबा यांची वेशभूषा परिधान करून, समाजामध्ये स्वच्छता अभियान या उपक्रमात भाग घेतला.

या कार्यक्रमास शाळेचे अध्यक्ष श्री मंगेशजी वानखडे, मुख्याध्यापक ज्योतीताई फंदाट, अश्विनीताई खोत, मंजुशाताई देशमुख , शाळेचे प्रभारी विठ्ठलराव नांदुरकर व इतर शिक्षकवृंद उपस्थित होते.

**नावात बदल**

मि **शिवराज नंदकिशोर खंडाळकर** पासपोर्ट साठी अर्ज केला आहे. परंतु माझ्या T.C. व मार्कशिटवर **शिवराज नंदु खंडाळकर** असे नाव आहे. तसेच ADHAR CARD आणि PAN CARD वर **शिवराज नंदकिशोर खंडाळकर** असे नाव आहे. सदरहू दोन्हीही नावाचा व्यक्ती एकच आहे, अशी मी हमी देतो.
दि. २३/१२/२०२५
**शिवराज नंदकिशोर खंडाळकर**
मो. ९०२८२३३०७७

**Change In Name**

I Have Change My Name in My Old Passport My Passport No is (E3833376)
OLD NAME
**MASOOD BI**
NEW NAME
**MASUDA KHATUN ABDUL HAQUE**
My DOB is 01/07/1941My Residential Address is :- Near Mominpura masjid Mominpura Akola 444001

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. क्र. ३८४/२०२५ — प्रोसेस नं.५०७२/२०२५
चौ.ता. २३/०१/२०२६ — दिनांक : १७/१२/२०२५

**अर्जदार :** १. अब्दुल रहेमान अब्दुल रहीम वय - ५४ वर्ष, धंदा - मजूरी रा. नायकवाडी पुरा, आकोट, ता आकोट जि. आकोला विरुद्ध

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे नायकवाडीपुरा, आकोट ता. आकोट जि. आकोला येथील रहिवाशी असुन अर्जदाराची आई नामे रकीमाबी अब्दुल रहीम ही दि. १४/०३/२०१७ रोजी आकोट ता. आकोट जि. आकोला येथे मरण पावली आहे. तसेच अर्जदाराचे वडील आणि रकीमाबी अब्दुल रहीम हिचे पती नामे अब्दुल रहीम अब्दुल रज्जाक हे देखील दि. ०१/११/१९९१ रोजी मरण पावले आहेत. मयत रकीमाबी अब्दुल रहीम यांच्या मृत्युनंतर अर्जदार हा तिचा मुलगा असुन मयत रकीमाबी अब्दुल रहीम हिचा एकमेव कायदेशीर वासस आहे त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वत: वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनाक १८/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोट, जि अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२०४/२०२५ — प्रोसेस नं.२००३८/२०२५
चौ.ता. १६/०१/२०२६ — दिनांक : ०५/१२/२०२५

**अर्जदार :** १. धनंजय मधुसूदन खपली २. श्रीमती माधवी मधुसूदन खपली दोघेही रा. अमृत कलश विद्यालय जवळ, अंबिका नगर, मलकापूर, ता. जि. अकोला. ३. उत्तरा मुकुंद भारव्दाज रा. मालीवाल गॅस गोडाउन जवळ, ज्योती नगर, जठारपेठ, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्री. मधुसूदन रामचंद्र खपली
**पत्ता :-** रा. अमृत कलश विद्यालय जवळ, अंबिका नगर, मलकापूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. मधुसूदन रामचंद्र खपली यांचे दि. ०४/१०/२०२० रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१२ /२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१६७/२०२५ — प्रोसेस नं.१९६२१/२०२५
चौ.ता. ०३/०१/२०२६ — दिनांक : २९/११/२०२५

**अर्जदार :** १. मंगेश दिगांबर तिडके २. योगेश दिगांबर तिडके ३. मोना दिगांबर तिडके रा. मुकुंद मंदिराच्या मागे, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्री दिगांबर नारायणराव तिडके
**पत्ता :-** रा. मुकुंद मंदिराच्या मागे, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. दिगांबर नारायणराव तिडके यांचे दि. १३/०८/२०२४ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/११/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ‘मी’पणाने भाजप बुडवला’

## वर्धेत भाजपची सत्ता निसटली; नेतृत्वाच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह

## पालकमंत्री असतानाही नगराध्यक्षपद हुकले

**वर्धा / रवींद्र लाखे**

वर्धा नगरपालिकेचा निकाल हा केवळ निवडणुकीतील पराभव नसून, सत्तेतील अहंकाराला मतदारांनी दिलेली स्पष्ट चपराक आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री स्वतः पंकज भोयर असतानाही भाजपला वर्धा नगरपालिका ताब्यात घेता न येणे, हे अपयश नाही तर नेतृत्वाच्या चुकलेल्या निर्णयांचे जिवंत उदाहरण ठरले आहे. निवडणुकीपूर्वी ‘२० प्लस’चा दणका देणाऱ्या भाजपची गाडी प्रत्यक्षात २५ नगरसेवकांवरच येऊन अडकली, आणि नगराध्यक्षपद मात्र विरोधकांच्या हाती गेले.

संघटन मजबूत, पण नेतृत्व चुकले, निकाल स्पष्ट सांगतो, वर्ध्यात भाजपची संघटनात्मक ताकद कमी नाही. कार्यकर्त्यांची फौज, मतदारांचा कल आणि पक्ष अजूनही मजबूत आहेत. मात्र नगराध्यक्षपदासाठी उमेदवार ठरवताना घेतलेली हटवादी भूमिका भाजपच्या गळ्यात पडली. पालकमंत्र्यांचा स्वतःच्या निकटवर्तीयाला पुढे रेटण्याचा अट्टहास, स्थानिक नेत्यांचे मत डावलणे आणि कार्यकर्त्यांच्या भावना दुर्लक्षित करणे या सगळ्याचा एकत्रित फटका थेट निकालात उमटला.

आज वर्ध्यात सर्वत्र एकच चर्चा आहे. दुसरा उमेदवार दिला असता तर भाजपचा नगराध्यक्ष शंभर टक्के निवडून आला असता.

**‘मी’पणानेच घात केला**

या पराभवानंतर भाजपमधील अंतर्गत नाराजी उघडपणे बाहेर येऊ लागली आहे. अनेक कार्यकर्ते आता दबक्या आवाजात नव्हे, तर थेट सांगत आहेत की, पक्ष कमजोर नाही. नेतृत्वाची दिशा चुकली. पालकमंत्री आणि स्थानिक आमदारांमधील अंतर्गत राजकारणाचा फटका थेट पक्षालाच बसला. कार्यकर्त्यांची मेहनत, मतदारांचा विश्वास आणि भाजपची ताकद या सगळ्यावर ‘मी’पणाची सावली पडली आणि सत्तेचे गणित बिघडले.



**देवळीचा इशाराही दुर्लक्षित**

वर्धाच नव्हे, तर देवळी नगरपालिकेतही हाच पॅटर्न दिसून आला.

भाजपची पकड असूनही गटबाजी, अहंकार आणि हट्टाच्या राजकारणामुळे सत्ता निसटली. दुखावलेल्या कार्यकर्त्यांनी थेट बंड न करता शांत भूमिका घेतली आणि निकालाने सत्ताधाऱ्यांना इशारा दिला. हा इशारा हलक्यात घेण्यासारखा नाही.

**जिल्हा परिषदेसाठी धोक्याची घंटा**

हा प्रश्न आता केवळ वर्धा नगरपालिकेपुरता मर्यादित राहिलेला नाही. येत्या जिल्हा परिषद निवडणुकीतही असेच निर्णय झाले, तर भाजपला आणखी मोठा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच आता पक्षात कुजबुज नाही, तर उघड चर्चा सुरू झाली आहे,

**पालकमंत्री पदावर बदल हवाच!**

मतदार पक्ष पाहतो, अहंकार नाही. वर्ध्याच्या निकालाने एक गोष्ट ठळकपणे समोर आली आहे. मतदार पक्षाशी निष्ठावान असतो, पण अहंकाराला माफी देत नाही. सत्तेतील ‘मी’पणा किती महागात पडू शकतो, याचे हे ताजे उदाहरण आहे.

आता हा इशारा पंकज भोयर गांभीर्याने घेतात की पुन्हा त्याच मार्गावर चालतात, यावरच त्यांचे आणि भाजपचे वर्ध्यातील भविष्यातील राजकारण ठरणार आहे.

## अवैध दारूविक्री व क्रिकेट बुकींचा सुळसुळाट

**सेलू :** शहरासह लगतच्या ग्रामीण भागात अवैध दारूविक्रीला उधाण आले असून क्रिकेट सट्टा व बुकींचाही मोठ्या प्रमाणात सुळसुळाट झाल्याची चर्चा नागरिकांत आहे. या अवैध व्यवसायांमुळे सामाजिक शांतता धोक्यात येत असल्याची भावना व्यक्त होत आहे.काही ठिकाणी हॉटेल व रिसॉर्टच्या आड दारूविक्री सुरू असून तर काहींनी आजारपण, औषध दुकानांचा आधार घेत बेकायदेशीर व्यवसाय सुरू केल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे पोलिसांकडून ठोस कारवाई होत नसल्याने अवैध व्यावसायिकांचे फावल्याचे चित्र आहे.

क्रिकेट सामन्यांच्या पार्श्वभूमीवर बुकी सक्रिय झाले असून युवक मोठ्या प्रमाणात या जाळ्यात अडकत आहेत.

पोलिसांनी तात्काळ लक्ष देत धाडसत्र सुरू करावे, अशी जोरदार मागणी आता नागरिकांतून केली जात आहे.

## कोटंबा येथे ग्रामस्वच्छता अभियानातून गाडगेबाबांना अभिवादन

**सेलू / जनमाध्यम**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कोटंबा येथे ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या संयुक्त पुढाकारातून ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. थोर समाजसुधारक संत गाडगेबाबांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्वच्छता व सामाजिक परिवर्तनाच्या विचारांना अभिवादन करत या अभियानातून गावात स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमाअंतर्गत गावातील मुख्य रस्त्यांची साफसफाई करण्यात आली. ठिकठिकाणी साचलेला प्लास्टिक कचरा संकलित करून त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यात आली. स्वच्छतेबाबत जनजागृती करत स्वच्छ व सुंदर गाव घडविण्याचा संकल्प ग्रामस्थांनी यावेळी केला.

कोटंबा गावात दर आठवड्याला नियमितपणे स्वच्छता मोहीम राबविली जाते.



त्याच मोहिमेचा एक भाग म्हणून हे विशेष अभियान यशस्वीपणे पार पडले. माजी सरपंच रेणुका कोटंबकार व ग्रामसेवक भगवान कंठाळे यांच्या मार्गदर्शनाखाली बचत गटातील महिलांनी तसेच ग्रामस्थांनी या स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्वच्छता अभियानात अर्चना चांभारे, सुनीता भांदक्कर, स्वाती कोटंबकार, नीना उईके, लक्ष्मी देशमुख, अर्चना देशमुख, निर्मला तुमडाम, दर्शना भांदक्कर, सविता सरोकार, पंचकुला उरकुडे, कुमुद सावरकर, सूरज भोंगाडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ सहभागी झाले होते.

या उपक्रमातून सर्वांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. गाव, घर, शाळा व सार्वजनिक परिसर नेहमी स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा निर्धार यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## वर्धेत ‘बुद्ध चरित्र भगवंत कथेचा अमृतवर्षाव’

### धम्म, करुणा आणि ज्ञानाचा तीनदिवसीय महोत्सव

**वर्धा / जनमाध्यम**

तथागत भगवान बुद्धांचे करुणामय जीवन, धम्मदृष्टी आणि लोककल्याणकारी शिकवण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी वर्धा शहरात ‘बुद्ध चरित्र भगवंत कथेचा अमृतवर्षाव’ या भव्य आणि पवित्र धम्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा तीन दिवसांचा धम्माने ओथंबलेला कार्यक्रम २६, २७ व २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भगवान बुद्ध चौक (दत्तपूर चौक), कुमार अप्पा कॉम्प्लेक्स, वर्धा येथे होणार आहे.

या दिव्य धम्मकार्यक्रमात प्रसिद्ध बुद्धचरित्र कथाकार, महापंडित सद्धर्माचार्य तसेच परमपूज्य भिक्षू प्रियदर्शी थेरो यांच्या अमृतवाणीमधून तथागत गौतम बुद्धांचे जीवनचरित्र, धम्मशिक्षण, संघपरंपरा आणि निर्वाणाचा मार्ग उलगडला जाणार आहे. त्यांच्या प्रवचनांतून करुणा (करुणा), मैत्री (मेत्ता), प्रज्ञा (पञ्ञा) आणि शील



(नैतिकता) यांचा सखोल अर्थ उलगडत श्रोत्यांना आध्यात्मिक शांती व नैतिक बळ प्राप्त होणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लामा खेन्पो कर्मा गेंडुन यांची विनम्र उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या आशीर्वचनांनी व मार्गदर्शनाने या धम्मोत्सवाला आंतरराष्ट्रीय बौद्ध परंपरेची प्रतिष्ठा लाभणार असून धम्म, विनय आणि बोधिचित्त या मूल्यांना अधिक दृढता मिळणार आहे.

हा भव्य कार्यक्रम अष्टमंगलम फाउंडेशन, वर्धा (महाराष्ट्र) यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. तीन दिवस चालणाऱ्या या धम्ममहोत्सवात चार आर्य सत्ये, अष्टांगिक मार्ग, धम्मचक्र प्रवर्तन, संघाचे महत्त्व, अहिंसा, समता, करुणा आणि निर्वाण यांसारख्या बौद्ध तत्त्वज्ञानाच्या मूलभूत संकल्पनांवर सविस्तर प्रकाश टाकण्यात येणार आहे. हा कार्यक्रम केवळ धार्मिक विधी नसून मानवतेच्या कल्याणा साठीची एक सार्वजनिक धम्मयात्रा असल्याचे आयोज कांनी स्पष्ट केले आहे.

अष्टमंगलम फाउंडेशनतर्फे सर्व बुद्ध उपासक, सर्व धर्मीय नागरिक, धम्मप्रेमी, युवक, विद्यार्थी आणि शांती साधकांना या ‘धम्मामृत वर्षावा’त सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कोरा येथील जि. प. शाळेच्या प्रवेशद्वारावर सांडपाण्याचे डबके

### चिखलातूनच शाळेत प्रवेश; ५१ चिमुकल्यांच्या आरोग्यावर संकट, ग्रामपंचायत-प्रशासनाच्या दुर्लक्षावर संताप

**समुद्रपूर / जनमाध्यम**

शिक्षणाच्या मंदिरात जाणाऱ्या चिमुकल्यांना जर पहिल्याच पावलावर घाणीचा सामना करावा लागत असेल, तर गावातील विकासाची दिशा कोणती, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर विहिरीचे सांडपाणी वाहून येत असून तेथे मोठे डबके साचले आहे. परिणामी विद्यार्थ्यांना चिखलातून पाय भिजवतच शाळेत प्रवेश करावा लागत आहे.

ही शाळा समुद्रपूर पंचायत समिती अंतर्गत केंद्र शाळा असून येथे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत मराठी माध्यमातून शिक्षण दिले जाते. चार वर्गांमध्ये एकूण ५१ विद्यार्थी शिक्षण घेत असून याच प्रवेशद्वारातून अंगणवाडीतील लहान मुलेही ये-जा करतात. मात्र सांडपाणी, चिखल आणि दुर्गंधीमुळे लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शाळेच्या गेटवरच साचलेल्या सांडपाण्यामुळे शिक्षक, कर्मचारी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांनाही दररोज ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सांडपाण्यातील जंतुसंसर्ग मुलांच्या अंगावर बसून सर्दी, ताप, त्वचारोगांसह विविध साथीचे आजार पसरण्याची शक्यता पालकांकडून व्यक्त केली जात आहे. दिवसभर ओलसर पायांनी वर्गात बसावे लागल्याने मुलांचे लक्ष अभ्यासाकडे लागत नसल्याचेही सांगण्यात येत आहे.

‘शितावरून भाताची परीक्षा’ या म्हणीप्रमाणे, ज्ञानमंदिराच्या प्रवेशद्वारावरच अशी अवस्था असेल, तर गावातील मुख्य रस्त्यांची परिस्थिती किती गंभीर असेल, याची कल्पना न केलेलीच बरी, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांतून उमटत आहे. ग्रामपंचायत गावाच्या विकासाकडे किती लक्ष देते, हे गावात पाऊल टाकताच स्पष्ट होत असल्याचा आरोपही नागरिक करत आहेत.

या पार्श्वभूमीवर सरपंच, ग्रामविकास अधिकारी तसेच शाळा व्यवस्थापन समितीने तातडीने लक्ष घालून शाळेच्या प्रवेशद्वारावरील सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, किमान विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व स्वच्छ प्रवेशमार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी शाळेतील कर्मचारी, पालकवर्ग व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## हिवाळ्यातील असमान हवामानाचा फटका; सर्दी-खोकल्याच्या रुग्णांत लक्षणीय वाढ

### दिवसा कडक ऊन, सकाळ-संध्याकाळ गारवा; दवाखान्यांत रुग्णांची गर्दी

**साहूर / जनमाध्यम**

ऑक्टोबरपासून हिवाळ्याची चाहूल लागताच परिसरात तापमानातील मोठी चढउतार जाणवू लागली आहे. सकाळ-संध्याकाळी गारवा आणि दुपारी कडक ऊन, यामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडत असून सर्दी-खोकला, ताप, घसा दुखणे, श्वसनाचे विकार यांचे रुग्ण वाढले आहेत. अनेक घरांमध्ये एकापाठोपाठ एक व्यक्तींना लागण होत असल्याने दवाखान्यांत रुग्णांची गर्दी वाढली आहे.

हिवाळ्यातील ऋतुबदलाच्या टप्प्यात संसर्गजन्य आजार डोके वर काढतात. त्यातच दिवाळी काळातील फटाक्यांची आतषबाजी, धूळ आणि प्रदूषण यामुळे हवेत घातक कण वाढतात. परिणामी श्वसनविकार, सतत खोकला, नाक गळणे, घसा दुखी यांसारख्या तक्रारी वाढत असल्याचे डॉक्टर सांगतात. काही रुग्णांना ताप उतरूनही खोकला व घसा दुखी दीर्घकाळ टिकून राहते, तर काहींना १० ते १५ दिवसांहून अधिक काळ सर्दी-खोकल्याचा त्रास होत आहे.



या दिवसांत अपचन, अंगदुखी, डोकेदुखी आणि हातपाय दुखण्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत. संसर्गजन्य स्वरूप असल्याने घरातील एका सदस्याला झाल्यास इतरांनाही लागण होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिक या बदलत्या वातावरणामुळे अधिक त्रस्त होत असल्याचे दिसून येत आहे.

डॉक्टरांच्या मते, सकाळ-संध्याकाळ थंड आणि दुपारी उष्ण असे वातावरण ताप, सर्दी-खोकला व पचनविकारांसाठी पोषक ठरते. त्यामुळे आजारी व्यक्तीचा सहवास टाळावा, लहान मुलांना थंड वातावरणात बाहेर नेऊ नये, आजाराची लक्षणे दिसताच त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच गरम कपडे वापरणे, गरम पाणी पिणे, स्वच्छता राखणे आणि गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले.

दरवर्षी साहूर परिसरात कडाक्याची थंडी जाणवते. यंदाही थंडीचा जोर वाढत असून पिकांवर दव (शीतलहर) पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. एकूणच हिवाळ्यातील वातावरण बदलामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून सर्दी-खोकल्याच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत असल्याने काळजी घेणे अत्यावश्यक ठरत आहे.

# संक्षिप्त

## मालक व नोकराला बेदम मारहाण

**वर्धा :** जेवणाचे पैसे मागितल्याचा राग धरून सात जणांनी हॉटेल मालक व त्याच्या नोकराला काठी व स्टील रॉडने मारहाण केल्याची गंभीर घटना घडली. या घटनेमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.राहुल संजय जयस्वाल यांच्या हॉटेलमध्ये सेवाग्राम येथील सात जण जेवणासाठी आले होते. जेवण आटोपल्यानंतर पैसे मागितल्यावर आरोपींनी वाद घालत शिवीगाळ सुरू केली. राहुल जयस्वाल यांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी गाडीत ठेवलेल्या काठी व स्टील पाइपने राहुल जयस्वाल व त्यांच्या नोकराला बेदम मारहाण केली.घटनेनंतर जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सावंगी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सातही आरोपींना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

## पुलफैल येथे डोक्याला गंभीर दुखापत; तरुणाचा मृत्यू

**वर्धा :** पुलफैल परिसरात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.अखिल जन्मदेव म्हस्के (वय २८, रा. सायगव्हाण) हा पुलफैल परिसरात भाड्याच्या खोलीत राहत होता. शुक्रवारी तो सिमेंट रस्त्यावर पडलेला अवस्थेत आढळून आला. डोक्याला गंभीर मार लागून रक्तस्राव होत असल्याचे दिसून आले. तो मृतावस्थेत असल्याचे निष्पन्न झाले.इंधन घेण्यासाठी जात असताना तोल जाऊन पडल्याने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

## पिपरी (मेघे) व येळाकेळी परिसरात बिबट्याचा मुक्तसंचार

**वर्धा :** पिपरी (मेघे) व येळाकेळी परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. काही नागरिकांना प्रत्यक्ष बिबट्याचे दर्शन झाल्याने भीती अधिकच वाढली आहे.सध्या कडाक्याच्या थंडीमुळे शेतकरी रब्बी पिकांच्या रखवालीसाठी रात्री शेतात जात आहेत. अशा परिस्थितीत बिबट्याचा मुक्तसंचार सुरू असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वनविभागाने तात्काळ पिंजरे लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## सिरसगाव येथे जुगार अड्ड्यावर धाड; सहा जण अटकेत

**वडनेर :** वडनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सिरसगाव येथे सुरू असलेल्या तासपत्ते जुगारावर पोलिसांनी धाड टाकून सहा जणांना रंगेहात पकडले. या कारवाईमुळे परिसरात चर्चेला उधाण आले आहे.मंदिराच्या मागील बाजूस हार-जीतचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी अचानक धाड टाकली. यावेळी सहा आरोपी जुगार खेळताना आढळून आले. त्यांच्याकडून १३०० रुपये रोख रक्कम व तासपत्ते जप्त करण्यात आले.

या प्रकरणी मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. जिल्ह्यात वाढलेल्या जुगार व अवैध धंद्यांवर पोलिसांची कारवाई सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## दुचाकी घसरून पडल्याने तरुणाचा मृत्यू

**वर्धा :** दुचाकी घसरून गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना नागठाणा शिवारात घडली. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

संकेत मनोहर काकडे (वय १९, रा. बावापूर, ता. समुद्रपूर) हा जेवण करून परत येत असताना दुचाकी घसरून पडला. अपघातात तो गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.सावंगी पोलिसांनी या प्रकरणी नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

## रेल्वेच्या धडकेत अज्ञात इसमाचा मृत्यू

**वर्धा :** रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक दोन जवळ रेल्वेच्या धडकेत अज्ञात इसमाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.रेल्वे पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, फलाट क्रमांक दोनजवळ अंदाजे ३८ वर्षीय इसम जखमी अवस्थेत आढळून आला. तपासणीअंती तो मृत असल्याचे निष्पन्न झाले. मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या शवगृहात ओळख पटविण्यासाठी ठेवण्यात आला आहे.मृतकाची उंची सुमारे पाच फूट दोन इंच असून अंगात सिमेंट रंगाचा पँट व चौकडी शर्ट होता. याबाबत माहिती असल्यास रेल्वे पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ३१ हजारांचा सोन्याचा ऐवज लंपास

**आर्वी** : शहरातील आंबेडकर वॉर्ड परिसरात घर कुलूपबंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी ३१ हजार १६० रुपयांचा सोन्याचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.आंबेडकर वॉर्ड येथील रहिवासी कोमल भुरे या सकाळच्या सुमारास घराला कुलूप लावून शेतात गेल्या होत्या. सायंकाळी शेतातून परतल्यानंतर घराजवळ आल्यानंतर त्यांना दरवाज्याची जाळी काढलेली दिसून आली.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## २५ डिसेंबरला 'वारकरी'नाटकाचे सादरीकरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्त महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेत सर्वाधिक ९ पुरस्कार प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावणारे ' वारकरी ' हे नाटक गुरुवार दि.२५ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सादर करण्यात येणार आहे. श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय आणि अंबापेठ क्लब यांनी राज्य नाट्य स्पर्धेत हे नाटक प्रस्तुत केले असून डॉ. चंद्रकांत शिंदे यांनी या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन केले आहे .देश आणि देव भक्तीचे नाट्यमय सादरीकरण या नाटकातून केले गेले आहे.श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सतत पाच चॅम्पियन ट्रॉफी जिंकल्या असून महाविद्यालयातील प्राध्यापकांनी वारकरी नाटकात विविध भूमिका केल्या आहेत.दि.२५ डिसेंबरला दुपारी ४ वाजता आयोजित ह्या नाटकाचा प्रवेश सर्वांसाठी खुला असून रसिकांनी या नाटकाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. वि. गो. ठाकरे यांनी केले आहे.


## जाहीर सुचना

सर्व सामान्य लोकांना या व्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **गणेश शंकरराव सिरसुध्दे व ज्योती गणेशराव सिरसुध्दे** यांच्या वतीने सुचित करण्यात येते की, माझ्या पक्षकार यांनी खालील मिळकत खरेदीखत दि.१३/०७/२०२३,र.द.क्र.-२७३६ व्दारे रुपसिंग दुर्गासिंग भिसे (मय्यत) यांचे वारस रविंद्र रुपसिंग भिसे, सुमन रुपसिंग भिसे, सरिता सुमंत देशमुख, सुनिता सुभाष चौव्हाण, अनिता पुंडलिकराव देशमुख कडून विकत घेतली आहे.

वरील वारसांनी कोणत्याही सक्षम अधिकारी यांचे वारस प्रमाणपत्र घेतले नसून सदरचा विक्री व्यवहार केला आहे. सदरच्या विक्री व्यवहाराला इतर कोणाचे आक्षेप असल्यास त्यांनी <u>७</u> दिवसाच्या आत खालील पत्यांवर संपर्क करावा व आपली हरकत लिखित स्वरुपात सर्व कागदपत्रासह प्रत्यक्ष भेटावे.

माझे पक्षकार सदर मिळकत **IDFC** बॅंकेत गहाण ठेऊन कर्ज घेत आहे. वरील मुदतीत जर कोणाचे आक्षेप न आल्यास सदरचा विक्री व्यवहार हा सर्वांना मान्य आहे असे समजुन पुढील प्रक्रियेसाठी कागदपत्र बॅंकेत देण्यात येतील व त्यानंतर कोणतेही आक्षेप ग्राहय धरले जाणार नाही.

**मिळकतीचे वर्णन**

सदरची मिळकत मौजे-राजापेठ, प्रगणे-बडनेरा, नोंदणी पोट तुकडी अमरावती व महानगरपालिका अमरावतीच्या हददीत येत असून शेत सर्वे क्र.१४ (संगणीकृत **7/12** प्रमाणे **14/1/A**) ज्याचा अकृषक क्र.**NAA-48**/राजापेठ-**221/1979-1980** यामध्ये प्लॉट क्र.१३४, एकुण क्षेत्रफळ १२०० चौ.फुट, या पैकी उत्तर दक्षिण वाटणीचा पुर्वेकडील भाग एकुण क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी. व त्या वरील राहते घर याची चर्तुःसिमा :-

पुर्वेस - प्लॉट क्र.१३३ पश्श्चिमेस - रंगे यांची उर्वरित जागा

उत्तरेस- रोड दक्षिणेस- सर्विस लाईन

**संपर्क**
**ॲड. वैभव न. काकिर्डे,**
१९,हरिओम कॉलनी, संताजी नगर,
शंकर नगर मागे, अमरावती- ४४४६०६
**मो.- ९६७३८२१००१**



### जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना

**प्रति,**
निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय** - **जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव** - मोहम्मद शाकीर शेख इसराईल, रा.घाटलाडकी
मोबाईल नंबर - ९९७५१४३५६१

मा.महोदय,

वरील विषयान्वचये सविनय अर्ज सादर करतो/करते की, माझा नामे **नांव स्वतः मोहम्मद शाकीर शेख इसराईल** यांचा जन्म ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यक्षेत्रातील **घाटलाडकी** या गावी दिनांक **३०.०८.१९७५** रोजी झालेला आहे.

सदरील जन्म घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील जन्म विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर जोडलेले आहेत. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चुकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करीता मला जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

शिक्का

अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
(मोहम्मद शाकीर)



### नगर परिषद कार्यालय, घाटंजी, जि.यवतमाळ

**निविदा सूचना**

घाटंजी नगर परिषद मध्ये बांधकाम विभागा अंतर्गत १) केंद्र पुरस्कृत अमृत २.० महाअभियान अंतर्गत घाटंजी पाणी पुरवठा योजनेचे कामाकरीता पाटबंधारे विभाग हद्दीतील कटाई केलेल्या झाडांपासून उत्पादित सागवान मालाच्या लिलावाकरीता दरपत्रक मागविणे, २) घाटंजी नगर परिषद प्रशासकीय ईमारत मध्ये मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती कक्षाकरीता फर्निचर, विद्युत व ईतर व्यवस्था करण्याकरीता दर पुरविण्याबाबत या कामाकरीता सीलबंद टक्केवारी बी-१ प्रपत्रात निविदा सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या करुन दिनांक २४.१२.२०२५ ते ०२.०१.२०२६ ला दुपारी ३.०० पर्यंत निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना तसेच अटी व शर्ती कार्यालयामध्ये पहावयास उपलब्ध आहे. निविदा प्रपत्र शुल्क रु.५००/- व रु.१०००/- अनामत रक्कम रोखपाल नगर परिषद घाटंजी यांच्याकडे नगदीने भरणा करावे. निविदा दिनांक ०२.०१.२०२६ ला दुपारी ५.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

**(श्री.राजू म.घोडके)**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, घाटंजी**



### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २३.१२.२०२५

आज दि............. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मो.जाकीर अ.सलाम** अर्जात नमूद जन्म दिनांक **२.१०.१९६८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/ नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.प्र.क) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**



### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.१०.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल रफिक अब्दुल रज्जाक** अर्जात नमूद जन्म दिनांक **२७.०१.१९५४** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** व माहिती नसणे हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/ नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**



### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७१३/२०२५
**श्रीमती उज्वला अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०७.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Ujwala Sanjay Thakur Age 60 Yrs. Occu.: Housewife R/o Infront of Cancer Hospital, Shankar Nagar, Amravati.
3. Suyash Sanjay Thakur, Age 34 Yrs. Occu.: Service R/o Near Hanuman Mandir, Shankar Nagar, Rukhmini Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.
3. Aieshwarya Vikram Pawar, Age 31 Yrs. Occu.: Household R/o Infront of Cancer Hospital, Shankar Nagar, Rajapeth Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **संजय दिनकरराव ठाकूर** हे दिनांक 24.08.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **उज्वला + 02 विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **उज्वला + 02 विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given, on behalf of my client **Ganesh Shankarrao Sirsudhe and Jyoti Ganeshrao Sirsudhe,** pertaining to the immovable property /s (more particularly described in the under the noted Schedule) possessedy by me client as under.

My client Owned and possessed the said property by virtue of Registered Sale Deed dated 13.07.2023, Registered at the office of Sub Registrar Amravati at Sr. No. 2736-2023 form Legal Heirs of Rupsing Durgassing Bhise namely Ravindra Rupsing Bhise, Suman Rupsing Bhise, Sarita Sumant Deshmukh, Sunita Subhash Chavhan and Anita Pundlikrao Deshmukh for which no legal heir Certificate has been taken from competent authority.

My Client is intended to avail loan from IDFC Bank for financial assistance and hereby calling objection if any from the the persons having any interest/ claim/share in the property or any intimation of any legal proceedings initiated for their claim in the property should file their claim/ objection to below mentioned address in writing and along with all relevant documents within the period of <u>**7 days**</u> from the date of publication.

That in absence of any claim/objection my client proceed with his process availing loan from said bank and after expiry of said period no claim will be entertain.

**Schedule of Property**

That the property situated within the local limits of Municipal Corporation Amravati and within the jurisdiction of Sub Registrar Amravati, bearing Field Survey No. 14 (As per Village Form 7/12 F.S.No. 14/1A), Covered /Regularised into Non Agricultural Land Vide Revenue Case No. NAA-48/Rajapeth-221/ 1979-1980, therein Plot No. 134, total admeasuring 1200 Sq.Ft., Out of said Plot Eastern Portion of North South Division, admeasuring 55.76 Sq.Mtrs., thereon Residential House, at Mouje- Rajapeth, Pragane-Badnera, Tah. and Dist. Amravati. That the said Plot is bounded as under :-

Towards East - Plot No. 133
Towards West - House of Range on remaining Portion
Towards North - Road
Towards South - Service Line

**Contact:-**
**VAIBHAV N. KAKIRDE, ADVOCATE**
**Add.- 19, Hariom Colony, Santaji Nagar, Amravati, PIN - 444606**
**Mob. No. - 9673821001**



## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०



### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २३.१२.२०२५

आज दि............. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शेख हारुन शेख मुनीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **१३.०९.१९६५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/ नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**



### मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

किरकोळ (आर.एम.जे.सी.)क्र.३२९/२०२५ ने.ता.२७.०१.२०२६

**अर्जदार :** १. माला सुनिल चावके
२. श्रेयश सुनिल चावके
दोघेही रा.वेणी गणेशपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**निरंक**

ज्याअर्थी **मयत सुनिल गणपतराव चावके** यांचा मृत्यू दिनांक **२३.०३.२००८ रोजी वेणी गणेशपूर**,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे तर अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. अर्जदार हे मयत यांचे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा.दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१७ डिसेंबर २०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर



### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - २९०६/२०२५
जमुना विरुध्द निरंक
पुढील तारीख ११.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Jamuna Kaushal Tiwari** Age 74 yrs., Occu.- Household
2. **Mr. Anil Kaushal Tiwari** Age 46 yrs., Occu.- Labour
3. **Mr. Sunil Kaushal Tiwari** Age 45 yrs., Occu.- Labourer
All R/o. Near Durga Mata Mandir, Shobha Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत रामबली उर्फ रामगरीब भोलाराम तिवारी व कौशल रामबली उर्फ रामगरीब तिवारी हे अनुक्रमे दि.०१.१२.२०१० व २८.०२.२०२४** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार जमुना व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार जमुना व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १९.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती



### मा.सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.: ३२९/२०२५ ने.ता.२७.०१.२०२६

**अर्जदार :** **१. माला सुनिल चावके**
**२. श्रेयस सुनील चावके**
**क्र. १ व २ रा. वेणी गणेशपुर,**
**ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

**// वि //**

**निरंक**

ज्याअर्थी **मयत सुनील गणपतराव चावके यांचा मृत्यू दि.२३.०३.२००८ रोजी वेणी गणेशपुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. **मयतांचे अर्जदार क्र.१ ही पत्नी आहे अर्जदार क्र.२ हा मुलगा आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज **दिनांक १७ डिसेंबर २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**



### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २३.१२.२०२५

आज दि............. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल रहेमान अब्दुल सलाम** अर्जात नमूद जन्म दिनांक **०४.०५.१९७६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/ नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.प्र.क) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**



### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५६७/२०२५
**सुभद्रा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०१.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Subhadra Shalikrao Pache, Age 73 Yrs. Occu.: Household
2. Shital Sandip Pache, Age 34 Yrs. Occu.: Household
3. Vedansh Sandip Pache, (Through his Natural Guardian Mother Smt.Shital Sandip Pache)] Age 05 Yrs. Occu.: Student All R/o Bombay Fail, Behind Khatri Complex, Amravati
4. Shivam Sandip Pache, Age 02, Occu.: Nil Through his natural guardian mother Smt.Shital Sandip Pache All R/o Bombay Fail, Behind Khatri Complex, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **संदीप शालिकराम पाचे** हे दिनांक 13.09.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुभद्रा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुभद्रा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५.११.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



### जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जाचा नमुना

दि.

**प्रति,**
**निबंधक जन्म/मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत - घाटलाडकी**
**ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

**विषय : - जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव :- मोहम्मद तौफिक मोहम्मद शाकीर**
**राहणार :- घाटलाडकी**
**मो.- ८७६६८८४६७१**

**मा.महोदय,**

वरील विषयान्वये सविनय अर्ज सादर करतो की माझे स्वतःचे नाव **मोहम्मद तौफिक मोहम्मद शाकीर** यांचा **जन्म** ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यक्षेत्रातील **घाटलाडकी** या गावी दिनांक **१२/१२/२००७** रोजी झालेला आहे.

सदरील **जन्म**/मृत्यू घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही.सदरील **जन्म**/मृत्यू विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला **<u>जन्म</u> नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची** आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सदर जोडलेले आहे. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चूकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशिर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करिता मला **जन्म** नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

**<u>अर्जदाराची स्वाक्षरी</u>/ अंगठयाचा ठसा - सही/-**



## सायटेशन/जाहीरनामा

### विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी

आर.एम.जे.सी.क्र.७९८/२५ ने.ता.२८.०१.२०२६

**<u>अर्जदार</u> -**
**१.श्रीमती सुशिल उत्तमराव महल्ले,** वय ७५ वर्षे, धंदा -घरकाम
**२.सतिश उत्तमराव महल्ले,** वय ५४ वर्षे, धंदा - शेती
**३.हरिभाऊ उत्तमराव महल्ले,** वय ४७ वर्षे, धंदा - शेती
**४.नरेंद्र उत्तमराव महल्ले,** वय ४४ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.माळीपुरा, हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
**५.सौ.भारती गणेशराव तसरे,** वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.भिस्नुर, ता.आष्टी, जि.वर्धा

-- **विरुध्द** --

**निल**

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ हिचे पती, तर अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडिल नामे **उत्तमराव किसनराव महल्ले यांचा दिनांक ०१/१२/२०१४ रोजी हिवरखेड, ता.मोर्शी,जि.अमरावती येथे मृत्यू झाला.** अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- २२/१२/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय क.स्तर, मोर्शी



### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २३.१२.२०२५

आज दि............. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **म.जहीर अ. सलाम** अर्जात नमूद जन्म दिनांक **०५.०४.१९६६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/ नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.प्र.क) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**



### जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना

**प्रति,**
निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय** - **जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव** - मोहम्मद तौसिफ मोहम्मद शाकीर, रा.घाटलाडकी
मोबाईल नंबर - ८७६६८८४६७१

मा.महोदय,

वरील विषयान्वचये सविनय अर्ज सादर करतो/करते की, माझ्या मुलाचा नामे **नांव स्वतः मोहम्मद तौसिफ मोहम्मद शाकीर** यांचा जन्म ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यक्षेत्रातील **घाटलाडकी** या गावी दिनांक **३१.०५.२००६** रोजी झालेला आहे.

सदरील जन्म घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील जन्म विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर जोडलेले आहेत. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चुकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करीता मला जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

शिक्का

अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
(मोहम्मद तौसिफ)



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १०६**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मीरा इंडस्ट्री मध्ये आगीचा तांडव १५ ते १७ करोड रुपयाचे नुकसान

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

चांदूररेल्वे तिवसा रोडवर शहराच्या ३ ते ४ किलोमीटर अंतरावर चांदूरवाडी ग्राम पंचायत नाग मंदिर जवळ असलेल्या मिरा इंडस्ट्रीज मध्ये आगीचा तांडव सर्व्हे नंबर ११७/३ मध्ये चना प्रोसेस करून चनाडाळ बनविणाऱ्या मीरा इंडस्ट्रीमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागून अंदाजे १५ ते १७ करोड रुपयांचे नुकसान झाले.



सोमवार रात्री दहापर्यंत मिलमध्ये चणाडाळ प्रोसेसिंग सुरू होती. त्यानंतर मिल मध्ये कामाला असलेले मजूर व मालक हे मिल बंद करून घरी गेले तर काही मजदूर मिलमध्ये असलेल्या कॉटरमध्ये घरात जाऊन झोपले. थंडीचे दिवस असल्यामुळे ही आग केव्हा लागली हे कोणालाच कळले नाही.परंतु मंगळवार सकाळी मिलमधून मालक पियुष गंगन यांना फोन आला व मिलमधून धुर निघत असल्याचे वृत्त कळले.त्यावरून पत्रकार गुड्डू शर्मा यांनी स्थानिक अग्निशामक दल नगरपरिषद विभाग फोन लावून अग्निशामक दल ची गाडी बोलावली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस स्टेशन निरीक्षक अजय आकरे व पोलिस दल घटना स्थळी दाखल होऊन परीस्थिती सांभाळली. महसूल विभाग मंडळ अधिकारी निलेश स्थूल व इतर सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तर गावातील सहकारी बच्चू वानरे,पप्पू भालेराव,नंदा वाधवानी,बंडू भूते,राजेश मुंदडा,बडू मुंदडा, हर्षल वाघ,पप्पू सोळंके,डॉ निलेश विश्वकर्मा, बंडू आठवले,राजेश शिवणकर व व्यापारी राजू जालान तसेच गावातील समाजसेवक यांनी आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केला.चना दाल प्रोसेसिंग मिल मीरा इंडस्ट्री मध्ये लागलेल्या आगीकरिता चांदुर रेल्वे धामणगाव नांदगाव खंडेश्वर तिवसा अमरावती येथून अग्निशामक गाड्या बोलविण्यात आला.या गाड्यांनी चांदुर रेल्वे पंपा मधून अंदाजे ३० ते ३५ फेऱ्या मारत आगीवर नियंत्रण आणण्याचा कसोटीने प्रयत्न केले.

**आगीमध्ये १५ ते १७ करोड रुपयाचे नुकसान** -मीरा इंडस्ट्रीमध्ये दैनिक ७० टन चण्यावर प्रोसेस करून चणाडाळ बनविले जाते. दोन अडीच एकर मध्ये असलेल्या ह्या इंडस्ट्री मध्ये तीन फ्लोअर असल्याचे कळते.तिन्ही फ्लोअरवर व खाली चना तसेच प्रोसेसिंग केलेला चणाडाळ असल्याचे समजते. हे आगीचे रुद्र रूप व तांडव पाहता अंदाजे १५ ते १७ करोड रुपयाचे नुकसान असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविल्या जात आहे.

**मीरा इंडस्ट्रीमध्यो शॉर्टसर्किटमुळे लागली आग** - चांदूररेल्वे तिवसा रोडवर असलेल्या मिरा इंडस्ट्रीज मध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचे समजते. धामनगांव नगराध्यक्षा अर्चना रोठे यांची भेट मिरा इंडस्ट्रीज संचालक किशोर गंगन व पियुष गंगन यांच्या चना दाल प्रोसेसिंग मिलला लागलेल्या घटना स्थळी धामणगाव नगराध्यक्ष अर्चना रोठे यांनी सोबत शैलेंद्र मेटे,स्वाती मेटे,अर्पणा जगताप,सविता ठाकरे व भाजपा कार्यकर्ते यांनी भेट देऊन किशोर गंगन यांची भेट घेतली.



## गॅस गळती रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे मॉकड्रिल ; रंगीत तालीम

**अमरावती/का.प्र.**

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनामार्फत आज लोणी येथील अदानी टोटल गॅस सीएनजी (भागवत पंप) केंद्रावर सुरक्षा लेव्हल-३ मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही रंगीत तालीम पार पडली.



या मॉकड्रिलमध्ये गॅस गळतीसारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास घ्यावयाची खबरदारी, सायरन वाजवून धोक्याची सूचना देणे, प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब करणे आणि बाधितांना त्वरित प्रथमोपचार देऊन सुरक्षितस्थळी हलवणे या बाबींचे प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले. अदानी टोटल गॅसच्या तांत्रिक पथकाने या वेळी आपत्कालीन नियोजनाचे बारकावे समजावून सांगितले. या मोहिमेत महसूल विभाग, नांदगाव खंडेश्वरचे तहसीलदार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी आणि जिल्हा शोध व बचाव पथकाचे जवान सहभागी झाले होते. तसेच अमरावती अग्निशमन विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालयाची रुग्णवाहिका यंत्रणा आणि लोणी पोलीस स्टेशनचे अधिकारी-कर्मचारी यांनी समन्वयाने काम केले.

या प्रसंगी आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ, अदानी गॅसचे संचालक व व्यवस्थापक, आपदा मित्र, आपदा सखी, लोणीचे सरपंच, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा उपक्रमांमुळे आपत्तीच्या काळात जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी यंत्रणांमधील समन्वय अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

## बिबामल जि.प. शाळेची दैनावस्था

### विद्यार्थ्यांचे भविष्य प्रभारी व कंत्राटी शिक्षकांच्या भरवशावर

**धारणी/वार्ताहर**

येथून २५ किमी अंतरावर असलेल्या बिबामल येथील जिल्हापरिषद शाळेची दैनावस्था झाली असून शिक्षण विभागाचे दुर्लक्ष दिसून येत आहे. बिबामल येथील शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि आरोग्य दोन्ही धोक्यात आले आहे. शाळेत नियमित शिक्षकांची नियुक्ती नसून, सध्या दोन कंत्राटी शिक्षक आणि एक प्रभारी मुख्याध्यापक यांच्या भरवशावर शाळेचा संपूर्ण कार्यभार सुरू आहे. वर्ग १ ते ७पर्यंत वर्ग असून ८०पटसंख्या आहे. नियमित शिक्षक नसल्यामुळे अध्यापनाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा खालावत असल्याची पालकांची तीव्र नाराजी आहे. शाळेतील शौचालये पूर्णपणे पडक्या अवस्थेत असून, वापरास अयोग्य झाली आहेत. त्यामुळे विशेषतः मुलींना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने ही परिस्थिती गंभीर असून, आजारांचा धोका वाढत आहे. शाळेत रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी तयार करण्यात आले असून टाके आणि पाण्याच्या पाईपलाईनचे अक्षरशः तीनतेरा वाजलेले आहे.त्यामुळे शाळेत पिण्याच्या पाण्यासाठी टाकी लावली असून नियमित व्यवस्था नाही. विद्यार्थ्यांना पाणी घरून आणावे लागते. काही दिवसापूर्वी शाळेची दुरुस्ती ग्रामपंचायतमार्फत केली असून ती अपूर्ण आहे. तात्पुरती डागडुजी झाली असून काम अपूर्ण असल्याचे दिसून आले.

नियमित शिक्षक नसताना बदली कशी झाली, या पार्श्वभूमीवर नियमित शिक्षकांची संख्या अपुरी असतानाही बदली झालेल्या शिक्षकाला कसे सोडण्यात आले? असा गंभीर सवाल पालक व ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. आधीच शिक्षकांची कमतरता असताना शिक्षण विभागाने ही बदली कोणत्या निकषांवर मंजूर केली, अशी चर्चा आहे. ग्रामस्थांनी शिक्षण विभागाकडे तातडीने नियमित शिक्षकांची नियुक्ती, शाळेतील शौचालयांची दुरुस्ती, तसेच पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

## ‘होमस्टे’ योजनेतून पर्यटकांना निवास सुविधा

**अमरावती** - जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयाव्दारे ‘होमस्टे’ योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत स्थानिक नागरिकांना त्यांच्या घरातील उपलब्ध खोल्या पर्यटकांसाठी निवासासाठी उपलब्ध करून देता येणार आहेत. जिल्ह्यातील इच्छुक घरमालकांनी शासनाने निर्धारित केलेल्या अटी व निकष पूर्ण करून होमस्टे नोंदणी करावी. नोंदणीकृत होमस्टेना पर्यटन विभागामार्फत आवश्यक मार्गदर्शन, प्रसिद्धी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे, अशी माहिती पर्यटन संचालनालयाचे विभागीय उपसंचालक विजय जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.होमस्टेमुळे पर्यटकांना स्थानिक संस्कृती, परंपरा, खाद्यसंस्कृती व जीवनशैलीचा अनुभव मिळणार असून स्थानिक नागरिकांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अमरावती विभातील हॉटेल व्यावसायीक व नागरिकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जाधव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयाचे कमलेश नंदनवार (मो. क्र. ८९७५८४८९८७) आणि उज्ज्वला काळे (मो. क्र. ८३७९०५८०६०) यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन पर्यटन संचालनालयाव्दारे करण्यात आले आहे.

### पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात

## रोपवाटिका व्यवस्थापन व उत्पादन कौशल्य विकास प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**

नव्य शैक्षणिक धोरणानुसार उच्चाशिक्षण क्षेत्र आणि अभ्यासक्रमांतर्गत मूलभूत बदल झाले असून कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. स्पर्धेच्या युगात युवकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासह त्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर करणे काळाची गरज असून त्यासाठी पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय येथे प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी उद्यानविद्या विभागांतर्गत रोपवाटिका व्यवस्थापन व शोभिवंत झाडांचे उत्पादन हा कौशल्य विकास शिक्षणक्रम राबविण्यात येत आहे.



या अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी शोभिवंत झाडांची निर्मिती, विक्री तसेच अर्थशास्त्र या बाबत कौशल्य आत्मसात करत असून भविष्यातील कुशल व्यवसायिक उद्योजक या कृषी महाविद्यालयात घडत आहेत. पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयामध्ये प्रात्यक्षिकावर आधारित व कौशल्य विकासाच्या दृष्टीने अभ्यासक्रम राबविला जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये देखील आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे.रोपवाटिका व्यवस्थापन व उत्पादन हा कौशल्य विकास अभ्यासक्रम उद्यानविद्या विभागाचे प्रा. डॉ. स्वप्नील ज्ञानेश्वर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जात असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे व उपप्राचार्य प्रा. नितेश चौधरी यांचे सहकार्य व मार्गदर्शन देखील विद्यार्थ्यांना मिळत आहे.

# सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या तयारीसाठी अमरावती मनपात आयुक्तांचा आढावा

**अमरावती/का.प्र.**

निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज अमरावती महानगरपालिकेत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. आगामी निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन प्रयत्न सुरु आहे.

या आढावा बैठकीदरम्यान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मनुष्यबळ नियोजन, सुरक्षेची व्यवस्था, वाहतूक नियोजन तसेच आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी यासह विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांनी आतापर्यंत करण्यात आलेल्या तयारीचा तपशीलवार अहवाल आयुक्तांसमोर सादर केला. २३ डिसेंबर,२०२५ पासून नामनिर्देशनपत्र देणे सुरु होणार असून त्या संदर्भातील संपूर्ण तयारीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. नामनिर्देशनपत्र २३ डिसेंबर,२०२५ ते २९ डिसेंबर,२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत तसेच ३० डिसेंबर,२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत देण्यात येणार आहे. दि.२५ डिसेंबर,२०२५ व दि.२८ डिसेंबर,२०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्राची



छाननी, निवडणूक चिन्ह, मतमोजणी तसेच अनेक महत्व पुर्ण विषयावर सुचना देण्यात आल्या.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा कणा असल्याचे नमूद करत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असे निर्देश दिले. कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा अथवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश त्यांनी दिले.तसेच मतदानाच्या दिवशी नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छता, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दल्या. निवडणूक प्राक्रियेदरम्यान विभागांमध्ये समन्वय राखून नियमित आढावा बैठका घेण्यात येतील, असेही आयुक्तांनी सांगितले.या आढावा बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रध्दा बबन उदावंत उत्तर झोन क्र.१ रामपुरी कॅम्प, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल भटकर नविन तहसिल कार्यालय मोर्शी रोड, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे मध्य झोन क्र.२ राजापेठ, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रसन्नजीत चव्हाण पुर्व झोन क्र.३ दस्तुरनगर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा वन जमाबंदी अधिकारी विवेकानंद काळकर महानगरपालिका शिक्षण विभाग अंबापेठ, निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे पश्चिम झोन क्र.५ भाजीबाजार, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी विवेक जाधव दक्षिण झोन क्र.४ बडनेरा, सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी, विविध खात्यांचे विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते. अमरावती महानगरपालिकेच्या वतीने सार्वत्रिक निवडणूक २०२५ यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्ण तयारीत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

## संक्षिप्त

### परमहंस संत श्री. काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाची तयारी

**नांदगाव पेठ** - परमहंस संत श्री. काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित भव्य महोत्सवाची तयारी



अंतिम टप्प्यात पोहोचली असून येत्या २५ डिसेंबरपासून या पवित्र महोत्सवाला थाटात प्रारंभ होणार आहे. नाफडे पेट्रोल पंपाजवळील काशिनाथ महाराज धाम येथे हा पुण्यतिथी महोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. श्री शिव महापुराण कथेचे भाविकांसाठी आयोजन करण्यात आले असून हभप श्री.शिवानंद महाराज शास्त्री कथावाचन करणार आहेत यांसह अनेक धार्मिक कार्यक्रम याठिकाणी पार पडणार आहेत. या पुण्यतिथी महोत्सवात कीर्तन, प्रवचन, अभंगगायन, भजन, हरिपाठ आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संतविचारांचा जागर केला जाणार आहे. विविध संत, कीर्तनकार व प्रवचनकारांच्या उपस्थितीमुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.परमहंस संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने नांदगाव पेठ परिसरात भक्ती, श्रद्धा व सामाजिक एकोप्याचे वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संत काशीनाथ महाराज संस्थान, गावकरी मंडळी व आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### इतवारा येथील लाकूड मार्केटमध्ये भीषण आग

**अमरावती** - येथील इतवारा बाजार परिसरातील लाकूड मार्केटमध्ये २२ डिसेंब पहाटे ४:३० च्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत फर्निचरची नऊ दुकाने जळून खाक झाली. यात लाखो रुपयांचे लाकूड व रेडी युज फर्निचरचे नुकसान झाले आहे.सोमवारी पहाटे लाकूड मार्केट परिसरातून धुराचे लोट येताना दिसले. नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता कादर फर्निचर, शेख अमान फर्निचर, बाबा फर्निचर आदी दुकानांना भीषण आग लागल्याचे निदर्शनास आले. माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. मात्र, दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात लाकूड व फर्निचर असल्याने आग काही मिनिटांतच भडकली व शेजारील दुकानांपर्यंत पसरली. आग आटोक्यात आणण्यासाठी सुमारे १२ अग्निशमन वाहनांद्वारे पाण्याचा मारा करण्यात आला.

### अटल सायकल यात्रा आज

**अमरावती :** रविराज देशमुख, मेजर राजेंद्रसिंग बघेल मित्र मंडळाच्या वतीने येत्या २४ डिसेंबर रोजी कर्मयोगी गाडगेबाबा ते संत श्री गजानन महाराज अटल यात्रेचे आयोजन अंबानगरीत केले आहे. या सायकल यात्रेची सुरुवात शहरातील सुंदरलाल चौक येथून सकाळी ९.३० वाजता होणार असून राजकमल चौक ते इर्विन चौक तेथून गाडगेबाबा समाधी मंदिर येथे पोहचल्यानंतर पूजन होईल. निर्वाणभूमी वलगाव येथे दर्शनानंतर या ठिकाणाहून गाडगेबाबांची वलगाव मार्गे खारतळेगाव, शिंगणापूर फाटा, काळा मारोती मंदिर, दर्यापूर मार्गे जात दहीहांडा येथे मुक्काम राहणार आहे. २५ डिसेंबर रोजी सकाळी दहीहांडा येथून सकाळी ७ वाजता शेगाव कडे प्रस्थान होणार आहे. शेगाव येथे पोहोचून दर्शन घेऊन स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यात सहभागी होण्यासाठी ऋषिकेश ढेपे, राजेंद्रसिंग बघेल यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## तरुणांनी गाडगेबाबांचे विचार आत्मसात करण्याची आवश्यकता -पांडुरंग नाडकर्णी

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**



छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा समाजशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्य अतिथी व्याख्यान झाले. व्याख्यानाचे प्रमुख मार्गदर्शक पांडुरंग नाडकर्णी माजी अध्यक्ष गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ गोवा शासन त्यांनी या प्रसंगी संत गाडगेबाबांचे समाजातील दुर्लक्षित वंचित,पिढीत,शोषिताबद्दलच विचारांची गरज आज ही या देशाला कशी आहे हे सांगताना सशक्त,समृद्ध, एकात्म,भारत निर्माण करायचा असेल तर संत गाडगेबाबांनी सांगितलेल्या दश:सूत्रीचा वापर इथल्या जन माणसांनी,सरकारांनी,राजकीय नेत्यांनी,सुधारकांनी,संस्थांनाकांनी अमलात आणला पाहिजे. हे स्पष्ट करत तरुणांनी नेहमीच राष्ट्रहितासाठी सैनिका सारखे जागृत व संवेदनशील असले पाहिजे असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी महाविद्यालयातील डॉ. भारत कल्याणकर यांनी संत गाडगेबाबाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत संत गाडगेबाबांचा जीवनपट त्यांनी उलगडून दाखविला या व्याख्यानाचे अध्यक्ष प्र.प्राचार्य डॉ. रविंद्र इचे यांनी सुद्धा संत गाडगेबाबांनी कीर्तनातून समाज जागृती कशा पद्धतीने केली ते सांगत संत गाडगेबाबा खऱ्या अर्थाने खऱ्या ट्याचे बादशाह कसे आहेत हे सांगत स्वच्छते कडून समृद्धीकडे लोक सेवा हीच खरी सेवा कशी आहे हे सांगत संत गाडगेबाबा लोकशिक्षण आणि लोक जागृतीचे चालते बोलते विद्यापीठ होते हे स्पष्ट केले. या व्याख्याना प्रसंगी प्रा.विपिन लिल्लारे यांनी ग. दि. माडगुडकर लिखित मन्ना डे यांनी गायलेले गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला हे गीत सादर केले.याप्रसंगी पार्वती देवी नाडकर्णी गोवा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या,व्याख्यानाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.आशिष काळे तर आभार डॉ.हरीश काळे यांनी केले, या व्याख्यानाला उपस्थितीमध्ये साने गुरुजी स्थापित आंतरभारती अमरावती अध्यक्ष, विठ्ठलराव ठाकरे, परतवाडा आंतरभारतीचे अध्यक्ष प्रभात कुमार पवित्रकार तसेच प्रवीण पवित्रकार,डॉ. प्रविण सदार,प्रा.अतुल चऱ्हाटे, दिनेश वाटाणे,संजय सोळंके, अविनाश कडू, रासेयो स्वयंसेवक, समाजशास्त्र पदवीत्तर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुचाकीला अज्ञात वाहनाची धडक

## आई आणि मुलाचा जागीच मृत्यू





**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोटर सायकल स्वाराला भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे झालेल्या भीषण अपघातात आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला असून नातवाला मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालय येथून गंभीर अवस्थेत जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. सदर घटना आज दि.२३ डिसेंबर रोजी ३.३० वाजता मोर्शी ते आष्टी मार्गावरील सिंभोरा गावानजीक घडली. मृतक इसमाचे नाव करीमशहा रहमानशहा (वय ५५) तसेच महिला मृतकाचे नाव तमीजाबी रहमानशहा (वय ६८) दोघेही रा. आष्टी असे आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार आष्टी येथील करीमशहा रहमानशहा, तमीजाबी रहमानशहा व फारुक शहा करीमशहा (वय २४) हे आपली मोटरसायकल क्रमांक एम एच ३१ आर ३३ १२ ने आष्टी येथून मोर्शीला काही कामानिमित्त येत होते. दरम्यान सिंभोरा गावाजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या अज्ञात वाहनाने मोटर सायकल स्वाराला जबर धडक दिली. ☞(पान २ वर)

# पहिल्या दिवशी उमेदवारांकडून १०२६ अर्जांची उचल

**राजकीय वर्तुळात मोठी खळबळ**

## मनपा निवडणुकीची नामांकन प्रक्रिया सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवार २३ डिसेंबर रोजी पहिल्याच दिवशी उमेदवारांचा प्रचंड प्रतिसाद पाहायला मिळाला आहे. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंतच्या अवघ्या चार तासांत तब्बल १,०२६ नामनिर्देशन अर्जांची

**नामांकनाची स्थिती-**

| | |
|---|---|
| उत्तर झोन रामपुरी कॅम्प | -१६९ |
| नवीन तहसील कार्यालय | -१४३ |
| मध्य झोन २ राजापेठ | -११५ |
| पूर्व झोन ३ दस्तूर नगर | -१७४ |
| शिक्षण विभाग अंबापेट | -१०३ |
| जुनी तहसील कार्यालय | -८७ |
| दक्षिण झोन ४ बडनेरा | - २३६ |



उचल झाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. पहिल्याच दिवशी झालेली ही विक्रमी अर्ज उचल आगामी मनपा निवडणूक अत्यंत चुरशीची ठरण्याचे संकेत देत आहे. विविध राजकीय पक्षांसह ☞(पान २ वर)

# दर्यापूर-अंजनगाव मतदारसंघात खासदारांचे वर्चस्व

## अखेरच्या दिवसात खा.बळवंत वानखडेनी पलटवली बाजी

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** दर्यापूर-अंजनगाव सुर्जी मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. कालांतराने बळवंत वानखडे यांनी आपल्या ताब्यात घेतला व आमदार होऊन या मतदारसंघांचे साडे चार वर्षे प्रतिनिधीत्व केले. लोकसभेवर निवडून गेल्यानंतर दर्यापूर विधानसभा मतदारसंघ ठाकरे गटाच्या शिवसेनेच्या वाट्याला गेल्याने पुन्हा शिवसेना ठाकरे गटाने आमदार निवडून आणुन मतदारसंघ ताब्यात घेतला आहे.

दर्यापूर मतदारसंघात आमदारांचे वर्चस्व की खासदारांचे वर्चस्व या निवडणुकीत मतदारांचे लक्ष लागले होते. त्यामुळे ही नगरपालिका निवडणूक खासदार, आमदार



यांची प्रतिष्ठेची मानली जात होती.

दर्यापूर मतदारसंघात दोन नगरपालिका असून दर्यापूर नगरपालिकेवर नगराध्यक्षसह एक हाती सत्ता काबीज करण्यात खासदार बळवंत वानखडे यांना यश मिळाले आहे.

अंजनगाव सुर्जी नगरपालिकेच्या निवडणुकीची कमान खासदार बळवंत वानखडे यांनी आपल्या हाती घेऊन व राजकीय रणनिती आखून २८ नगरसेवकांच्या जागे पैकी ९ नगरसेवक निवडून आणले तर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचा १२४ मताने निसटता पराभव झाला असल्याने खासदार बळवंत वानखडे यांचे दर्यापूर अंजनगाव मतदारसंघात अजूनही वर्चस्व कायम असल्याचे दिसून येत आहे. दर्यापूर नगरपालिकेवर एक हाती सत्ता स्थापन केली तर अंजनगाव सुर्जी नगरपालिकेवर बहुमत मिळाले नसले तरी नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांचा १२४ मतांनी अनपेक्षित पराभव झाला असला तरी काँग्रेसचे वर्चस्व कायम ☞(पान २ वर)

# कामात राम पाहणाऱ्या ग्रामीण मजुराच्या रोजगारावर गदा !

## -जुनी मनरेगा योजना सक्षम करा, नवी योजना रद्द करा

**-मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे निवेदन**

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने आज दि. २३ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी नांदगाव खंडेश्वर तहसीलदार यांचे मार्फत प्रधानमंत्री यांना निवेदन पाठवीत आले . निवेदनात म्हटले की, अनेक वर्षांपासून सुरू असलेली मनरेगा योजना ही जगातील सर्वात जास्त प्रत्यक्ष रोजगार देणारी योजना होती. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ जोसेफ स्टिगलिझज्ञ यांनी या योजनेची प्रचंड तारिफ केली होती. सध्या केन्द्र सरकारने मात्र या योजनेचे केवळ नांवच



बदलले नाही तर त्यात आधीच कर्जबाजारी झालेल्या राज्य सरकारांवर अतिरिक्त बोझा टाकण्याचे प्रावधान केलेले आहे. (पूर्वीच्या ९०:१० ऐवजी ६०:४०) एवढेच नव्हे तर आता या नवीन योजनेच्या अंतर्गत सुरू करण्याच्या नवीन कामांना केन्द्र सरकारची मंजूरी घ्यावी लागणार आहे. यामुळे या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष रोजगार देण्याच्या मूळ ☞(पान २ वर)

# कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थिनीचे अपहरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यात वर्धा जिल्ह्याच्या तळेगाव श्यामजी पंत येथे शिकण्यासाठी जाणाऱ्या एका महाविद्यालयीन अल्पवयीन विद्यार्थिनींचे अपहरण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. विद्यार्थिनीचे वडिलांच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी अपहरण, विनयभंग आणि पोक्सो अन्वये गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार



तिवसात तालुक्यात राहणारी पिडिता तळेगाव येथील कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. दररोज ती एसटी बसने कॉलेज जात होती. सोमवारी पीडित अल्पवयीन ने आपल्या वडिलांना फोन करून माहिती दिली की अज्ञात आरोपी तिचा तळेगाव श्यामजीपंत बस डेपो पासून पाठलाग करत आहे. हे ऐकल्यावर वडिलांनी तिला त्या आरोपीचे मोबाईल ने फोटो ☞(पान २ वर)

# बॅनरवर गुटखा खाऊन थुंकल्याने शिराळा येथे तणाव

## नागरिकांनी केला महामानवाचा दुग्धाभिषेक

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगांव पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या शिराळा गावात मुख्य बस स्टॅन्ड चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनानिमित्त लावण्यात आलेल्या बॅनरवर अज्ञात समाजकंटकांनी गुटखा खाऊन थुंकल्याने आज मंगळवार २३ डिसेंबर रोजी तणाव निर्माण झाला होता. समाज बांधवांच्या लक्षात येताच त्यांनी लगेच वलगाव पोलीस स्टेशन मध्ये धाव घेतली व घडलेल्या



घटनाक्रम पोलिसांना सांगितला. पोलिसांनी घटनेची गांभीर्य लक्षात घेता तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ते बॅनर तात्काळ काढून टाकण्यात आले. मात्र काही वेळासाठी यामुळे गावात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. ठाणेदार वैभव पानसरे यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यांनी समाज बांधवांना अज्ञात समाजकंटकावर कायदेशीर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यानंतर गावातील मुख्य बस स्टॅन्ड ☞(पान २ वर)

# प्रियकराने प्रेयसीवर केला चाकूने हल्ला

### गाडगे नगर येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे नगर समाधी मंदिर परिसरात आपल्या मैत्रिणी सोबत गुपचूप खायला गेलेल्या एका तरुणीवर तिच्यास प्रियकराने चाकूने हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी आरोपी पियुष अनिल चव्हाण (वय २१, वृंदावन कॉलनी) याच्याविरुद्ध गुन्हा



दाखल करून तपास सुरू केला आहे. माहिती अनुसार संबंधीत तरूणी आणि आरोपीमध्ये प्रेम संबंध होते. पण आरोपी पियुष चव्हाण हा शंकी प्रवृत्तीचा होता. तो नेहमी तिच्यावर संशय घ्यायचा. ती कोणासोबत बोलली तर तिला ☞(पान २ वर)

# नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत घेतली भेट

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने व नगरसेवक रवींद्र गुल्हाने यांनी मुंबई येथे जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन शहरातील विकासात्मक कामाबाबत चर्चा करून एक निवेदन सादर केले.

मोर्शी नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल दि.२१ डिसेंबर रोजी घोषित करण्यात आला.या निवडणुकीत थेट जनतेमधून लोकनियुक्त नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना



शिंदे गटाच्या उमेदवार प्रतीक्षा गुल्हाने यांचा दणदणीत विजय झाला.

शिंदे शिवसेना गटातर्फे अमरावती जिल्ह्यात मोर्शी नगरपालिकेवर शिवसेनेचा झेंडा फडकला.त्या अनुषंगाने नवनिर्वाचित ☞(पान २ वर)

# शिवसेना उबाठाच्या संभावित उमेदवारांची यादी घोषित

## मनपा निवडणुकीत मशाल पेटवण्याची तयारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकी च्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून संभावित उमेदवारांची यादी घोषित केली आहे. पक्ष मनपा निवडणूक लढविण्यासाठी सज्ज आहे. निवडणुकीची रणनीती आखण्यात आलेली आहे. नवीन आणि जुने शिवसैनिक मिळून या निवडणुकीत मशाल पेटवण्यासाठी सज्ज झाले आहे. या दृष्टीने पार्टीने कार्यही सुरू केलेले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रभागात पार्टीच्या वतीने उमेदवार उभे करण्यात येणार आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना महानगरप्रमुख पराग गुडधे यांनी संभावित उमेदवारांची यादी घोषित केली आहे. या यादीमध्ये प्रदीप बाजड, ☞(पान २ वर)

# घरफोड्या व लूटमार करणारे आरोपी गजाआड

**-१५ गुन्हे उघडकीस,१० लाख १५ हजाराचा मुद्देमाल जप्त**



**मोर्शी/प्रतिनिधीः-** घरफोड्या व लूटमार करणारे आरोपी पकडून १५ गुन्हे उघडकीस आणून जवळपास १० लाख १५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात स्थानिक गुन्हे शाखा अमरावती व मोर्शी पोलिसांनी यश प्राप्त केले.

अमरावती जिल्हयात वाढते घरफोडीचे प्रमाण पाहता पोलीस अधिक्षक यांनी गुन्हे उघडकीस आणण्याच्या ☞(पान २ वर)

# हिंगलाज देवी महोत्सव २७,२८ डिसेंबरला

## विदर्भ भावसार समाज संस्था-समितीचे आयोजन




**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भ भावसार समाज संस्था तथा महोत्सव समितीच्या वतीने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील हिंगलाजपूर येथील हिंगलाज ज्वालामुखी देवी महोत्सवाचे २७ व २८ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस विविध कार्यक्रम महोत्सव अंतर्गत घेतले जाणार असल्याची माहिती आज मंगळवार २३ डिसेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले ☞(पान २ वर)

# 'प्रसाधनगृह आणि डिजिटल ॲप' पहिली प्राथमिकता!

## -नागरिकांच्या समस्या 'एका क्लिकवर' - नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांची त्रिसूत्री

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** यवतमाळ नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रियदर्शनी अशोक उईके यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस आणि लोकाभिमुख धोरण जाहीर केले आहे. विजय रॅली पूर्वी दैनिक जनमाध्यम च्या जिल्हा प्रतिनिधींशी संवाद साधताना त्यांनी नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासन अधिक गतिमान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यवतमाळ शहरातील




नागरिकांनी दिलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, असा ठाम विश्वास व्यक्त करत नगराध्यक्षा उईके यांनी शहराच्या विकासासाठी त्रिसूत्री कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली. शहरातील महिलांसह पुरुषांसाठी ही पुरेशा प्रसाधन गृहांची सुविधा उपलब्ध नसल्याची बाब गंभीर असल्याचे नमूद करत, मुख्यबाजार पेठे सह शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सुसज्ज सार्वजनिक प्रसाधनगृहे उभारणे हे आपले पहिले प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिलांच्या सुरक्षितता आणि सोयीसाठी ☞(पान २ वर)

# मोर्शी पोलीसांनी रोखली अवैध जनावरांची वाहतुक!

## ७ लक्ष ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**मोर्शी/प्रतिनिधीः-** अवैध जनावराची तस्करी करून कत्तलीसाठी नेत असतांना मोर्शी पोलिसांनी जनावरांसह मालवाहू टेम्पो ताब्यात घेऊन जवळपास ७ लक्ष ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

दिवसेंदिवस अवैध्य जनावरे कत्तलीसाठी नेण्याचा गोरखधंदा वाढत चालला असून दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी गोपनिय माहीती वरून पोलीस स्टेशन मोर्शी येथील गुन्हे प्रकटीकरण



पथकाने मोर्शी अमरावती रोडवर असलेल्या तळणी फाट्यावर नकाबंदी ☞(पान २ वर)